म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.
२१७ १९९९
REFBK-0008710

ग्रंथ संग्रहालय,
वि ...
कि ...

# राजहंस

अर्थात्

कै. रा. ग. गडकरी यांच्या

'वाग्वैजयंती' तील निवडक कविता

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ दि: ........


प्रस्तावनालेखक

आचार्य प्र. के. अत्रे

अधिकृत प्रत
नेलकर बुकसेलर्स, पुणे २
REFBK-0008710

किंमत २ रु.

मॉडर्न बुकडेपो, पुणें २

आवृत्ति पहिली
१९५३
आवृत्ति दुसरी
१९५६
आवृत्ति तिसरी
१९५९

प्रकाशक
श्री. कमलाबाई भिडे
मालक, मॉडर्न बुकडेपो,
बाजीराव रस्ता, पुणें २.

मुद्रक
ज. ग. जोशी
जनार्दन प्रेस,
३९४ सदाशिव पेठ पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# अनुक्रम

## प्रेमगीतें


| | | |
|---|---|---|
| १ | हृदयशारदेस | |
| २ | ती कोण ? | ४ |
| ३ | कधीं ? | ४ |
| ४ | फुलें वेंचलीं पण— | ५ |
| ५ | जुन्या कवितांची आठवण | ७ |
| ६ | फणसाचें पान | ८ |
| १७ | एका शब्दासाठीं विनंति | ९ |
| १८ | निर्दय बालेस— | १० |
| १९ | मोरपिसावरचा डोळा | ११ |
| १० | गोफ | ११ |
| ११ | हृदयास — | १३ |
| १२ | शेवटचें प्रेमगीत | १४ |
| ३ | अल्लड प्रेमास— | १५ |
| ४ | पुनर्जात प्रेमास | १६ |
| ५ | प्रेम आणि मरण | १७ |
| १६ | ओसाड आडांतील एकच फूल | २२ |
| १७ | गुलाबी कोडें | २५ |
| १८ | प्रेमाची प्रामाणिकता | २६ |
| १९ | प्रेमाखातर | २७ |
| २० | दिव्यप्रेमाची जाति | २९ |


## सामाजिक कविता


| | | |
|---|---|---|
| २१ | दसरा | ३२ |
| २२ | स्मशानांतील गाणें | ३८ |
| २३ | कवि आणि कैदी | ४६ |
| २४ | एक समस्या— | ४८ |


## कल्पनाप्रचुर कविता


| | | |
|---|---|---|
| २५ | चिमुकलीच कविता | ५० |
| २६ | बागेंत बागडणाऱ्या | ५६ |

२७ अरुण — — — — ५८
२८ हलत्या पिंपळपानास — — — ६१

स्फुट कविता

२९ राजहंस माझा निजला ! — — — ६५
३० अवेळी ओरडणाऱ्या कोकिळेस — — — ७०
३१ केशवसूत मेले ? — — — — ७३
३२ घुंगुरवाळा — — — — ७६
३३ समसमां संयोग— — — — — ७७
३४ भीमकवाळा — — — — ७८
३५ स्मृतिगीत — — — — ७९
३६ कळ्यांचीं फुलें कशीं झालीं ? — — — ८०
३७ एकच मागणें — — — — ८२
३८ निजलेल्या बालकवीस — — — ८२
३९ महाराष्ट्र-गीत — — — — ८४
४० कृष्णाकाठीं कुंडल — — — — ८७
४१ काव्याची व्याख्या — — — — ९३

विनोदी कविता

४२ काय करावें ? — — — — ९४
४३ चिंतातुर जंतु — — — — ९५
४४ हुकूम हुकूम — — — — ९५
४५ विहिणीचा कलकलाट — — — ९७

तात्त्विक कविता

४६ एखाद्याचें नशीब — — — — ९८
४७ अनामिकाचे अभंग — — — — ९९
४८ विरामचिन्हें — — — — १०२
४९ फूल ना फुलाची पाकळी — — — १०३
५० जीवितास— — — — — १०४
५१ मुरली — — — — १०५
५२ फुटकी तपेली — — — — १११
५३ शेवटची कविता ! — — — — ११४
५४ माझा मृत्युलेख — — — — ११६

# प्रस्तावना

मराठी साहित्यांत राम गणेश गडकरी ह्यांना जेवढी कीर्ति मिळाली, तेवढी महाराष्ट्रांतील या शतकांतल्या फारच थोड्या लेखकांच्या वांट्याला आली असेल. काव्य, नाट्य आणि विनोद ह्या तीनहि क्षेत्रांत ते सारख्याच तेजानें तळपले. ह्यांपैकीं केवळ एखाद्याच क्षेत्रांत ते वावरले असते तरी त्यांनीं तेवढेंच यश मिळविलें असतें. पण साहित्यामधल्या अत्यंत अवघड म्हणून समजल्या जाणाऱ्या तीनहि प्रकारांत एकाच वेळीं त्यांनीं असामान्य प्रभुत्व दाखविल्या-मुळें त्यांच्या व्यक्तिमत्वाभोंवतीं अद्‌भुततेचें विलक्षण वलय निर्माण झालें. काव्यांत ते स्वतःला 'केशवसुतां'चे सच्चे चेले म्हणवीत, तर नाट्य-विनोदांत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे त्यांचे गुरु होते. आपल्या ह्या दोन्ही गुरूंपासून त्यांनीं निःसंशय स्फूर्ति घेतली. कांहीं मर्यादेपर्यंत त्यांनीं त्यांचें अनुकरणहि केलें. पण असें असूनहि गडकऱ्यांची प्रज्ञा आणि प्रतिभा उभय गुरूंपेक्षां अधिक स्वतंत्र होती. म्हणूनच त्यांच्यापेक्षां जास्त लौकिक आणि प्रसिद्धी ते मिळवूं शकले.

केशवसुतांची जीवनदृष्टि गडकऱ्यांपेक्षां अधिक विशाल होती. केशवसुत द्रष्टे होते, पण गडकरी हे स्रष्टे होते. कोल्हटकर हे गडकऱ्यांपेक्षां अधिक तर्कनिष्ठ आणि मार्मिक होते. पण गडकऱ्यांचें लालित्य त्यांच्याजवळ नव्हतें. केशवसुत आणि कोल्हटकर ह्यांच्यापेक्षां गडकरी हे अधिक कलात्मक आणि रसिक होते. कवित्व आणि विनोद ह्या प्रतिभेच्या दोन वेगवेगळ्या शक्ति आहेत. त्या एकाच व्यक्तिमत्त्वांत तितक्या प्रभावानें क्वचित् संभवतात. पण तो अपूर्व योग गडकऱ्यांच्या ठिकाणीं जमून आलेला होता. म्हणून इतर लेखकांना न मिळूं शकलेली लोकप्रियता अगदीं थोडक्या अवधींत त्यांना लाभली.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांप्रमाणेंच ऐन तारुण्यांत त्यांना मृत्यु आला. मरणसमयीं ते अवघे चौतिस वर्षांचे होते. दहा अकरा वर्षांचाच त्यांचा एकंदर लेखनकाल होता. पण एवढ्या थोड्या काळांत त्यांनीं जी विलक्षण वाङ्मयीन कामगिरी करून ठेविली आहे, ती बुद्धीला अक्षरशः स्तिमित करून टाकणारी आहे. विष्णुशास्त्र्यांच्या नंतर मराठी गद्यावर आपल्या लेखनाचा प्रभाव

पाडणारा आणि त्याला निश्चित वळण लावणारा गडकऱ्यासारखा शैलीदार लेखक अलीकडच्या काळांत तरी दुसरा झालेला नाहीं. मराठी साहित्यांत गडकऱ्यांच्या इतकें अनुकरण दुसऱ्या कोणत्याहि लेखकाचें झालेलें नाहीं. गेल्या पंचवीस वर्षांत निर्माण झालेल्या बहुतेक सर्व ललितवाङ्मयावर कमी जास्त प्रमाणानें गडकऱ्यांच्या साहित्याचाच ठसा उमटलेला आहे. ह्यांतच गडकऱ्यांच्या अलौकिकत्वाचें आणि महत्त्वाचें वैशिष्टय आहे.

गडकऱ्यांनीं आपल्या वाङ्मयीन जीवनाला काव्यलेखनानें प्रारंभ केला. 'मनोरंजन' हें त्या वेळचें महाराष्ट्रांतलें एकमेव लोकप्रिय मासिक होतें. ह्या मासिकांत 'गोविंदाग्रज' ह्या नांवानें त्यांच्या नाविन्यपूर्ण कविता जेव्हां एकामागून एक प्रसिद्ध होऊं लागल्या, तेव्हां साऱ्या महाराष्ट्राचें लक्ष त्यांच्याकडे एकदम वेधलें गेलें. आणि 'राजहंस माझा निजला' हें आंतड्यांना पीळ पाडणारें त्यांचें शोकगीत जेव्हां 'मनोरंजनांत' प्रथम छापून आलें, तेव्हां काव्यक्षेत्रांतलें अग्रस्थान मराठी रसिकांनीं एकमतानें त्यांना देऊन टाकलें. कोणाहि कवीच्या एका कवितेचा एवढा बोलबाला झालेला माझ्या ऐकिवांत नाहीं. महाराष्ट्रांत घरोघर या कवितेचीं अक्षरशः पारायणें झालीं.

'राजहंसा' नंतर त्यांच्या 'मुरली' लाहि तेवढीच लोकप्रियता लाभली. अकरा सालापासून तों पंधरा सालापर्यंत जवळ जवळ पांच वर्षें 'गोविंदाग्रजां'च्या काव्यप्रतिभेला विलक्षण बहर आला. नाट्यलेखनाकडे जसे ते वळले आणि नाटककार म्हणून त्यांची जशी कीर्ति होऊं लागली, तसा त्यांच्या काव्यनिर्मितीला खळ पडला. अर्थात् त्यांचीं नाटकें म्हणजे जवळ जवळ गद्य काव्येंच होतीं. माझ्या मतें तर त्यांचें गद्य-काव्य जेवढें तेजस्वी आणि प्रभावी आहे, तेवढें त्यांचें पद्य-काव्य नाहीं.

गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या समग्र काव्यांचा संग्रह 'वाग्वैजयन्ती' या नांवानें प्रसिद्ध झाला. ह्या संग्रहांत त्यांच्या अदमासें दीडशें कविता समाविष्ट केलेल्या आहेत. या संग्रहाला नरसिंह चिंतामण केळकर ह्यांनीं प्रस्तावना लिहिलेली असून 'गडकरी यांचें कविचरित्र एखाद्या धूमकेतूप्रमाणें अकल्पित व तेजस्वी होऊन गेलें. पण धूमकेतूच्या तेजापेक्षां गडकऱ्यांची काव्यकीर्ति त्यांच्या पश्चात् अधिक काळ टिकेल' असा गडकऱ्यांच्या काव्याचा त्यांनीं तिच्यांत

(०१५२ ...)

मुक्तकंठानें गौरव केला आहे. चव्वेचाळीस सालीं गडकऱ्यांच्या मृत्यूला पंचवीस वर्षें पूर्ण झालीं. त्या प्रसंगीं माझ्या 'समीक्षक' मासिकाचा मी जो खास 'गडकरी अंक' काढला त्यांत गडकऱ्यांच्या अप्रकाशित आणि अपूर्ण कविता मी त्यांच्या कागदपत्रांमधून संशोधून प्रसिद्ध केल्या. ह्या व्यतिरिक्त आणखी त्यांच्या कांहीं अप्रकाशित कविता असतील असें मला वाटत नाहीं.

विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठीं 'वाग्वैजयंती' मधल्या कांहीं निवडक कविता एकत्रित करून 'राजहंस' हा प्रस्तुत संग्रह तयार करण्यांत आला आहे. कवितांची विषयवार मांडणी करण्यांत आली आहे, हें ह्या संग्रहाचें वैशिष्ट्य आहे. गडकऱ्यांच्या सर्वच उत्तमोत्तम कविता या संग्रहांत आल्या असल्यानें त्यांच्या काव्यप्रतिभेच्या विविध पैलूंची ओळख अगदीं थोड्या अवकाशांत या संग्रहानें होण्यासारखी आहे.

गडकऱ्यांच्या कवितांमध्यें प्रेमकाव्यांची आणि भावकाव्यांची संख्या अधिक आहे हें त्यांचा समग्र काव्यसंग्रह नुसता वरवर चाळला तरी लक्षांत येण्यासारखें आहे. म्हणूनच त्यांना 'प्रेमाचे शाहीर' असें म्हणतात. पण त्यांचीं हीं बहुतेक प्रेमकाव्यें भावनोत्कट असलीं तरी गेय नाहींत. कित्येक तात्त्विकच आहेत. म्हणून त्यांना 'प्रेमगीतें' म्हणतां येणार नाहीं. मराठी भाषेंतलें लावणी वाङ्मय म्हणजे प्रेमगीतांचें जिवंत भांडारच आहे. जगांतल्या कोणत्याहि भाषेंत अशीं उन्मादक प्रेमगीतें नसतील. गडकऱ्यांनीं लावण्यांचा फार रसिकतेनें अभ्यास केला होता. असें असूनहि भास्करराव तांबे ह्यांच्याप्रमाणें ते प्रभावी प्रेमगीतें कां लिहूं शकले नाहींत ह्याचें मला आश्चर्य वाटतें.

गडकऱ्यांचीं पुष्कळशीं प्रेमकाव्यें गद्य नि कृतिम वाटतात. त्यांच्या बहुतेक प्रेमकाव्यांवर निराशेची छटा पडलेली दिसते. 'जुन्या कवितांची आठवण', 'फणसाचें पान', 'शेवटचें प्रेमगीत' ह्या प्रेमकाव्यांत तर वैयक्तिक जीवनांतले कांहीं उल्लेख आलेले आहेत. त्यामुळें गडकऱ्यांच्या प्रेमकविता आत्मचरित्रात्मक असून स्वतःच्या आयुष्यांत झालेल्या प्रेमनिराशेची धूसर छाया त्यांच्यावर पडलेली आहे, असा निष्कर्ष काढण्याचा साहजिकच वाचकांना मोह होतो. गडकऱ्यांच्या काव्याचे दोन टीकाकार

डॉ. हर्षे आणि प्रा. वाळिंबे ह्यांनीं ह्या गोष्टीचा अगदीं निःसंदिग्धपणें उल्लेख केलेला आहे.

प्रा. वाळिंबे ह्यांनीं तर 'गडकऱ्यांच्या अंतरंगा' त खोल बुडी मारून त्यांचें हें प्रेमरहस्य उजेडांत आणण्याचा 'विक्रम' केला आहे. गडकऱ्यांच्या गद्य व पद्य वाङ्मयांत 'तारा' आणि 'तारका' ह्या शब्दांचा जेथें जेथें उल्लेख आलेला आहे, ते सर्व उल्लेख तपशीलवर एकत्र करून प्रा. वाळिंबे ह्यांनीं असा शोध लावला आहे कीं, गडकऱ्यांना आयुष्यांत निराश करणाऱ्या त्यांच्या त्या प्रणयिनीचें नांव 'तारा' हें असलें पाहिजे. बायरन किंवा शेले ह्यांच्या जीवनांत अनेक स्त्रिया आल्या आणि त्यांच्यामुळें त्यांच्या आयुष्यांत अनेक प्रक्षोभक प्रसंग निर्माण झाले. त्यांच्या चरित्रांतली ही प्रणयाची पार्श्वभूमि लक्षांत घेतल्यावांचून त्यांच्या प्रेमकाव्याचेंच नव्हे तर प्रतिभेचेंहि विश्लेक्षण होऊं शकत नाहीं. मराठी कवींच्या बाबतींत हा नियम लागू करणें धोक्याचें होईल.

तरुण वयांत गडकऱ्यांचें मन एखाद्या मुलीनें आकर्षित केलें असलें आणि तें त्यांचें प्रेम पुढें सफळ होऊं शकलें नसलें, म्हणून त्यांचें आयुष्य आणि काव्य प्रेमनिराशेनें ग्रासून गेलें होतें असें समजणें वस्तुस्थितीला धरून होणार नाहीं. गडकऱ्यांच्या ज्या आप्तांनीं प्रा. वाळिंबे ह्यांना त्यांच्या ह्या 'प्रणया' ची माहिती पुरविली ते त्या वेळीं वयानें इतके लहान होते कीं त्यांना प्रत्यक्ष परिस्थिति माहीत असणें शक्यच नाहीं. 'जुन्या कवितांची आठवण' ही कविता ज्या मुलीला उद्देशून गडकऱ्यांनीं रचली आहे, त्या मुलीबद्दल अत्यंत लहान वयांत त्यांना आकर्षण वाटलें असावें असें दिसतें. दोघेहि निर्दोष मनःस्थितींत असतां त्यांनीं 'प्रेमाचा पहिला धडा गिरविला.' तथापि, ह्या मुलीशीं त्यांचें लग्न होऊं शकलें नाहीं. त्यांचें लग्न त्यांच्या मनाविरुद्ध अगदीं तरुण वयांतच झालें. ही मुलगी अशिक्षित असल्यानें गडकऱ्यांशीं तिचें पटूं शकलें नाहीं. 'प्रेमसंन्यास' मधील 'मनोरमे' ची कल्पना त्यांना आपल्या पहिल्या विवाहावरून सुचली असावी.

पुढें ही त्यांची प्रथम पत्नी त्यांना सोडून गेली. त्यामुळें त्यांना फारच धक्का बसला. 'अवेळ तरिही बोल कोकिळे' या कवितेमधील 'हातीं

संसाराची माती। निष्प्रेमाची शेज सोबती ' या उल्लेखांत त्या कालखंडांतील त्यांच्या मनःस्थितीचें चित्र प्रकट झालें आहे. गडकऱ्यांच्या प्रणयिनीचें लग्न दुसऱ्या एका माणसाशीं झालें. पण म्हणून त्यानंतर ते तिच्याबद्दल एकसारखे झुरत बसले होते, आणि तिच्या नांवाचे उल्लेख आपल्या वाङ्मयांत त्यांनीं सर्वत्र विखरून दिले आहेत, हें कांहीं खरें नव्हे. उलट ती मुलगी आणि तिचे यजमान ह्यांच्या जीवनावर 'सोन्याची सलकडी' नांवाची एक कादंबरी लिहिण्याचा त्यांनीं संकल्प केला होता.

मृत्यूपूर्वी अवघीं दोन वर्षें आधीं त्यांनीं दुसरें लग्न केलें. पण त्याच सुमाराला त्यांच्या आजाराला प्रारंभ झाला, त्यामुळें त्यांना ह्याहि लग्नापासून सुख लाभलें नाहीं. गडकऱ्यांच्या सर्व प्रेमकविता एकाच व्यक्तीला उद्देशून केल्या आहेत, असें मानणें चुकीचें आहे. कित्येक कवितांमधील 'रमणी' शुद्ध काल्पनिक आहे. भावनेच्या एका विशिष्ट अवस्थेंत कवि निरनिराळ्या कल्पनांचीं जाळीं विणतो आणि त्यांच्याशीं खेळत बसतो. ह्या अवस्थेंत त्यांच्या तोंडून निघालेल्या सर्वच उद्गारांचा सत्यस्थितीशीं संबंध असतोच असें नाहीं. गडकऱ्यांच्या चरित्राचे बारीसारीक धागे त्यांच्या वाङ्मयांत ठिकठिकाणीं आढळतात. सर्वच उत्तम वाङ्मय आत्मचरित्रात्मक असतें. पण त्याचा असा मात्र अर्थ नव्हे कीं लेखक जें यच्चयावत् लिहितो त्यावरून त्याच्या चरित्रावर प्रकाश पडतो.

गडकऱ्यांच्या वाङ्मयावरून त्यांचें चरित्र अजमावण्याचा ज्या टीकाकारांनीं प्रयत्न केला आहे त्यांची फसगत झालेली आहे. प्रा. हर्षे ह्यांना गडकऱ्यांचीं कित्येक प्रेमकाव्यें वैषयिक वाटतात. ते म्हणतात, "म्हणूनच शिष्ट लोक गोविंदाग्रजांच्या कवितेला नाकें मुरडतात. आपल्या दयितेची 'निर्वाणीची विनवणी करीत' असतां 'चुंबन दे रमणी' ह्याच्या पलीकडे ज्याच्या हेतूची मजल जात नाहीं, त्याच्या शुद्ध प्रेमाचा कोणाला विश्वास येणार आहे?' दयितेला चुंबन मागितल्यानें प्रेम अशुद्ध होतें असें ज्याला वाटतें, तो भलताच 'शिष्ट' असला पाहिजे. दयितेकडून 'चुंबन' नाहीं मागायचें तर काय 'तीर्थ' मागायचें?

'अरुण' कवितेवर टीका करतांना माडखोलकरांनीं असें लिहिलें आहे कीं, "गडकरी नेहमीं उशीरा उठत. त्यांनीं 'अरुण' केव्हां

पाहिला ? " तेव्हा मी एका व्याख्यानांत त्यांना उलट असा प्रश्न केला कीं, "गडकरी उशीरा उठत हें तुम्हांला काय माहीत ? तुम्हांला काय त्यांचें अंथरूण गुंडाळायच्या कामावर कोणी नेमलें होतें ? " दारूच्या दुष्परिणामावर गडकऱ्यांनीं 'एकच प्याला' हें नाटक लिहिलें. त्यावरून टीकाकारांनीं निष्कर्ष काय काढला तर गडकरी हे दारूबाज होते. गडकऱ्यांच्या वाङ्मया-वरून त्यांचें चरित्र जाणण्याचा ज्यांनीं ज्यांनीं प्रयत्न केला त्यांनीं त्यांनी त्यांच्या बाबतींत अन्याय केलेला आहे. म्हणून गडकऱ्यांच्या साहित्याचें शुद्ध वाङ्मयीन दृष्टीनेंच मूल्यमापन व्हावें हें योग्य.

'फूल ना फुलाची पाकळी' या कवितेमध्यें तर गडकऱ्यांनीं आपल्या भावी टीकाकारांना स्पष्ट इषाराच देऊन ठेवला आहे कीं, "शहाजहानाचा 'ताजमहाल' पहा. त्याची ख्यालीखुशाली पाहूं नका. कालिदासाचें वेश्यागमन विसरून जा. त्याचें 'शाकुंतल' लक्ष्यांत घ्या. 'वाल्ह्या कोळ्या' चे खुनी खड्यानें भरलेले रांजण आठवूं नका. त्याचें 'रामायण' बघा. कृष्णानें गोकुळांत केलेल्या साऱ्या मौजा विसरा. त्याची 'गीता' ध्यानीं धरा."

दूषण वगळुनि भूषणमात्रें
प्रभुपूजन करि काळ असे.
तुम्ही आम्ही कष्टि होणें
हा कुठला मग न्याय असे ?

सर्वसामान्य माणसासारखेंच गडकऱ्यांचें जीवन होतें. ते इतरांपेक्षां अधिक वैषयिक होते वा व्यसनी होते या कल्पनेला यत्किंचितहि कोणी आपल्या चित्तांत थारा देऊं नये. आपलें सर्वस्व त्यांनीं वाङ्मयाला वाहिलेलें होतें. वाङ्मयावरील त्यांची निष्ठा संपूर्णतया अव्यभिचारी होती. ही दृष्टि बाळगूनच त्यांचें सर्व वाङ्मय वाचावें.

'फुलें वेंचलीं पण', 'फणसाचें पान', 'गोफ' आणि 'प्रेमाखातर' हीं गडकऱ्यांचीं चार उत्कृष्ट प्रेमकाव्यें आहेत. त्यांत प्रकट झालेली भावना अत्यंत हृदयस्पर्शी आहे, यांत शंका नाहीं. माणसानें सुंदर सुंदर फुलें जमवावींत अन् तीं जमविल्यानंतर मग एकदम त्याच्यापुढें हा प्रश्न उभा रहावा कीं, "फुलें वेंचिलीं पण—आतां हीं द्यावीं कोणालागीं ?" हा प्रसंगच व्याकुळ करणारा आहे.

कांट्यावरि ह्या कोमल हृदया
टाकुनि देवा क्रूर
कुठें फुलांची धनीन माझी
दिली दवडुनी दूर ?

ह्या ओळींतली आर्तता अंतःकरणाला चटका लावणारी आहे. ' फणसाच्या पानां ' तील ' हतभागी हे जीव जगीं या स्मरणें केवळ जगतीं ' ह्या कल्पनेंत सुद्धां तीच व्यथा व्यक्त झाली आहे. ' गोफ ' या कवितेंत कल्पना आणि भावना ह्यांच्या हृदयंगम संमीलनानें अपूर्व गोडी निर्माण झालेली आहे. प्रणयाचा गोफ गुंफतांना एकमेकांच्या हृदयाचे पदर नकळत परस्परांत गुंतले जावेत अन् त्यामुळें पुन्हां तो गोफ उलगडण्याचें काम दुष्कर व्हावें ही कल्पनाच मुळीं अत्यंत भावरम्य आहे.

' प्रेमाखातर ' ही कविता म्हणजे प्रेमाचें एक तेजस्वी स्तोत्रच आहे. गोविंदाग्रजांच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीचा दिमाख या कवितेंत पहावयाला मिळतो.

प्रेमासाठीं रामापाठीं सीता वनवासी
वृंदेस्तव हरि स्मशानांतला वृंदावनवासी
का ब्राह्मणपद बादशहाला राणी मस्तानी
का धर्मावर लाथ मारिली पंडितरायांनीं
व्रिजभाषेचा प्रेमवाल्मिकी प्रेतावर तरला
सांग तयाला प्रेमावांचुनि कोणी हात दिला ?

असली ऐट अन् ठसका गोविंदाग्रजाखेरीज दुसऱ्या कोणाच्या काव्यांत येऊं शकणार ?

' ओसाड आडांतील एकच फूल ' किंवा ' दिव्य प्रेमाची जाति ' ह्या कवितेंत गडकऱ्यांचें व्यक्तिमत्त्व पहावयाला मिळत नाहीं. ' प्रेम आणि मरण ' अन् ' गुलाबी कोडें ' ह्या कवितेमध्यें मात्र ' गोविंदाग्रजां ' च्या प्रतिभेचा वैशिष्ट्यपूर्ण विलास दृष्टीस पडतो. प्रेमासाठीं सर्वस्वाचें बलिदान करणाऱ्या प्रेमिकाच्या आत्यंतिक त्यागाचें रोमहर्षण चित्रण ' प्रेम आणि मरण ' ह्या काव्यांत गडकऱ्यांनीं केलेलें आहे. सांसारिक शृंगाराचा जो आल्हादकारक नमुना

' गुलाबी कोडया ' मध्यें अनुभवावयाला मिळतो, तसा क्वचित्च कोणत्याहि काव्यांत तो मिळूं शकेल. या कवितेला जवळ जवळ चार तपें आतां पूर्ण होतील. पण रसिकांच्या मनावरील त्याची मोहिनी पहिल्याइतकीच प्रभावी आहे.

गडकऱ्यांच्या काळांत सामाजिक सुधारणांचा फारसा शास्त्रीय विचार झालेला नव्हता. विधवा-पुनर्विवाह आणि अस्पृश्यता-निवारण ह्या दोनच सामाजिक सुधारणेच्या प्रमुख बाबी होत्या. पण ह्या सुधारणांकडे पहाण्याची पांढरपेशा वर्गाची दृष्टि केवळ भूतदयावादी होती. गडकऱ्यांचा दृष्टिकोणहि तोच होता. आगरकर, राजारामशास्त्री भागवत किंवा केशवसुत ह्यांच्या सामाजिक विचारांचा त्यांच्या मनावर पगडा पडलेला होता. जुन्या रूढी आणि परंपरा ह्यांच्याशीं ' नव्या मतांच्या भालाईतांनीं ' टक्कर दिली पाहिजे. आणि समाजाच्या प्रगतीचा चोहोंकडून कोंडमारा करणाऱ्या आचाराच्या आकुंचित सीमा ओलांडल्या पाहिजेत, एवढेंच त्यांच्या पुरोगामित्वाचें क्षेत्रफळ होतें.

' दसरा ' या कवितेंत त्यांनीं आपल्या सामाजिक सुधारणेचें तत्त्वज्ञान विशद केलें आहे. ' केशवसुतां ' च्या ' तुतारी ' ची या कवितेवर गडद छाया पडलेली आहे. गडकरी हे स्वतंत्र प्रतिभेचे लेखक होते. पण सामाजिक सुधारणेचा त्यांनीं स्वतः असा विचार केला नसल्यानें, भावनेच्या आणि कल्पनेच्या क्षेत्रांत त्यांची काव्यप्रतिभा जशी दिमाखानें भराऱ्या मारतांना दिसते तशी ती सामाजिक विषयामध्यें मारूं शकत नाहीं. त्यामुळें त्यांच्या सामाजिक विषयावरील कवितेंत त्यांचें वैशिष्ट्यपूर्ण नावीन्य कुठेंहि आढळून येत नाहीं. गडकरी हे वृत्तीनें भाविक आणि श्रद्धाळू होते. देवादिकांच्या चरित्रांतील कांहीं विसंगतीवर त्यांनीं विनोद केला असला, तरी पुराणांतील पुष्कळशा चमत्कारांवर त्यांचा विश्वास होता. गांवांतील कोणत्याहि देवळासमोरून जातांना आंतल्या देवाला रस्त्यावरून का होईना, नमस्कार केल्यावांचून ते कधीं पुढें जात नसत. अशा अनेक प्रसंगीं मी त्यांच्या सान्निध्यांत होतों. मला त्यांची ' आस्तिकता ' त्या वेळीं तरी अत्यंत हास्यास्पद वाटल्यावांचून राहिली नाहीं. खऱ्या सुधारकाला लागणाऱ्या प्रखर बुद्धिवादाचा गडकऱ्यांच्या जवळ अभावच होता असें म्हटलें पाहिजे.

म्हणून त्यांच्या सामाजिक कवितेंत नुसती अस्पष्ट तळमळ दिसून येते. जातिवंत जिव्हाळा असा कुठेंच भासत नाहीं. तरी देखील 'स्मशानांतील गाणें' आणि 'एक समस्या' ह्या कवितेमध्यें त्यांनीं सामाजिक अन्यायाचें अत्यंत प्रखर आणि मार्मिक विडंबन केलेलें आहे. 'स्मशानांतलें गाणें' हा मराठी भाषेंतला भयानक रसाचा एकमेव नमुना आहे. 'प्रेमसंन्यास' नाटकाचा उगम ह्या कवितेंत आढळतो. गडकऱ्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण गद्य शैलीचा आणि विरोधाभासात्मक विनोदाचा तोंडवळा सुद्धां ह्याच कवितेंत पहायला सांपडतो. जगांतल्या मानवांपेक्षां स्मशाना-मधल्या भुतामध्यें जास्त माणुसकी आहे, हा या कवितेचा मध्यवर्ति विषय आहे. तो इतक्या समर्पक दृष्टांतांनीं आणि उदाहरणांनीं त्यांनीं आकर्षक केला आहे कीं, कवितेची कमालीची लांबी यत्किंचित्‌हि जाणवत नाहीं.

'देवनाम भूताप्रति पळवी। देवांची त्या कळे थोरवी। मानव नवसें परि त्या फसवी', 'भुतें भुतासच कधीं न खाती। बंधुबंधुच्या रंगत रक्तीं' 'दोन पतीनीं विधवा न सती। पतिव्रतेला परि पांच पति। 'मांजर आडवें कार्य बिघडवी। कर्तव्याची हीच थोरवी', 'सजीव तोंवरि लत्ता देती। मरतां घेती खांद्यावरती। उफराटा सन्मान।' असल्या अडाखेबंद सुभाषितवजा कल्पना-चमत्कृतींनीं ही कविता आमूलाग्र ओथंबलेली आहे. भुतांचें गाणें संपल्यानंतर विधवेच्या मृत बालकाच्या तोंडांत उरलेलें दूध चाटून एक कुत्रें कवीकडे बघून हासूं लागलें, ही कल्पना म्हणजे या कवितेंतल्या भयानक रसाचा कळसच होय, हें चित्र नुसतें डोळयापुढें आणलें तर काळजांत भीतीचा शहारा उठल्याखेरीज रहात नाहीं. ज्या विशिष्ट मनःस्थितींत गडकऱ्यांना ही कल्पना सुचली असेल त्याच मनःस्थितींतून दुमनच्या प्रेताचें चुंबन घेणाऱ्या कमलाकराच्या भयानक स्वभावचित्राचा संभव झाला असावा असें वाटतें.

'एका समस्ये' त बोलघेवड्या आणि ढोंगी सुधाकरांच्या दांभिक सुधारणा-प्रियतेचा मोठा मार्मिक रहस्यस्फोट केलेला आहे. ही कविता एखाद्या सभेपुढें चांगल्या रीतीनें म्हणून दाखविली म्हणजे तिचा श्रोत्यांवर काय परिणाम होतो हें पाहाण्यासारखें आहे. 'कवि आणि कैदी' ही कांहीं सामाजिक कविता नाहीं. तें एक अध्यात्मिक रूपक आहे. मायेच्या बंधनांत अडकलेल्या

आत्म्याची त्यांतून सुटण्यासाठीं कशी उत्कट धडपड चाललेली असते हें या कवितेंत चित्रित केलें आहे. पण प्रा. हर्षे ह्यांनीं 'मार भरारी। चल तोड बंधनें सारीं'। ह्या कवितेच्या ध्रुपदाचा अर्थ भलताच केलेला आहे. हे म्हणतात "वैवाहिक बंधनांनीं पुढें गडकरी जखडले गेल्यानंतर एक वेळ सर्व बंधनें तोडून टाकून स्वैर भरारी मारण्याचाहि विचार त्यांच्या मनांत आलेला होता." टीकाकार दीडशहाणा असला म्हणजे तो लेखकाच्या कोणत्या लिखाणांतून काय अनर्थ काढील ह्याचा हा एक मासला आहे !

कल्पना हाच गडकऱ्यांच्या काव्याचा प्राण आहे. त्यांच्या एकेक उत्प्रेक्षा म्हणजे कल्पनेच्या आकाशामधल्या चंडोलाच्या उत्तुंग भराऱ्या होत. वीज जशी नाचते तशी त्यांची प्रतिभा तळपते. क्षणांत इथें तर क्षणांत कुठें ? दहा वर्षांच्या एका सुंदर मुलीला बघून आणि बागेंत बागडणाऱ्या एका लहानग्या बालकाला पाहून त्यांच्या प्रतिभेनें जें लालित्यपूर्ण शब्दांचें नि विलोल कल्पनांचें लास्य केलें आहे तें रसिक मनाला अक्षरशः मुग्ध करून टाकणारें आहे. ती मुलगी म्हणजे स्वर्ग आणि पृथ्वी यांतला जणुं काय सांधाच. तिच्या चिमण्या भुवया म्हणजे रामलक्ष्मणांचीं चिमुकलीं धनुष्येंच. तिच्या डोळ्यांत बालमदनानें आपल्या धनुर्विद्येची जणुं कांहीं 'तालीम' च सुरू केली आहे. तिच्या गालावरचे गोंदवणाचे ठिपके म्हणजे तिच्या भवितव्याचें ब्रह्मदेवानें मांडलेलें दशांश चिन्हाचें गणितच ! शब्दांची शाल न पांघरतांना धांवत सुटलेली ही एखाद्या कवीची तरळ कल्पनाच नव्हे काय ? अशा एकाहीपेक्षां एक बहारीच्या कल्पनांची गडकऱ्यांनीं कमाल करून सोडली आहे. ही कविता वाचतांना जाईजुईच्या फुलांनीं बहरलेल्या एखाद्या मांडवाखालीं बसल्यासारखें वाटतें. सर्वांगावर सुगंधी कळ्याफुलांचा जणुं सडाच पडतो आहे !

'बागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास' या कवितेमध्यें गडकऱ्यांची प्रतिभा कल्पनांच्या अर्धोन्मीलित फुलांवर एखाद्या फुलपांखराप्रमाणें भिरभिरते आहे असें वाटतें. बागेंत दिसणाऱ्या प्रत्येक सुंदर वस्तूमागें मूल अवखळपणें धांवतें आहे. तें बघून सृष्टीला आपला जणुं कांहीं हेवा वाटतो आहे आणि म्हणून ती आपल्या बाळाला आपल्यापासून फसवून दूर नेण्याचाच जणुं कांहीं प्रयत्न करीत आहे असें त्याच्या आईला वाटतें, ही

कल्पनाच अतीव काव्यमय आहे. त्या मानानें ' अरुण ' मोहक वाटत नाहीं. बालकवि ठोंबरे ह्यांच्या ' अरुणा ' पुढें तर तो निष्प्रभच वाटतो.

' हालत्या पिंपळपानास ' हा गडकऱ्यांच्या कल्पनाप्रधान काव्याचा एक अपूर्व सुंदर नमुना आहे. शेलेच्या ' Skylark ' शीं त्याची तुलना करून पाहण्यासारखी आहे. गडकऱ्यांच्या कल्पनाप्रधान काव्याचें वैशिष्ट्य हें आहे कीं त्यांतून कोमल भावनेचें एकादें अत्यंत सूक्ष्म असें सूत्र जात असतें. त्यामुळें त्यांच्या कल्पनेच्या वैभवानें आपले डोळे दिपताहेत तोंच मधेंच आपल्या हृदयाची तार ते अशा सफाईनें छेडतात कीं सर्वांगावर कोमल नि सुखद कंप उठतो. ' चिमुकल्या मुली ' ला बघून त्यांच्या मनांत चटकन् विचार येतो कीं हिच्या विशुद्ध मनांत क्षणभर जाऊन आपण आपलें कवित्व पावन करून घेऊं या ! या असल्या एका भावनेनें सबंध कविताच एकदम उजळून जाते. चिमुकल्या ' पिंपळपाना 'चा झाडाच्या शेंड्यावर अहर्निश चाललेला नाश बघून कवि एकदम आत्मलक्षी होतो. आणि त्याला विश्वाचीं सूत्रें हालविणाऱ्या अनेक सुप्त शक्तींची जाणीव होते. त्यामुळें जीवनांतील असहायतेचा त्याला प्रत्यय येऊन तो विषण्ण होतो. ...ल्यासारखेंच हें पिंपळपानहि दुर्दैवी दिसतें आहे, असा विचार त्याच्या मनांत येतो. आतां ह्याच भावनेंत जर ह्या कवितेचा शेवट झाला असता तर ती हृदयस्पर्शी झाली नसती. पण सर्वांगाचा उकाडा होत असतांना जशी एखादी वाऱ्याची झुळुक एकदम येऊन मनाला आल्हाद देऊन जाते त्याप्रमाणें विचारांनीं कविमन उदास झालें असतांना चटकन् त्याच्यापुढें एक रमणीय कल्पना चमकून जाते. एकाद्या प्रणयमुग्ध बालिकेच्या कपाळावर हालणारें ' पिंपळपान ' त्याच्या अंतःचक्षूंना दिसतें. आणि हा मान जर कोणी ' बाला ' आपल्याला देईल तर जन्मभर आपण तिच्या कपाळावरचें पिंपळपान होऊन राहूं या मधुर विचारांत तो आपली खिन्नता विसरून जातो. ह्या एका बहारीच्या कल्पनेनें त्या कवितेचा सारा आत्माच बदलून जातो.

' नवबालेच्या शिरावरचें पिंपळपान ' होण्याचा हा विचार इतका कोमल आणि पवित्र आहे कीं त्यांत कवीची वैषयिक भावना दडली आहे असा संशय सुद्धां कोणाला येऊं नये. पण गडकऱ्यांच्या प्रत्येक लेखनांतून त्यांचें चरित्र हुडकून काढण्याच्या वेडामुळें प्रा. वाळिंबे ह्यांनीं या सुंदर भावनेंतून

किती विपरीत अर्थ बाहेर काढला आहे तो पहा. ते म्हणतात, "तरुणीच्या प्रेमाच्या प्राप्तीसाठीं गडकऱ्यांचें मन किती विलक्षण आसावलें होतें व त्या संवेदनेमुळें उत्पन्न होणाऱ्या हृदयाच्या स्पंदनांतील थरथरणारी उत्सुकता अनुभवावयास सांपडावी यासाठीं ते किती तळमळत होते याचें प्रत्यंतर या 'हलत्या पिंपळपानां'त मिळेल." कवीच्या कोमल भावनेचा यापेक्षां अधिक कोणता उपमर्द करतां येईल ?

'राजहंस माझा निजला' ही गडकऱ्यांची कविता म्हणजे त्यांच्या वाग्वैजयंती' मधला कौस्तुभच होय. मराठी वाङ्मयांत यापेक्षां अधिक प्रभावी करुणरसाची कविता दुसरी नाहीं. हास्यरसाइतकेंच करुणरसावरहि गडकऱ्यांचें प्रभुत्व होतें. या कवितेच्या जन्माची हकीगत गडकऱ्यांच्या धाकट्या बंधूकडून मला कळली. सकाळीं अकराच्या सुमारास ते आपल्या माडीचें दार बंद करून ही कविता लिहावयास बसले. पाऊण तासांत ही कविता सबंध लिहून पुरी झाली. मध्येंच त्यांच्या बंधूनें त्यांना जेवावयास हांक मारली, तेव्हां ते चिडून त्याच्या अंगावर ओरडले, "मूर्खा, मराठी भाषेंतील एका अद्‌भुत कवितेला मी इथें जन्म देतों आहे हें तुला ठाऊक नाहीं वाटतें ?"

या कवितेचें मूळ हस्तलिखित मी पाहिलें होतें. पेन्सिलीमध्यें अगदीं घाईघाईनें सर्व कविता लिहिलेली होती. त्यांवरून स्फूर्तीच्या एका विशिष्ट अवस्थेंतच ही कविता लिहिली असावी हें उघड होतें. प्रकाशित कवितेपेक्षां मूळ कवितेमध्यें तीन चार कडवीं जास्त होतीं. तीं त्यांनींच स्वतः मागाहून कमी केलीं.

एका स्त्रीचा नवरा वारल्यानंतर थोड्या दिवसांच्या आंतच तिचें एकुलतें एक मूल वारलें. त्या दुःखाच्या आघातानें त्या दुर्दैवी आईला वेड कां बरें लागणार नाहीं ? तिला वाटलें आपला 'राजहंस' आपल्या मांडीवर झोपलाच आहे. या मनाच्या स्थितींत तिनें मुलाला उचलावयाला जमणाऱ्या मंडळींना उद्देशून जे उद्गार काढले त्यांत दगडाला पाझर फोडणारें कारुण्य आहे.

'करूं नका गलबला अगदीं । लागली झोप मम बाळा'॥ या तिच्या

तोंडून बाहेर पडणाऱ्या पहिल्याच ओळी ऐकून हृदयाची कालवाकालव व्हावयाला सुरुवात होते. " हें दूध जरासा प्याला, आतांसा कोठें निजला ! तों इतक्यांत तुम्ही जमलांत ? मी तुम्हांला चांगली ओळखून आहे. मागें माझा हिरा नेलांत—अन् आतां ही हिरकणी न्यायला आलांत होय ? माझ्या छबकड्याबद्दल वाईटवाईट बोलूं नका. मी गरीब कितीहि असलें, जरि कपाळ माझें फुटलें, बोलणें तरी हें असलें, खपणार नाहीं हो मजला ! हें असेंच सांगून मागें, तुम्ही माझ्या जिवाचा राजा नेलात. पुन्हां दाखविलं सुद्धां नाहींत त्याला आणि आतां माझा हा राजहंस न्यायला आलांत होय ? एवढा का दुष्टावा तुम्ही माझ्याशीं करतां ? "

हृदयाला पीळ पाडणाऱ्या या सर्व भाषेची गंमत ही आहे कीं त्यांत प्रत्यक्ष शोक असा कुठेंच नाहीं. त्यामुळें तिचा मनावर जास्त परिणाम होतो. आपलें मूल मरण पावलें आहे, असें आईला कळून तिनें शोक केला असतां तर तो इतका प्रभावी झाला नसता. प्रारंभींची एवढी भाषा झाल्यानंतर आई जेव्हां आपल्या ' राजहंसा ' च्या सौंदर्याचें आणि गुणांचें वर्णन करूं लागली, ' तेव्हां भोंवतालच्या चार जनां'च्या डोळयांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या असतील. तें दृश्य पाहिल्यावर मग आईच्या डोक्यांतला भ्रम विरघळून गेला आणि मग आपलें मूल खरोखरच मरण पावलें आहे हें तिला उमगलें. त्याबरोबर ' हें असें जाहलें म्हणतां ! तरि देवचि निजला कां हो ? ' ही पहिलीच तिच्या शोकाची ओळ इतकी विलक्षण प्रभावी आहे कीं ती काळजाचा पडदा फोडून आरपार निघून जाते.

' जरि होऊं नये तें झालें ! तरि सोडणार या नाहीं, पाळणाहि रुततो ज्याला, प्रेमें जरि निजवी आई, तो देह खांचदगडांत, छे नको नको ग बाई ! ' येथें ह्या शोकाची अगदीं परिसीमा होते. आणि मग ती आई आपल्या मृत बाळाला हृदयाशीं धरून जी निजते, ती पुन्हां उठतच नाहीं. भ्रम, शोक आणि अकस्मात् मरण अशा ह्या कवितेच्या तीन अवस्था आहेत, त्या मानसशास्त्राला धरूनच आहेत. कोणत्याहि कवितेचें मूल्यमापन करतांना तिचा मनावर परिणाम काय होतो हें अजमावून पहावें. कविता ही कांहीं वाचण्याची वस्तु नाहीं. ती मोठयानें म्हणून पहावी. गाऊन बघावी.

भावनापूर्ण स्वरांत ‘ राजहंस ’ म्हणावा. म्हणजे श्रोत्यांच्या आणि विशेषत: स्त्रियांच्या मनाची काय स्थिति होते तें प्रत्यक्षच पहावयाला सांपडेल. हातच्या कांकणाला आरसा कशाला पाहिजे ?

असें असूनहि ह्या कवितेवर थोडीशी टीका झाली, ती अशी. रे. नारायण वामन टिळक म्हणाले कीं, “ पुत्रमरणाच्या दु:खानें वेडी झालेली आई, या माझ्या मानससरसीं ’ सारखी संस्कृतप्रचुर आणि रूपकात्मक भाषा वापरील काय ? ” हा आक्षेप चुकीचा आहे आणि अयोग्यहि आहे. एक अडाणी स्त्री मुंबईच्या रस्त्यांत मोटारखालीं चिरडून मरण पावलेल्या आपल्या मुलाबद्दल शोक करतांना मी प्रत्यक्षच ऐकली आहे. ती आपल्या मुलावर ‘ माझ्या हिऱ्या, माझ्या माणका, माझ्या चंद्रा—अशा विशेषणांचा वर्षाव करीत होती. भावनाप्रक्षोभाच्या प्रसंगीं आपलें नेहमींचें स्वरूप सोडून आलंकारिक होण्याकडे भाषेची मुळीं प्रवृत्तिच असते. आणि दुसरी गोष्ट अशी कीं कोणी कांहींहि म्हटलें तरी वाङ्मयांतली भाषा ही वाङ्मयकाराचीच असते. त्यांतील वर्ण्य व्यक्तीची नसते. वाङ्मयकारांनीं त्या भाषेंत वास्तववादाचा कितीहि आभास निर्माण करण्याचा प्रयत्न केला तरी माध्यमाच्या कांहीं मर्यादा ठरलेल्या आहेत. त्या टीकाकारांनीं ओळखावयाला हव्यात. एखाद्या व्यक्तीचें चित्र किंवा पुतळा कितीहि उत्तम असला तरी तो संपूर्णपणें त्या व्यक्तीसारखा कसा दिसेल ? तसेंच भाषेचेंहि आहे. टिळकांनीं घेतलेला आक्षेप जगांतल्या प्रत्येक वाङ्मयावर घेतां येण्यासारखा आहे. जगांतलीं माणसें जशीं बोलतात तसें लिहिलें तर त्यांतून ‘ वाङ्मय ’ निर्माण होणार नाहीं. त्यांनीं कसें बोलावें असें लेखकाला जें वाटतें, तें वाङ्मय.

प्रा. हर्षे ह्यांनीं आपल्या ‘ गोविंदाग्रज ’ या पुस्तकांत ‘ ‘ राजहंसा ’वर जी पांच सहा पानांची टीका केली आहे त्यापेक्षां अधिक अडाणीपणाची आणि अरसिकपणाची टीका मी माझ्या आयुष्यांत वाचली नाहीं. काव्यपरीक्षण कसें करूं नये याचा तो एक नमुना आहे, त्यांतला एक हास्यापद मासला येथें देतों. ‘ राजहंसा ’ तली विधवा माता आपल्या मृत पतीच्या चरणीं अर्पण करण्यासाठीं अश्रूंची ‘ वैजयंति मोहनमाळा ’ गुंफीत बसली होती. आपला पुत्र हा त्या अश्रूंच्या माळेंतला ‘ कौस्तुभमणि ’ आहे असें ती म्हणते. त्याला उद्देशून प्रा. हर्षे म्हणतात, “ अश्रूंच्या वैजयतींत जड

शरीरान्वित राजहंस हा कौस्तुभमणि कसा काय बसणार ? त्याच्या भारानें ती मोहनमाळ तुटून नाहीं का पडणार ? हें कोडें कांहीं केल्या उलगडत नाहीं. ”

प्रा. हर्षे यांना हें कोडें आयुष्यभर उलगडणार नाहीं. कारण तें कोडें उलगडायला जें ‘ डोक्या ’ चें भांडवल लागतें तेंच त्यांच्याजवळ नाहीं. प्रा. हर्षे ह्यांच्यासारख्या टीकाकारांना उत्तर देणें अशक्य आहे. ‘ लोकमान्य टिळक हे महाराष्ट्राचे सिंह होते ’ असें कोणी म्हटलें कीं प्रा. हर्षे शंका काढायचे “ लोकमान्यांना आयाळ कुठें आहे. ? शेपूट कुठें आहे ? उगाच भलतें काय बोलतांहात ? ” किंवा एकादा बाप आपल्या सुंदर मुलीला हृदयाशीं धरून मोठ्या कौतुकानें म्हणाला, “ माझी पोरगी म्हणजे नुसती बिजली आहे ! ” कीं प्रा. हर्षे त्याला विचारावयाचे, “ मग तुम्ही ह्या बिजलीला आपल्या हृदयाशीं कसें धरतां ? तिच्या धक्क्यानें तुम्ही मरत कसें नाहीं ? ” कल्पना आणि वास्तव ह्यांची गल्लत करण्याचा प्रयत्न असाच हास्यास्पद होतो.

‘ अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस ’ हें एक करुणरम्य भावकाव्य आहे. बाह्य सृष्टि आणि अंत:सृष्टि ह्यांचा सुरेल समन्वय घालण्याचा हा एक अत्यंत कलात्मक प्रयत्न आहे. रचना आणि भावना ह्यांची फारच कोमल गुंफण ह्या काव्यांत केलेली आढळते. ‘ केशवसुत मेले ? ’ ही एक सामान्य कविता आहे. शिष्यानें आपल्या गुरूच्या चरणीं भक्तिभावानें केलेलें काव्यमय वंदन एवढेंच त्याला महत्त्व आहे. ‘ वाग्देवीनें स्वर्गांतून जे सुधाकुंभ ओतले ते पृथ्वीवर केशवसुतांनीं आपल्या हृदयामध्यें झेलले आणि आपल्या श्वासाच्या कारंजानें चहुंकडे उधळून दिलें ’ असें या कवितेच्या दुसऱ्या कडव्यांत गोविंदाग्रजांनीं जें रूपक कल्पिलेलें आहे, त्यावर प्रा. हर्षे यांनीं ‘ राजहंसा ’ प्रमाणेंच जी मासलेवाईक टीका केली आहे ती वाचून दुसरा कांहीं फायदा झाला नाहीं तरी करमणूक मात्र खास होईल.

हर्षे म्हणतात, “ वाग्देवीनें स्वर्गांतून सुधाकुंभ खालीं ओतले खरे; पण त्या सुधेची धार अस्मानांतून नेमकी कवीच्या हृदयांत कशीं पडावी ? बरें स्वर्गापासून पृथ्वीच्या प्रवासांत त्या धारेंतला बारीकसा एकादा थेंब तरी भक्ताच्या वांट्यास येईल काय ? वाटेंत अडचणी किती ? सूर्याच्या तापानें ती धार आटून जाईल. नाहींतर हिमरेषेनें गोठून जाईल. पुन्हां मधें मेघाचें छत आहे. त्यांतून ती धार खालीं गळालीच तर वारा तिच्यांतले कांहीं थेंब

लुबाडणार. कांहीं चातकपक्षी पिणार. कांहीं झाडांच्या पानांवर पडणार. मग त्याच्यांतले कितीसे थेंब केशवसुतांच्या हृदयावर पडणार?" काव्याचें असलें पोरकट विश्लेषण करणारा दीडशहाणा टीकाकार जगांत कुठें तरी आढळेल काय?

'स्वर्ग, वाग्देवी, सुधाकुंभ, हृदयांत झेलणें' ह्या सर्वच मुळीं कविकल्पना! त्यांच्याशीं ऊन्ह, हिमरेषा, मेघ, चातक, झाडें ह्या सत्य वस्तूंची गल्लत करून गडकऱ्यांना हास्यास्पद करण्याचा हर्षे यांनीं जो प्रयत्न केला आहे तो नेमका त्यांच्याच गळयांत उलटला आहे. मेघांच्या छतांत सुधेचे थेंब अडण्याची शक्यता ज्या हर्षांना वाटते, त्यांच्या भौगोलिक ज्ञानाची जेवढी तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. वाग्देवीनें पृथ्वीवर ओतलेल्या सुधाकुंभांतले किती थेंब खालीं पोहोंचले असतील ह्याची प्रा. हर्षे यांना शंका वाटते. अन् मग समुद्र-मंथनांतून निर्माण झालेल्या अमृताचा कुंभ जेव्हां श्रीविष्णूनें गरुडावर पळवून नेला तेव्हां त्यांतले नेमके चार थेंब चार क्षेत्रांच्याच ठिकाणीं पडले ही गोष्ट भारतातील लक्षावधि लोकांना खरी कशी वाटते? तेवढ्यासाठीं दर बारा वर्षांनीं विराट् कुंभ यात्रा भरते ना? पुराणांतल्या या कथेबाबत उघडपणें संशय घेणारा एकहि 'हर्षे' अद्याप निर्माण झालेला नाहीं.

'घुंगुरवाळा' हें गडकऱ्यांचें एक अत्यंत श्रवणमधुर आणि भावसुंदर गीत आहे. गडकऱ्यांचें फारच थोडें काव्य गेय आहे. त्यांच्या गेय काव्यांत या गीताचा प्रामुख्यानें समावेश करितां येईल. पतिप्रेमाचें जें गूढरम्य संगीत स्त्रीच्या अंतःकरणांत लपलेलें असतें, त्याचें अस्फुट सूर तिला आपल्या बाळाच्या पायाभोंवतीं रुमझुमणाऱ्या घुंगुरवाळयाच्या नादांत प्रगट होत असलेले ऐकूं येतात, पण आमच्या प्रा. हर्षांना हें गाणें 'अश्लील आणि वैषयिक' वाटतें. छे, छे, गडकऱ्यांच्या काव्याबद्दल बोलतांना पुन्हां हर्षे ह्यांचें नांव सुद्धां घेणें नको. 'भीमक-बाळा' आणि 'स्मृतिगीत' या गीतांची गोडी अवर्णनीय आहे. त्यांची रचना इतकी बाळबोध आणि अभिजात आहे कीं कोणा तरी एखाद्या जुन्या कवीची वा कवियत्रीचीं तीं गाणीं असावींत असा भास होतो.

समकालीन कवींत बालकवि ठोंबरे ह्यांच्यावर गडकऱ्यांचें अधिक प्रेम होतें. 'बालकवि' त्यांच्यापेक्षां वयानें लहान होते. पण त्यांच्याबद्दल

गडकऱ्यांना अतिशय आदर वाटत असे. गडकऱ्यांसारख्या स्वतंत्र बुद्धीच्या कवीलाहि कित्येकदां ' बालकवीं ' चें अनुकरण करण्याचा मोह आवरतां आलेला नाहीं. उभयतांचे कित्येक काव्यमय संवाद ऐकण्याचें भाग्य मला लाभलें होतें. बालकवींचा ' नव कवितेच्या जरिपटक्याचा अधिकार ' गडकऱ्यांनीं ह्या कवितेंत मान्य करून त्यांच्या कवितेचा फार मोठा गौरव केलेला आहे. ' बालकवीं ' ना आगगाडीखालीं अपघाती मृत्यु जर आला नसता तर त्यांनीं ' नव कवितेचा जरिपटका ' महाराष्ट्रांत मोठ्या दिमाखानें नाचवला असता ह्यांत काय संशय !

' श्री महाराष्ट्रगीत ' आणि ' कृष्णाकांठीं कुंडल ' या दोन्हीही अपुऱ्या कविता एकाच मराठमोळ्या धाटणीनें लिहिलेल्या असून त्यांमध्यें प्रकट झालेला गडकऱ्यांचा महाराष्ट्र-अभिमान आणि मराठी बाणा मराठी भाषिकांना निःसंशय आल्हाद देणारा आहे. श्रीमहाराष्ट्रगीत हें वस्तुतः ' गीत ' नव्हे, तो ' महाराष्ट्राचा पोवाडा ' आहे. महाराष्ट्राच्या भूगोलाचें, वाङ्मयाचें आणि इतिहासाचें असें ठसकेबाज आणि काव्यमय वर्णन क्वचितच दुसऱ्या कोणीं केलें असेल.

' कृष्णाकांठीं कुंडल ' ही शिवकालीन वीराची एक शोकान्त प्रणय-कथा होती. तिचीं जीं त्रोटक कडवीं गडकऱ्यांनीं रचून ठेवलेलीं आहेत त्यांतून या कथेचा बराच बोध होतो. शिवाजी महाराजांचा एक शूर आणि एकनिष्ठ शिपाई ' रायबागचा राया ' म्हणून होता. त्याचें कुंडल येथें रहाणाऱ्या माने ह्या मराठा घराण्यांतील मैना नांवाच्या मुलीवर प्रेम बसतें. उभयतांची गांठ कृष्णेकांठीं असलेल्या सुंदर राईत पडली असावी. तेथेंच कृष्णाबाईला साक्ष ठेवून दोघेहि विवाहबद्ध झालीं. मैना रायाला म्हणाली, " मला तुमच्याबरोबर घेऊन चला." राया म्हणाला, " आम्ही शिवरायाचे शिपाई म्हणजे वाऱ्यावरचे तीर ! पळत्या पायावरचा आमचा इमला. रानगांवचे आम्ही राजे. तूं आमच्याबरोबर कुठें येणार ? वाघाबरोबर त्याची वाघीण थोडीच हिंडते ! " मैना चिडून म्हणाली, " शिवनेरीच्या शिवरायांनीं हीच का पोपटपंची तुम्हांला शिकविली आहे ? तुम्ही जाल तिथें प्रीतीच्या पंखांनीं मी उडत उडत येईन." तरी देखील तिला बरोबर घेऊन जायला तो तयार झाला नाहीं.

पुढें राया मुलूखगिरीवर निघून गेला. त्याची पुष्कळ दिवस बातमी आली नाहीं, म्हणून मैना फार दु:खी झाली. झाडावरच्या एका मैनेला आपल्या प्रियकराची बातमी आणावयाला तिनें सांगितलें. ती तिला म्हणाली, " तुझा राघू जसा बेमान झाला असेल, तसाच माझा रायबागचा राघू माझी मान कापून गेला कीं काय कोण जाणें ? " पुढें रायाजी लढाईंत कामास आला. मैनेच्या गळयांतलें ' मंगळसूत्र ' तोडून त्यांतले मणिरायाजीनें शिवरायाच्या शिरपेंचांत खोंवले. प्रिय पतीच्या मरणाचें दु:ख असह्य होऊन पुढें मैना मरण पावली.

ज्योत ज्योतिला मिळुनी गेली, माती मातीलाही
कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं !

आज कुंडल हें गांव कृष्णाकांठीं नसतांना तें गडकऱ्यांनीं तेथें नेऊन कां वसविलें अशी कांहीं टीकाकारांनीं शंका प्रकट केली आहे. पण त्याचें उत्तर हें खंडकाव्य पूर्ण झालें असतें म्हणजे मिळालें असतें. त्यासंबंधीं बोलतांना गडकरी मला त्या वेळीं म्हणाले, " रायाजीच्या मृत्यूची बातमी ऐकून मैनेनें त्या वेळीं एवढा शोक केला कीं तो कृष्णा नदीला ऐकवेना म्हणून ती कुंडल गांवापासून कित्येक मैल दूर हटली. " किती काव्यमय कल्पना आहे ही ! असल्या धाडसी कल्पना केवळ गडकऱ्यांनींच आपल्या डोक्यांतून काढाव्यात ' कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं, ' तें कां ह्याचें रहस्य हें होतें. ' राज-संन्यासां 'त गडकऱ्यांनीं जी शाहिरी मराठी शैली वापरलेली आहे, तिची रंगीत तालीम म्हणजे ' कृष्णाकांठीं कुंडल ' ही कविता होय.

गडकऱ्यांचें गद्य विनोदी लिखाण ज्यांनीं वाचलें असेल त्यांना त्यांची विनोदी कविता फारच आळणी वाटेल. ' ठकीचें लग्न ', ' स्वयंपाकघरांतील गोष्टी ' ह्या लेखांतील हृदयंगम विनोदाच्या पासंगालाहि त्यांच्या काव्यामधला विनोद पुरणार नाहीं. ' चिंतातुर जन्तु ' ही कविता विनोदाच्या सदरांत घातली गेली असली तरी तिच्यांत विनोद नाहीं. जळजळीत उपरोध आहे. गडकऱ्यांचा एक मित्र होता. ( अजून तो आहेच. ) मोठा सत्प्रवृत्त माणूस. पण बुद्धीनें बेतासबात. गडकऱ्यांना तो विनाकारण कांहीं तरी प्रश्न विचारून सतावावयाचा. जगांतल्या सर्वसामान्य अडाणी माणसाचा तो एक प्रातिनिधिक नमुना आहे असें समजून गडकऱ्यांनीं ही कविता लिहिली.

परमेश्वराच्या कार्याबद्दल ह्या लोकांच्या मनांत सदैव आपल्या शंका ! ह्याचें काय होईल न् त्याचें काय होईल ? म्हणून गडकरी देवाला विनवतात कीं, " देवा बाकीचा तुमचा उद्योग क्षणभर बाजूला ठेवा अन् या चिंतातुर जन्तूच्या मनाचें अगोदर समाधान करा ! "

' एखाद्याचें नशीब ' ही गडकऱ्यांची एक अत्यंत अभिजात कविता आहे. जगांतल्या दु:खितांबद्दल त्यांच्या अंत:करणांत किती सूक्ष्म सहानुभूति वसत होती, ह्याचा हा एक हृदयस्पर्शी पुरावा आहे. ह्या कवितेचें हस्तलिखित माझ्या संग्रहीं आहे. त्यांत मूळ तिसरा श्लोक असा होता :

मेघावीण जलाशया न गणुनी एकाग्रनिष्ठा धरी
जो जो चातक मागुती जलकणा एकस्थ सौख्या करी,
देतीहि धन त्यास त्यास जल तें होती सुखी सर्व तें
एखाद्यावर मात्र वीज पडुनी सर्वस्व संहारिते !

हा श्लोक नंतर काढून टाकून त्याऐवजीं त्यांनीं पुढील श्लोक रचला.

झाडें जोडुनि पत्रयुग्म फुटलें मेघाप्रती याचती
स्वच्छंदें जलबिंदु तींच सगळया पानावरी नाचती !
सारीं पालवतीं फुलें विरहती शोभा वरी लोळते
एखाद्यावर मात्र वीज पडुनी त्या जाळते पोळते !

ह्या दोन श्लोकांतला फरक लक्षांत घेतला म्हणजे आपल्या काव्याची रचना कलात्मक आणि ध्वनिसुंदर करण्याच्या कामीं गडकरी किती जागरूक होते हें कळून येईल.

गडकरी हे अत्यंत भाविक होते. त्यांच्या उशाशीं शंकराच्या आणि विटोबाच्या दोन लहान तसबिरी ठेवलेल्या असून तुकाराम आणि नामदेव ह्यांच्या अभंगाचें ते अहर्निश परिशीलन करीत. एकादशीहि ते करीत असत. दर एकादशीला ते भक्तिभावानें एक अभंग रचीत. अशा एकादश अभंगांचा संग्रह त्यांनीं ' अनामिकाचे अभंग ' ह्या मथळयानें प्रसिद्ध केला. ह्यावरून संतांच्याबद्दल त्यांच्या मनांत केवढा आदरभाव वसत असला पाहिजे हें दिसून येतें. संतांच्या क्षेत्रांत पाऊल टाकतांना स्वत:चें नांव उच्चारण्याचें सुद्धां त्यांना भय वाटतें. संतांची वाणी गडकऱ्यांनीं किती आत्मसात् केली होती हें ह्या अभंगांवरून दिसून येईल. " तुझें नांव ज्यांनीं घेतलें त्यांचा

देवा, तूं उद्धार केलास. पण तुझा माझा दावा आहे. मी तुझ नांवहि घेत नाहीं. बघूं तूं माझा कसा उद्धार करतोस ! तुझ्या थोरपणाची मी आतां परीक्षाच घेतों. माझें पाप एवढें आहे कीं तुला माझ्याकडे ओढून आणण्याचा तोच माझा अधिकार आहे. " हें या अभंगांतलें सूत्र मोठें हृदयद्रावक आहे.

'विरामचिन्हें' ही कविताहि ' एखाद्याच्या नशिबा ' प्रमाणें गडकऱ्यांची एक अविस्मरणीय कविता आहे. गडकऱ्यांच्या तरल कल्पनाशक्तीचा हा एक तेजस्वी नमुना आहे. व्याकरणांतलीं विरामचिन्हें जीवनामध्येंहि जो पाहूं शकतो त्याची प्रतिभा काय सामान्य कोटींतली आहे ? ' फूल ना फुलाची पाकळी ' हें गडकऱ्यांचें आत्मसमर्थन आहे. त्यांच्या मृत्यूनंतर अलौकिक कीर्ति त्यांना प्राप्त झाली खरी, तथापि त्यांच्या चरित्राची निंदाहि कांहीं कमी झाली नाहीं. तेवढी त्यांच्या हयातींत जरी झाली नसली, तरी त्यांची हेटाळणी करणारी कुत्सित मंडळीहि त्यांच्या काळामध्यें कांहीं कमी नव्हती. त्यांना गडकऱ्यांनीं दिलेलें हें उत्तर आहे. ही कविता लिहून झाल्यानंतर थोड्याच वेळानें मला ती वाचायला मिळाली. त्यामुळें गडकऱ्यांचें त्या कवितेवरील भाष्यहि मला त्यांच्या तोंडूनच ऐकावयास सांपडलें. ते म्हणाले, " कवि म्हणून मी जनतेसमोर प्रकट होतों, व्यक्ति म्हणून नव्हे. माझ्या काव्यावर टीका करण्याचा जनतेला अधिकार आहे. मग लोक माझ्या व्यक्तिगत जीवनावर कां टीका करतात ? " प्रसिद्ध पुरुषांच्या खाजगी जीवनाकडे कुत्सितपणें पहावयाचें हा महाराष्ट्रांतल्या कांहीं लोकांचा फार जुना धंदा आहे. गडकरी तरी त्याला अपवाद कां असावेत ?

' मुरली ' ही ' राजहंसा ' एवढीच गडकऱ्यांची लोकप्रिय कविता आहे, किंबहुना, ' मुरली ' आणि ' राजहंस ' ह्या दोनच कवितांवर गडकऱ्यांच्या काव्यकीर्तीचा मनोरा उभा आहे. श्रीकृष्णाच्या ' मुरली ' वर मराठी भाषेंत प्राचीन काळापासून तों आतांपर्यंत शेंकडों काव्यें लिहिलेलीं असतील. पण त्यांपैकीं किती लोकांच्या स्मरणांत असतील ? जुन्या गाण्यांपैकीं तर ' मुरली ' वरचें एकच गाणें मला आठवलें

जळो जळो देवा तुझी मुरली,
तुझ्या मुरलीनें शुद्ध माझी हरली !

आम्हीं मिळून गौळणी,
जातो यमुना जीवनीं,
तुझ्या मुरलीचा ध्वनि
मी ऐकिला कानीं,
तेव्हां घागर माझी पाझरली !

पण सर्व ' मुरली गीतां 'त गडकऱ्यांच्या 'मुरली' सारखें नादमधुर आणि हृदयंगम गीत दुसरें नाहीं. तें एक नितांत सुंदर रूपक आहे. ईश्वरी साक्षात्कारासाठीं भक्ताचें हृदय कसें तळमळतें हें श्रीकृष्णाचा मुरलीध्वनि ऐकावयास आतुर झालेल्या राधेच्या व्याकुळ मानसिक अवस्थेचें भावपूर्ण चित्र रेखाटून गडकऱ्यांनीं सांगितलें आहे. ह्या गाण्यांत प्रकट झालेलें गडकऱ्यांच्या कवित्वाचें वैभव अक्षरश: डोळे दिपवून टाकणारें आहे.

पुष्पाविण येई वास
वाऱ्याविण चाले श्वास
हर्षाविण आतां हास
मरणाविण सुटका झाली

किंवा

श्वासें मज हृदयीं भरवी
नादें कीं ओढुनि नेई
चुंबनेंच कीं मज बनवी
तव ओठावरली लाली !

हा आधुनिक मराठी काव्यांतील प्रतिभेचा निःसंशय उच्चांकच आहे. नदीचें पाणी आल्यानें चढूं लागलेलें असें डोळयांना दिसतें, तसें राधेच्या क्षणोक्षणीं वाढत चाललेल्या उत्कंठेचें आणि उन्मादाचें चित्र प्रत्यक्ष बघावयाला आणि अनुभवायला सांपडतें. 'बावरी राधिका बनली,' 'ना तरी राधिका मुकली,' 'कुणीकडे राधिका भकलि,' 'कृष्णांत राधिका रमली' आणि 'चहुंकडेच राधा झुकली' या प्रीती उत्तानतेच्या पांच पायऱ्या चढत चढत राधा श्रीकृष्णाकडे आपल्या डोळयांपुढून चाललेली आहे असें वाटतें आणि डोकें धुंद होतें आणि मग

उरलें न शीत वा उष्ण
कांहीं न शुभ्र वा कृष्ण
एकरूप राधाकृष्ण
जयनाद गात ही मुरली

अशी त्या दिव्य मुरलीच्या संगीतांत आपलीहि समाधि लागते. शुद्ध प्रेमाचें इतकें उन्मादक वर्णन कुठल्याहि भाषेंत कुणा कवीनें केलें नसेल. भावसमाधि लावण्यांत ह्या कवितेइतकें दुसरें प्रभावी साधन भक्तास आढळणार नाहीं.

भोगुनी तापमय उष्णा
मुरलीची लागतां तृष्णा
मग गाईल राधाकृष्णा
ही साक्ष मनोमन मुरली !

हें कडवें गडकऱ्यांचें अत्यंत आवडतें होतें. तें स्वतःशीं गुणगुणतांना त्यांना मी किती वेळां तरी ऐकलेलें आहे. खरेंच संसाराच्या उष्णतेनें दग्ध झालेल्या जगाला राधाकृष्णाच्या 'मुरली' चें जसें सतत स्मरण होत राहील त्याप्रमाणें जगामधील भावशून्य जीवनानें विटलेल्या आर्त मराठी मनाला गोविंदाग्रजांची 'मुरली' सदैव तृप्ति आणि तुष्टि देत राहील.

'फुटकी तपेली' ही गडकऱ्यांची एक अध्यात्मिक कविता आहे. अध्यात्माची तोंड ओळख असल्याखेरीज या कवितेचा अर्थ कळणें जड जाईल. आपल्या डोळ्यांना हें जग दिसतें आहे, तो परमेश्वरानें निर्माण केलेला एक आभास आहे. त्यालाच माया म्हणतात. या मायेच्या आवरणांत परमेश्वर लपलेला आहे. तें आवरण दूर केल्यावांचून जीवात्म्याला परमात्म्याचें दर्शन होणार नाहीं. परमात्म्याची भेट होणें ह्यालाच मोक्षप्राप्ति म्हणतात. मोक्षाच्या वाटेवरचा जीवात्म्याचा हा प्रवास किती जन्मांमधून तरी करावयाचा आहे ? 'आरंभाच्या शेवटापासून तों शेवटाच्या आरंभापर्यंत' कैक अनंतें त्याला भराभर ओलांडावयाचीं आहेत ! परमात्म्याच्या भेटीची जीवाला एकसारखी तहान लागलेली असते. तो सारखा पाणी पाणी करीत असतो. पण त्याच्या जवळ 'माये'ची जी तपेली असते ती असते फुटकी. ह्या तपेलींत आत्मज्ञाना' चें पाणी कसें टिकून रहाणार ? तें सारखें गळणारच.

आत्मज्ञानाचें पाणी जोंपर्यंत जीवात्म्याला प्यायला मिळत नाहीं, म्हणजे स्वतःची ओळख स्वतःला जोंपर्यंत होत नाहीं, तोंपर्यंत परमात्मा कसा भेटणार ? अन् मोक्ष तरी कसा मिळणार ? या मायामोहांत जीवात्मा जोंपर्यंत गुरफटून रहातो, तोंपर्यंत मोक्षाच्या वाटेवर त्याची प्रगति होऊं शकत नाहीं. म्हणून ह्या प्रवासांत मला ही मायेची फुटकी तपेली नको, कारण ती जोंपर्यंत आहे तोंपर्यंत आत्मज्ञानाचें पाणी मला प्यायला मिळण्याची आशा नको, असें कवीनें एकसारखें तळमळून सांगितलें आहे. मोक्षाचा प्रवास सोपा नाहीं. त्याचे कायदे फार कडक आहेत. जीवात्म्याच्या हातून जरा कांहीं चूक झाली कीं त्याचा अधःपात होतो आणि पुन्हां पहिल्यापासून त्याला प्रवास करावा लागतो.

मानव जन्म प्राप्त होईपर्यंत जीवात्म्याला किती तरी योनीमधून जावें लागतें. त्याच्याबरोबर प्रारंभापासून प्रवासाला निघालेले दुसरे प्राणी वाटेंतल्या वाटेंत खलास होतात. म्हणजे त्या त्या प्राण्यांची उत्क्रांति थांबते. त्या सर्वांचे संस्कार घेऊन जीवात्मा मानवदेहांत शिरतो. ज्यांच्या ओळखीची कांहीं जरूरी नाहीं अशांच्या ओळखी करून घेण्यांत जीवात्मा गुंगून रहातो आणि स्वतःची ओळख करून घ्यायचें मात्र सपशेल विसरतो. आत्मज्ञानाचें पाणी थोडें जरी प्यायला मिळालें तरी परमात्म्याच्या भेटीची तहान एकसारखी वाढत जाते. अशा वेळीं मायेचा फार उपसर्ग होतो. कारण ती विषयोपभोगाचें खोटें मृगजळ जीवात्म्याला पाजून त्याला परमात्म्याचा विसर पाडवते.

ब्रह्मांडाची तपेली ही खरी तपेली. म्हणजे ‘ हें विश्वचि माझें घर ’ असें जेव्हां जीवात्म्याला आत्मज्ञान होतें, तेव्हां मग परमात्म्याची भेट होऊन जीवात्म्याचा प्रवास संपतो. आणि त्याची तहान पूर्णपणें नष्ट होते. म्हणून आत्मज्ञानाचें पाणी जेव्हां सर्वस्वांत शिरेल आणि भरेल तेव्हां मोक्षाचा लाभ होईल ही ‘ अंदरकी बात ’ आहे. ‘ फुटक्या तपेली ’चा हा मी जो अर्थ लावला आहे त्याखेरीज तिचा दुसरा अर्थ संभवणार नाहीं असें नाहीं. अध्यात्मिक काव्यांत असें पुष्कळ वेळां होतें कीं कांहीं भाग गूढ असतो आणि त्याच्या अर्थासंबंधीं मतभेद होतो. कल्पनाचमत्कृति ह्या दृष्टीनेंच ‘ फुटक्या तपेली ’–कडे पहावें. अशीं रूपकें प्राचीन कवी पुष्कळदां रचीत असत.

कान्हा, तुझी घोंगडी चांगली
आम्हांस दिली का वांगली ?

हें ज्ञानदेवांचें गाणें असेंच आहे. देवा, तुमची घोंगडी तेवढी चांगली आहे. अन् मग आम्हांला ही अशी षड्रिपूंनीं भरलेली फाटकी घोंगडी कां बरें दिली ? असें मानवी शरीरावरचें हें रूपकगीत आहे.

' माझा मृत्युलेख ' ह्या कवितेचा शोध मलाच लागला. भूमितीच्या पुस्तकांत एका चतकोर वहीच्या कागदावर एका बाजूला कांहीं उदाहरणें सोडविलेली होतीं अन् दुसऱ्या बाजूला ही कविता लिहिलेली होती. माझी समजूत आहे कीं एखाद्या इंग्रजी कवितेचें हें रूपांतर असावें. कारण ' कोठें आणि कधीं तरीं जगति मी होऊन गेलों असें ' असा आपला मृत्युलेख ' अज्ञाता'ला लिहिण्याची पाळीं येईल एवढें कांहीं गडकरी स्वतःच्या सामर्थ्याबद्दल अज्ञानी नव्हते.

येथपर्यंत या संग्रहांतील काव्यांचें स्थूल विवेचन केल्यानंतर, आतां मराठी वाङ्मयांत कवि म्हणून गडकऱ्यांचें स्थान कोणतें ह्या प्रश्नाचा विचार ओघानेंच येतो. गडकऱ्यांच्या काव्यावर आजपर्यंत अनेक टीकाकारांनीं भाष्यें केलीं. पण गडकऱ्यांच्या काव्यगुणांचें यथार्थ मूल्यमापन करणारा टीकाकार अजूनहि कांहीं मला पहावयाला मिळाला नाहीं. गडकऱ्यांसंबंधीं नाना तऱ्हेचे पूर्वग्रह मनामध्यें बाळगून पुष्कळशा टीकाकारांनीं त्यांच्या काव्याचें परीक्षण केलेलें आहे. गडकऱ्यांच्या काव्याचे पहिले टीकाकार माडखोलकर. पण ते त्यांच्या काव्यावर टीका लिहावयाचे सोडून स्वतःचेंच काव्य रचीत बसले. वयानें आणि बुद्धीनें अत्यंत अपरिपक्व असतांना माडखोलकरांनीं ' आधुनिक कविपंचक ' हें पुस्तक लिहिलें. म्हणून केवळ कौतुकापलीकडे त्या पुस्तकाकडे अधिक गांभीर्यानें बघण्याचें कारण नाहीं.

त्यानंतर गडकऱ्यांच्या संपूर्ण काव्याचें परीक्षण करण्यासाठीं म्हणून प्रा. रा. ग. हर्षे ह्यांनीं ' गोविंदाग्रज ' हें स्वतंत्र पुस्तक लिहिलें. प्रा. हर्षे ह्यांनीं हें पुस्तक लिहितांना पुष्कळच श्रम घेतले आणि गडकऱ्यांच्या काव्याची खूपच उलथापालथ केली. पण काव्य कशाशीं खातात ह्याचें सामान्य ज्ञान सुद्धां प्रो. हर्षे ह्यांना नाहीं. काव्याचें विश्लेषण करण्याची त्यांची पद्धति किती हास्यापद आणि अडाणीपणाची आहे याचे दोनचार नमुने मागें मीं दिलेच आहेत. गडकऱ्यांच्या काव्याचें परीक्षण

करण्याऐवजीं त्यांनीं त्याचा ' पंचनामा ' केलेला आहे. काव्यपरीक्षण कसें करूं नये ह्याचा प्रा. हर्षे ह्यांनीं ' गोविंदाग्रज ' पुस्तक लिहून एक वस्तुपाठ दिला आहे म्हणाना.

वि. स. खांडेकरांनीं आपल्या ' गडकरी ' ह्या तीनशें पानी पुस्तकांत त्यांच्या काव्यावर सोळा सत्रा पानें खर्चीं घातलीं आहेत. तथापि, माडखोलकरांप्रमाणें टीका करण्याऐवजीं खांडेकरांनीं स्वतःचेंच काव्य रचण्याचा प्रयत्न केलेला आहे. ' चार बंधूंपैकीं गडकरी नांवानें राम असले तरी अनुक्रमानें लक्ष्मण होते ' असल्या शुष्क कोट्या करून का एखाद्या थोर कवीच्या व्यक्तित्वाचें वा वाङ्मयाचें मूल्यमापन होऊं शकते ? ' गडकऱ्यांच्या कवितेंत कल्पनाविलासाच्या मानानें रसोत्कटता कमी' हा त्यांचा निष्कर्ष अगदीं सकृद्दर्शनींच एकांगी वाटतो. हा आरोप कोल्हटकरांच्या लेखनावर फार तर करतां येईल. शृंगार, करुण आणि हास्य-रस ज्या गडकऱ्यांच्यापुढें हात जोडून सदैव सिद्ध असत त्यांच्या काव्यांत रसोत्कटता कमी असें म्हणणें कसें वाजवी होईल ? गडकऱ्यांच्या स्फुट काव्यांत त्यांचें चरित्र बघूं नये अशी सावधगिरीची सूचना देत देत स्वतः खांडेकरांनीं मात्र त्यांच्या ' वैयक्तिक दोषांबद्दल सहानुभुति वाटते ' असें सांगून त्यांची सर्वांत जास्त बदनामी केली आहे.

प्रा. रा. शं. वाळिंबे ह्यांनीं गडकऱ्यांच्या कवितांचें ' रसोद्ग्राही ' विवेचन करण्यासाठीं ' गडकऱ्यांचें अंतरंग ' हें प्रदीर्घ पुस्तक लिहिलें. प्रा. वाळिंबे ह्यांच्या अंगीं रसिकता आहे आणि काव्याचें वाङ्मयीन मूल्यमापन कसें करावें हें तंत्रहि त्यांना उत्तम अवगत आहे. पण गडकऱ्यांच्या काव्यांतून त्यांच्या चरित्रांतलीं रहस्यें शोधून काढण्याच्या त्यांच्या अतिरिक्त हव्यासामुळें हें त्यांचें विवेचन 'रसोद्ग्राही' व्हावयाच्या ऐवजीं 'रहस्योद्ग्राही' झालें आहे. त्यांच्या पुस्तकांतलें हें एक लहानसेंच उदाहरण घ्या. ' अरुण ' कवितेमध्यें गडकऱ्यांनीं कल्पनेचा अतिरेक केला असें सांगतांना प्रा. वाळिंबे म्हणतात, "खाजगी जीवनांत सुद्धां हाच विलक्षण अतिरेक गडकऱ्यांनीं प्रत्येक बाबतींत दाखविला. या अतिरेकी स्वभावामुळें संयम ही गोष्टच गडकऱ्यांना माहीत नव्हती. 'अतिरेक—सर्वत्र अतिरेक' हें गडकऱ्यांच्या जीवनाचें सार आहे."

खाजगी जीवनांत गडकरी अतिरेकी होते, त्यांना संयम माहीतच नव्हता

ही गोष्ट प्रा. वाळिंब ह्यांना कोणीं सांगितली ? गडकऱ्यांचें जीवन जणुं कांहीं सारें आपल्या डोळयांपुढें घडलें अशा अविर्भावानें वाळिंबे जे बोलतात, त्याचें मला मोठें आश्चर्य वाटतें. गडकरी खाजगी जीवनांत अतिरेकी होते हा त्यांच्या शत्रूंनीं त्यांच्या विरुद्ध केलेला द्वेषमूलक प्रचार होय. त्यावर विश्वास ठेवून आपले वाङ्मयीन निष्कर्ष टीकाकारांनीं काढीत बसावे, हा कोणत्या मुलखाचा शहाणपणा ? आणि घटकाभर असें समजलें कीं गडकरी हे जीवनांत अतिरेकी होते, तरी त्यामुळें आपल्या वाङ्मयांतहि ते अतिरेकी झाले हा निष्कर्ष कसा निघतो ? डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर हे खाण्याच्या कामीं अत्यंत आधाशी आणि अविचारी होते. म्हणून काय ते दुर्गुण त्यांच्या लेखनामध्यें प्रतिबिंबित झाले आहेत असें कोणाला म्हणतां येईल काय ? 'सर्वत्र अतिरेक हें गडकऱ्यांच्या जीवनाचें सार' हें जें वाळिंब्यांनीं काढलेलें आहे तें त्यांच्या वैचारिक गोंधळाचें निदर्शक आहे. अतिरेक नव्हे ! उत्कटता हें गडकऱ्यांच्या जीवनाचें सार आहे बरें वाळिंबे. ( बेटा देहू, भाषा नेहमीं बेतशुद्ध असावी ! ) गडकऱ्यांनीं आपलें सर्व लिखाण अत्यंत उत्कटतेनें लिहिलेलें आहे.

माडखोलकर आणि खांडेकर ह्यांच्याप्रमाणेंच टीका करतांना काव्य रचण्याची वाळिंबे ह्यांनाहि पण हुक्की आलेली आहे. हा त्यांच्या लेखनाचा एक नमुना पहा. " गडकऱ्यांच्या करुणासंकुल जीवनावर काळाचा पडदा पडूनहि बत्तीस वर्षें लोटलीं. समुद्राच्या किनाऱ्यावर पाण्याखालून वाळूचे कण झरझर निघून जातात, त्याप्रमाणें दिवसहि पाहतां पाहतां निघून जातात. 'हाय काय परि त्याचें' या भास्करराव तांब्यांच्या उक्तींत व्यक्त झालेलें पर्युत्सुकत्व प्रत्येक भावनावश मनाला व्यथित करीत असलें आणि 'निर्मल दंवकण जैसे गेले धरितां धरितां ते उडुनी' ह्या विचारानें आपण कष्टी होत असलों, तरी गडकऱ्यांनीं कवि व नाटककार या दृष्टीनें मिळविलेलें यश या काळांत प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणें वाढतच गेलेलें दिसून येईल."

" गडकऱ्यांना जाऊन बत्तीस वर्षें झालीं तरी कवि व नाटककार ह्या दृष्टीनें त्यांचें यश एकसारखें वाढतच गेलेलें आहे. " एवढें साधें वाक्य लिहावयाऐवजीं वाळिंब्यांनीं त्यासाठीं दोन अवतरणें आणि दहा वाक्यें खर्चीं टाकलीं आहेत. आणि शब्दांचा एवढा अतिरेक करून शेवटीं हे वाळिंबे गडकऱ्यांनाच

‘ अतिरेकी ’ ठरवतात ! हा चांगला न्याय आहे कीं नाहीं ? वाक्यांची वारेमाप उधळपट्टी आणि स्वतःच्या विद्वत्तेचें नि व्यासंगाचें प्रदर्शन करण्यासाठीं सर्वत्र उधळलेलीं अवतरणें ह्यामुळें वाळिंबे ह्यांचें पुस्तक भारी लांबलचक अन् कंटाळवाणें झालें आहे. शंभर पानांत त्यांना जी गोष्ट सांगतां आली असती, तिच्यासाठीं त्यांनीं तीनशें पानें खर्च केलेलीं आहेत.

कवीवर टीका करावयाची झाल्यास ती काव्यमय भाषेंत करावयाला हवी ही मराठी टीकाकारांची कोणी समजूत करून दिली आहे कुणास ठाऊक ! ह्या न्यायानें गायनाच्या टीकाकारानें गात गात नि नृत्याच्या टीकाकारानें नाचत नाचत बोलायला हवें ! गडकऱ्यांचें चारित्र्य संशयास्पद होतें, ते व्यसनी होते, अतिरेकी होते, वैषयिक होते, प्रेमनिराशेनें त्यांचें सर्व जीवन झांकळून गेलें होतें, त्यांचें जीवन कंटकमय, अपेशी व कारुण्यपूर्ण होतें, हे गडकऱ्यांच्या चरित्रासंबंधीं अनेक टीकाकारांनीं काढलेले निष्कर्ष खोटे तर आहेतच, पण त्यांच्या काव्याचें मूल्यमापन करण्याच्या दृष्टीनें ते सर्वस्वीं अनावश्यक आहेत. प्रा. माटे ह्यांच्यासारख्या प्रबुद्ध टीकाकारांचा ह्याच पूर्व-ग्रहामुळें गैरसमज होतो आणि ‘ मुरली ’ सारख्या शुद्ध प्रेमाच्या स्तोत्रांतहि ‘ इंद्रियसुखांचीं विलासवर्णनें वाचावयास लोभावलेल्यांना मनसोक्त डुंबावयास सांपडेल असा माजोरी रस’ त्यांना दिसू लागतो.

मराठी कवितेमधील गडकऱ्यांचें स्थान निश्चित करतांना केवळ त्यांच्या काव्यांतीलच गुणदोष विचारांत घ्यावयास हवेत. गडकऱ्यांनीं पुष्कळशीं प्रेमकाव्यें केलेलीं आहेत. म्हणून कांहीं टीकाकारांनीं त्यांना ‘ प्रेमाचे शाहीर ’ ही पदवी बहाल केलेली आहे. पण तेवढ्यानें कांहीं त्यांच्या कवितेचें यथार्थ वर्णन होऊं शकणार नाहीं. गडकरी हे कांहीं केवळ ‘ प्रीतीदेवीच्या पायांतला घुंगुरवाळा ’ नव्हते. आपल्या काव्याचें थोडेसें वैशिष्ठ्य ‘ नवशब्दांचे घुंगुर बांधुनि रसवंती माझी ’ ह्या ओळींत त्यांनीं स्वतःच प्रकट केलेलें आहे. गडकऱ्यांच्या रसवंतीच्या पायांत केवळ नवशब्दांचेच घुंगुर आहेत असें नाहीं, तर तिच्या मस्तकावर नव कल्पनांचा तेजस्वी शिरपेंचहि पण झळकतो आहे, तिकडे दुर्लक्ष्य करून चालणार नाहीं.

नवशब्द आणि नवकल्पना हें गडकऱ्यांच्या काव्याचें स्वरूप असलें

तरी उत्कट भावना हा त्यांच्या काव्याचा आत्मा आहे. त्यामुळें महाराष्ट्रांतल्या इतर सर्व कवींच्या काव्यापेक्षां गडकऱ्यांचें काव्य एकदम उठून दिसतें. केशवसुत, बालकवि, तांबे किंवा चंद्रशेखर ह्यांचें काव्य गुणांच्या दृष्टीनें गडकऱ्यांपेक्षां सुतराम्हि कमी नाहीं. किंबहुना कांहीं बाबतींत ते गडकऱ्यांपेक्षांहि उजवे आहेत. तथापि, ह्या सगळयांच्या कविता जर एका ओळीनें उभ्या राहिल्या तर रसिकांचें लक्ष प्रथम गोविंदाग्रजांच्या कवितेकडे जाईल यांत काय संशय ? त्यांच्या कवितेचा ढंग, नखरा अन् दिमाखच मुळीं निराळा आहे. नाविन्यानें ओथंबलेलें असें उत्कट काव्य मराठींत कोणीहि लिहिलेलें नाहीं. यामुळें गडकऱ्यांचें मराठी कवितेंमधलें स्थान अगदीं स्वतंत्र आहे.

‘ गुलाबी कोडें ’, ‘ राजहंस ’ किंवा ‘ मुरली ’ ह्या कविता गडकऱ्यां-खेरीज दुसऱ्या कोणी लिहिल्या असत्या अशी कल्पनाच करवत नाहीं; इतकें गडकऱ्यांच्या प्रतिभेचें वैशिष्टय त्यांत प्रभावीपणानें व्यक्त झालेलें आहे. केशवसुतादि कवींच्या काव्यांतलें सौंदर्य अंतर्मुख आहे. त्याचा यथार्थ प्रत्यय प्रथम दर्शनींच येत नाहीं. त्याच्याशीं जसजसा आपला परिचय वाढत जाईल, तसतसा त्याचा अनुभव येतो. त्याच्या उलट गडकऱ्यांच्या काव्याचा परिणाम होतो. प्रथमदर्शनींच आपण त्याच्या प्रेमपाशांत पडतों, एवढें त्याचें सौंदर्य बहिर्मुख आहे. गडकऱ्यांच्या काव्यांत दोष नाहींत असें नाहीं. अर्थात् आजपर्यंत टीकाकारांनीं जे दाखविले त्यापेक्षां ते निराळे आहेत. पण त्यांच्या गुणांच्या झगझगाटांत ते दोष लपून जातात.

गडकऱ्यांचीं कांहीं काव्यें हीं मराठी भाषेचीं तर अमर भूषणें म्हणून आज समजलीं जातात. विविध सामर्थ्याचे आणि प्रतिभेचे अनेक मोठे कवि महाराष्टांत आजपर्यंत होऊन गेले आणि पुढेंहि होतील. पण ‘ नवनवोन्मेष-शाली प्रतिभेचा एकमेव कवि ’ म्हणून गोविंदाग्रजांची कीर्ति मराठी साहित्यांत चिरकाल टिकून राहील ह्यांत मुळींच संशय नाहीं.

# गोविंदाग्रज

## [ कै. राम गणेश गडकरी : १८८५–१९१९ ]

“ यावज्जीवहि ‘ काय मी ’ न कळलें आतांप्रती नीटसें ।
मित्रांतेंहि कळे न गूढ—न कळे माझें मलाहि तसें ॥
अज्ञाता ! मरणोत्तर प्रकट तें होईल तूंतें कसें ?
कोठें आणि कधीं तरी जगतिं मी होऊन गेलों असे ॥ ”

या शब्दांत ज्या कवीनें आपली स्वतःची ओळख करून दिली आहे, त्याची ओळख त्याच्या ‘ मरणोत्तर ’ प्रकट करण्याचा प्रयत्न करणें हें ‘ वदतो–व्याघाताचें ’ केवढें रमणीय उदाहरण आहे ! मराठी रंगभूमीवर आपल्या अमर पात्रांनीं आणि चित्तवेधक प्रसंगांनीं नाट्यसंपदेचा आविष्कार दाखविणारा नाटककार, मराठी वाचकांना विविध तऱ्हेनें चुरचुरीत विनोदाची मेजवानी घालणारा बाळकराम, आणि विसाव्या शतकाच्या प्रथम चरणांत आपल्या अफाट कल्पनाविलासांनीं व नादमधुर शब्दप्रभुत्वानें महाराष्ट्र-शारदेला वाग्वैजयंती घालणारा कवि गोविंदाग्रज—या तीनही भूमिका महाराष्ट्र-सारस्वतांत अमर करून दाखविण्याचें नेत्रदीपक कौशल्य राम गणेश गडकरी यांनींच दाखविलें.

आर्थिक दृष्ट्या कनिष्ठ मध्यम वर्गांतील गडकरी घराण्यांत १८८५ सालीं गुजराथेंत नवसारी येथें राम गणेश गडकरी यांचा जन्म झाला. महाराष्ट्राच्या भाग्यकुंडलींत १८८५ या वर्षाला अनेक कारणांनीं महत्त्व आहे. हरिभाऊ आपटे, केशवसुत यांची प्रतिभा याच काळांत सामाजिक दुःखें बोलूं लागली व राष्ट्रीय दुःख बोलणारी कॉंग्रेसहि याच काळांत जन्मास आली. गडकरी यांचें बालपण गुजराथेंतच गेलें व घरच्या मराठी भाषेपाठोपाठ दारच्या

गुजराथी भाषेचा नाद त्यांच्या कानावर पडला. वयाच्या दहा वर्षांच्या आंत पितृवियोगाची आपत्ति त्यांच्यावर कोसळली. प्राथमिक शिक्षणासाठीं गडकरी-कुटुंब गुजराथेंतून निघून कुलाबा जिल्ह्यांत कर्जत येथें येऊन राहिलें व येथेंच त्यांच्या ' पहिला ओळखी 'चा जन्म झाला. बालपणच्या निरागस स्नेहांतच विशुद्ध ' प्रेमाची जाति ' निर्माण झाली व त्याच्या उजळणीवर पुढील भावनेची उभारणी झाली. माध्यमिक शिक्षणासाठीं गडकरी पुण्यास आले व न्यू. इं. स्कूलमधून १९०४ मध्यें ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. फर्ग्युसन कॉलेजमध्यें उच्च शिक्षणाच्या आवडीनें त्यांनीं नांव घातलें खरें, परंतु साहित्यसेवेला हरखून गेलेलें त्यांचें मन प्रथम वर्षांतील गणिताची कोंडी फोडूं शकलें नाहीं. येथेंच लौकिक-शिक्षणास त्यांनीं रामराम ठोकला व १९०४ मध्यें किर्लोस्कर नाटक मंडळींत ' मास्तरची नोकरी ' पत्करली. अध्यापनाच्या पेशापेक्षां किर्लोस्कर कंपनीच्या नाटकांतच त्यांचें मन रमलें व त्यांच्या नाट्यलेखनाची अप्रत्यक्ष तयारी होऊं लागली. याच काळांत इंग्रजी वाङ्मयांतील उत्कृष्ट काव्य व नाट्यवाङ्मय यांचें त्यांनीं विपुल वाचन केलें. त्याचप्रमाणें मराठींतील संतवाङ्मय, शाहिरी वाङ्मय व बखर-गद्य यांचेंही त्यांनीं अध्ययन केलें.

याच काळांत किर्लोस्कर कंपनीच्या बिऱ्हाडीं त्यांचा कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्याशीं परिचय झाला व त्यांचें शिष्यत्व त्यांनीं घेतलें. किर्लोस्कर कंपनींतील चार वर्षांची नोकरी ही एका दृष्टीनें त्यांची साहित्यसेवेची पूर्वतयारी म्हणूनच बघितली जाईल. किर्लोस्कर कंपनींतील नोकरी सोडून १९१० मध्यें ते पुण्यासच शिक्षकच झाले. तीहि नोकरी वर्षभरांत सोडून ' साहित्यनिर्मिति ' हाच त्यांनीं आपला आवडता व उपजीविकेचा पेशा पत्करला. १९०९ पासून यांच्या काव्यलेखनास बहर येऊं लागला व १९११ ते १९१६ पर्यंत त्यांच्या बहुतेक कविता मासिक मनोरंजनांतून प्रसिद्ध होऊं लागल्या. १९११ मध्यें 'गुलाबी कोड' प्रसिद्ध होतांच महाराष्ट्रांतील

रसिक वाचकांचीं मनें त्यांच्याकडे एकदम आकर्षिलीं गेलीं. १९१२ मध्यें प्रसिद्ध झालेल्या ' राजहंसानें ' महाराष्ट्रांतील रसिक स्त्रीपुरुषांना साश्रु नयनानें त्याचीं पारायणें करायला लावलें. त्याच्या पाठोपाठ प्रसिद्ध झालेल्या ' मुरलीनें ' महाराष्ट्राच्या भाविक व चिकित्सक मनाला अक्षरशः मोहित केलें. १९१६ मध्यें प्रसिद्ध झालेल्या ' प्रेम आणि मरण ' या कवितेनें महाराष्ट्राला स्वच्छंदवादाचें–रोमँटिक वृत्तीचें–दर्शन घडवून दिलें, आणि त्या सुमारास प्रसिद्ध झालेल्या कल्पनानिष्ठ व आत्मनिष्ठ प्रेमगीतांनीं महाराष्ट्राकडून ' प्रेमाचे शाहीर ' म्हणवून घेतलें. तत्कालीन कवींत गोविंदाग्रजाइतकी लोकप्रियता कोणाच्याच वांट्याला आलेली नव्हती. कविभूषण खापर्डे म्हणतात -" अनुकरणबुद्धि, कल्पकता, अतिरेकीपणा, तल्लख बुद्धिमत्ता, भडकपणाचें प्रेम, तीव्र अहंकार, जबरदस्त महत्त्वाकांक्षा–आणि या सर्वांच्या तावडींत सांपडलेली भावना " अशी गडकरी यांच्या कवि–मनाची रचना असावी.

प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव, एकच प्याला, भावबंधन, राजसंन्यास, [ वेड्यांचा बाजार–अपूर्ण ] ही एकापेक्षां एक सरस पण विविध प्रकृतीचीं नाटकें लिहून गडकरी यांनीं मराठी रंगदेवतेला कोल्हटकर व खाडिलकर यांच्यापुढें एक पाऊल टाकण्यास लावलें व नाट्यक्षेत्रांत अग्रस्थान पटकावलें. " ठकीचें लग्न, कवींचा कारखाना, मूकनायक, सकाळचा अभ्यास, दीडपानी नाटक " असे विनोदप्रचुर लेख लिहून विनोदाचे आद्य आचार्य कै. श्री. कृ. कोल्हटकर यांच्यावर त्यांनीं मात केली. आणि स्वतःला केशवसुतांचा चेला म्हणवून घेतलें तरी काव्यक्षेत्रांत स्वतःचें स्वतंत्र स्थान त्यांनीं निर्माण करून ठेवलें. काव्य व विनोद यांपेक्षां त्यांच्या नाट्यलेखनानें त्यांना अमर्याद कीर्ति मिळवून ठेवली असली तरी त्यांचा खरा पिंड ' व्यर्थी अधिकचि अर्थ दिसे ' असें म्हणणाऱ्या केशवसुतांच्याच परंपरेंतील कवीचा होता. त्यांच्या कवितेनें अनेक तरुणांना ' अनुकरण ' करावयास लाविलें व अनेक

टीकाकारांना ‘ चांगली–वाईट ’ टीका करण्यास उत्स्फूर्त केलें. ‘ साध्या मराठमोळी ’ शब्दरचनेपासून, ‘ शब्दांची चमकदार आतषबाजी ’ दाखविण्याचें कसब त्यांचेंच ! आर्त भावनेच्या रसोत्कटतेपासून निव्वळ कल्पनेच्या भराऱ्या मारण्याचें नैपुण्यहि त्यांचेंच ! आणि म्हणूनच ‘ नवनवोन्मेषशाली प्रज्ञेचा व प्रतिभेचा मानकरी ’ ही किताबतहि त्यांचीच ! आणि २३ जानेवारी १९१९ रोजीं काळाच्या जवनिकेंत अंतर्धान पावेपर्यंत लेखन करणारी हौसहि त्यांचीच !

‘ गडकऱ्यांची प्रतिभा असामान्य होती यांत शंका नाहीं. कल्पकता व भावनोत्कटता या दोन गुणांमध्यें त्यांची बरोबरी करणारे मराठी लेखक हाताच्या बोटांवर मोजण्याइतके देखील सांपडणार नाहींत, ’ या शब्दांत त्यांच्या लेखनाचा गौरव वि. स. खांडेकर करतात. महाराष्ट्रांतील अनेक नामवंत टीकाकारांनीं त्यांच्या असामान्य प्रतिभेचें, उत्कट भावनेचें, तरल कल्पनाविलासाचें आणि शब्दांतील नादमाधुर्याचें अमूप कौतुक केलें आहे. खुद्द गोविंदाग्रजांनाहि स्वतःच्या या कवित्वशक्तीची जाणीव होती आणि म्हणूनच महाराष्ट्र–सारस्वतांत यथेच्छ विहार करणाऱ्या या ‘ राजहंसानें म्हटलें आहे—

“ नवशब्दांचे घुंगुर बांधुनि रसवंती माझी,
नाचत डोलत करि शिणलेलीं मनें पुन्हां ताजीं ! ”

——आणि याचा निर्वाळा गेलीं तीन तपें महाराष्ट्राला मिळाला नाहीं काय ?

* * *

ग्रंथ संग्रहालय ठाणे

# प्रेम गीतें

## हृदयशारदेस--

[ कोणी कवी आपल्या कवितेस 'शब्दशारदा' व प्रणयिनीस 'हृदयशारदा' अशीं नांवें देऊन हें गाणें म्हटलें आहे. ]

हृदयशारदे ! या कवनाचे बोल ऐक माझे !
सरस्वती शब्दाची माझी तुजला जरि लाजे.
तुझ्या मनाचा, तुझ्या जिवाचा एक एक बोल,
मम कवितेच्या जादूलागीं ठरवीलच फोल !
नवशब्दांचे घुंगुर बांधुनि रसवंती माझी,
नाचत डोलत करि शिणलेलीं मनें पुन्हां ताजीं.
तिच्या गुणांवर कुणा कुणाचे जीव गुंग कांहीं,
तरि जादूनें जादूगारच काय फसुनि जाई ?
जरि शिरावर कुणीं बांधिला अमोल शिरपेंच,
दिसतो का तो ज्याचा त्याला ? स्तुतीचेंही हेंच ?
शब्दांचा बाजार बदलतां; जीवाची वेठ
नको नको हें; उघड आपुल्या प्रेमाची पेठ !

प्रेमाच्या जिव्हलगे ! जिव्हाळा करितां रसभरती
भिन्नरंगिं हृत्तरंग रंगति उचंबळुनि निघती !
शब्दचित्र परि काढूं जातां त्यांचें उल्हासें,
रंग तयांचे उडुनि जाती निःश्वासासरसे ;
जनिं जें दिसतें, मनिं जें वसतें, हृदयीं जें सलतें,
तें बोलावें तंव हें वठतें भलत्याचें सलतें,
रस तारांचा नभीं पाझरे, भूवर नच येई ;
शुष्क होउनि खालीं येतां शीतलता राही.
मूर्त रसाच्या कैक अप्सरा गगनगीत गाती ;
नाद विरे परि नभींच ; उतरे वारा भूवरती.
हा मोत्यांचा सडा घातला वरती आकाशीं,
चमक तेवढी येते त्याची या भूमीपाशीं.
आशीर्वचनीं शब्द तेवढे धांवुनि येतात ;
स्फूर्तिदायिनी इच्छा उरते तशीच हृदयांत.
तीच दशा मम होते तुजला जावें जों गाया,
हृदयभावना मूर्तिमती तूं ! कविता तव छाया !
सुकला चुकला जीव आजवर तुजवांचुनि फिरतां,
हृदयशारदे ! शब्द-शारदा नको मला आतां !
धरी सांवरुनि कविता पडत्या हृदयाचा तोल !
मरत्या जीवापरि वांचवी तुझा प्रणयगोल !
प्रीतीचीं पाउलें उमटलीं जीं या हृदयांत,
जीवस्वामिनी किती दिवस वद बसूं तींच गात ?
प्रणयतटिनि ! तूं दूर न राही—करपलाच जीव ;
हृदयसाक्षिणि ! प्राणरक्षिणि ! न कां येत कींव ?
तव वसतीच्या दिशेवरी जी तारा लखलखते,
नेत्रयुग्म हें तींवर खिळतें, नच कधींही हलतें !

तव हास्याचा नाद नाचला ज्या वाऱ्यावरतीं,
जीव कोंडला वांचविण्याचें बळ त्याच्या हातीं.

अनंत तारा, अखंड वारा, नच माझ्या कामीं !
माझी तारा, माझा वारा, तुझ्या प्रेमधामीं !
वस्तुवस्तुवर नेत्र वठविती तव मूर्तिच एक !
जग ताराया जणूं प्रीतिचा त्वन्मय अभिषेक !
नामाचा जप तुझा सारखा; अश्रूंची स्मरणी—
प्रतिक्षणीं प्रतिनामें वाढे तिच्यांत एक मणी !
ध्यास मांडिला तुझा असा हा असह्य विरहानें;
कधिं येशिल, कधिं घेशिल मजला हृदयीं प्रेमानें !
प्रीतीनें रंगलीं पावलें हृत्पटिं नाचीव ;
प्रेमामृत पाजुनी , देवते ! भक्ता वांचीव !
प्रेमदृष्टिनें, प्रिये ! मिळवितां डोळ्याला डोळा,
पंचप्राणहि होतिल माझे नयनीं क्षणिं गोळा !
हृदयीं जडवीं; चरणीं तुडवीं, मग त्या ओढुनियां
सोक्षमोक्ष करिं, तार मार वा, प्रेमाची दुनिया.

हृदयशारदे ! दर्शन परि दे, हृदयीं दे स्थान,
वक्षःस्थलिं तव पडतां पडतां येऊं दे मरण !
या प्रेमाचीं, तुझ्या यशाचीं गाणीं या नादीं !
गाइन, जाइन गात गात तीं तुजसह ईशपदीं.
प्रीतिदेविच्या पायांमधला कवि घुंगुरवाळा !
प्रीतिदेवता जरा हालतां कवि करि गानाला !
त्या प्रीतीला कविनें पुसतां, " गाऊं काय गडे ? "
प्रीति म्हणे, " जा तिलाच गाई जी तव हृदयिं जडे ! "
हृदयां, नयनां, ध्याना, गाना जिनें जिंकिलेंस,
' गोविंदाग्रज ' गाइल त्या तुज हृदयशारदेस.

## ती कोण ?

दूरस्था जलधीकडे स्वहृदया नेते नदी वाहुनी,
शोधाया रसिकास नित्य कविता हिंडे, न आशा तुटे
भूलोकावर राहते कुमुदिनी चंद्राकडे पाहुनी,
रात्रीमागुनि धांवतो दिवसही, कीं भेट व्हावी कुठें ?
जीवाचें जगणें असेंच असतें साक्षेप प्रेमावरी !
डोळेभेट दुरून; मात्र अथवा आशाहि त्याला पुरे !
मी हें पाहुनि जीवबंधन असें शोकार्त होतों परि,
कांकीं या मम लक्षशून्य हृदयीं कांहीं न आशा स्फुरे !
ओठांशीं भिडतें रहस्य मनिंचें ? सांगूं कुणाला परी ?
अश्रू हे नयनींहि—माळ करुनी घालूं कुणाच्या गळां ?
आलें हें भरुनी रितें हृदयही—देऊं कुणाच्या करीं ?
आला दाटुनि कंठ-हाय ! रडुनी कोठें करूं मोकळा ?
जी माझ्यास्तव, मी जिचे सकलही, आधार जी जीवनीं
देवा ! भेटवि—दाखवी तरि मला ती कोण देवी जनीं ?

## कधीं ?

चित्रपटावरि रम्याकृतिच्या सीमारेषा परोपरी;
रंग कधीं वठतील परी ?
कानांला आनंद देति हे झुळझुळ गाउनि गोड झरे;
अर्थ कधीं कळणार बरें ?
अंधुक अंधुक गोड भावना डोकावति कविमनाकडे;
शब्द कधीं होतील खडे ?

सतेज वचनें देई तारा, परी लकाके नभामधीं
खालीं येईल परी कधीं ?

झांपड पडते डोळ्यांवरती--चिंता छाळितां हृदंतरीं;
झोंप कधीं येईल परी ?

प्रतिरात्रीं हीं स्वप्नें दाविती इच्छाचित्रें जीवाचीं;
सृष्टि कधीं होईल त्यांची ?

अंधनयनिं बघते आशा विश्वाचि हें रम्याकार ;
जगीं कधीं तें दिसणार ?

--आणि वल्लभे ! दिलीस वचनें; गोड अहा तीं किती तरी !
खरीं कधीं होणार परी !

गोविंदाग्रज जें जें आळवि कवनीं--आणिक--मनामधीं,
पटेल तें तें सांग कधीं ?

* * *

# फुलें वेंचलीं पण--

[ प्रेमस्थान नाहीं अशा मनुष्याला चांगल्यानें सुद्धां खेदच होतो. ]

पन्हाळगडाचा पठार सगळा घालुनि पायाखालीं ।
फुलें जमविलीं तऱ्हेतऱ्हेचीं जीं जीं हातीं आलीं ॥

शेवंतीचा गेंद हांसरा, शुभ्र मोगरा फुलला ।
मदनबाण हा पाहुनि असला पुष्पबाणही भुलला ॥

नाजुक जाईचीं हीं बाळें; गुलाब ताजा छान ।
हीं इवलालीं रानफुलेंहीं रंगें हरिती भान ॥

ही तुळशीची मंजुळ, तैसा सबजा महंमदाचा ।
भू:कमळें हीं, अनंत फुलतां औरच वास तयांचा ॥

किती आणखी सांगूं नांवें–आणि कशाला नुसतीं ? ।
हेंच पुरे कीं सगळीं होतीं जीं वासें मुसमुसतीं ।
फुलवंतीनें ओंजळ माझी भरुनी लागे शींग ।
सुगंधि सौंदर्याचा नाचे हातावरती ढीग ।
काव्यभरानें तरुण नयन हे नवतेजानें न्हाले ।
प्रणयरसानें हृदयहि माझें उचंबळुनि वर आलें ॥
"फुलें वेंचलीं: पण–आतां हीं द्यावीं कोणालागीं ?" ।
राक्षसवृत्ति स्मरणदेवता क्षणांत झाली जागी ॥
'हतभागी हा जीव एकला प्रीतिदेवता नाहीं ।
मोडुनि पडलें हृदयमंदिर शतधा आघातांहीं ॥
निष्प्रेमाचें जीवन माझें रुक्ष चिंतनीं जावें ।
संकल्पचि हा वरला ठरला; कां तें देवा ठावें ! ॥
कांट्यावरि या कोमल हृदया टाकुनि देवा क्रूर ।
कुठें फुलांची धनीन माझी दिली दवडुनि दूर ? ।
कृतकर्माचीं फळें भोगणें अवश्य जीवा जगिं या ।
गुदस्त तें गुलदस्त; नको तें पुन: पुन्हां मनिं याया " ॥
अभंग निश्चय अशा प्रकारें कितीकदां जरि केला ।
या पुष्पांसम मृदुहि कारणें दुभंगती परि त्याला ॥
वृत्ति बावरी झालि, आंतल्या आंत बिचारी रडली ।
जीवाचीं नयनांतुनि पुष्पें त्या पुष्पांवरि पडलीं ॥
जीव जाहला जड; तीं हातीं पुष्पेंहि जड झालीं ॥
"फुलें वेंचिलीं पण–पण–आतां देतों टाकुनि खालीं ॥
चिरंमृताला हवा कशाला हा असला हव्यास ? ।
जिवंत फुलवंतीचा असला दु:खप्रद सहवास ।
डोळे असुनी अंध असा कुणि तुडविल यांना पायीं ।
रसिक कुणि प्रेमांध उचलुनि अर्पिल रमणीहृदयीं ॥

ज्या देवानें असे मांडिला असला निष्ठुर खेळ।
असेल त्याला वसवायाचा तसाच कांहीं मेळ ॥
त्याचीं त्याला फेकुनि देतो, हें ब्रह्मार्पणमस्तु ।
कुठेंहि पडतां पावतील त्या, विश्वचि त्याचे वास्तु ॥
नाजुक असलीं फुलें अशा या माझ्या हृदयासाठीं ।
देवाजवळी दाद मागतिल लागुनि त्याच्यापाठीं " ॥
देत उधळुनी फुलें अर्पितां देवा चहूंकडेही ।
' गोविंदाग्रज ' तशीं फुलें हीं रसिकां तुम्हां देई ॥

अथणी, १९१४

# जुन्या कवितांची आठवण

साऱ्या त्या कविता तशाच असती; ते अर्थही त्यांपरी ।
शाळाही अजुनी नवीच दिसते त्या रम्य जागेवरी ॥
*  * ! वाहतसे भरूनि दुथडी ' उल्हास[१] ' तेव्हां जशी ।
गेला वाहुनी काळ तो, सकळ तीं सौख्येंहि त्याचीं तशीं ॥१॥
आनंदें भरलें असे जग तसें आताहि *  * ! पहा ।
*  * ही असतील त्यापरि किती लोकांत रम्या अहा ! ॥
प्रेमाचीं नवजीवनेंहि दिसती स्वच्छंद चोहींकडे ।
ज्याचें त्यास नसे तरी जगभरी शून्यत्व ये रोकडें ॥२॥
बाले, दृष्टि मनोहरा मजवरी तूं टाकिली ज्या क्षणीं ।
गेला तो क्षण सांग सांप्रत कुठें ? हें शल्य राही मनीं ॥

१ ही नदी बोरघाटांत खंडाळयाच्या तळयांत उगम पावून कर्जत-नेरळवरून वाहत जाऊन कल्याणच्या खाडीस मिळते.

काळाच्या उदरांत खोल दडला जाऊनि कोठें तरी ।
 *  * ! शोकच शेष आज उरला प्रेमांतुनी अंतरीं ॥३॥
विद्यादानिं नसे विशेष गति त्या बाल्यांत आम्हां तशी ।
प्रेमाचा पहिला धडा गिरविला निर्दोषशा मानसीं ॥
 *  *  ! तीं वचनें मरून पडलीं; पद्यांत त्यां पाठवी ।
'गोविंदाग्रज' आज विह्वल मनें, *  *  ! तुला आठवी.॥४॥

बोरिवली, १६–२–१९१८.

* * *

## फणसाचें पान

### साकी

सहजचि दिसलें पायाखालीं मज फणसाचें पान ॥
सवेंच कवनाचें हृदयींच्या चढत चाललें मान
फणसाच्या त्या पानावरतीं दिसल्या ज्या मज रेषा ॥
कधींकाळच्या उघडुनि दाविती मनिंच्या आंतरवेषा ॥
लिहुनि ठेविली पूर्ववयामधिं कथा गोड जी पानीं ॥
पुन्हां वाचिली; आणि जाहला सखेद हर्षहि रमणि ॥
दोनच नयनीं नीट दिसेना, अंधुक जग हें अवघें ॥
प्रीतीच्या उपनेत्रांवांचुनि–पुढें बोलणें नलगे ॥
डोळे झांकुनि भरभर फिरुनी कथा वाचिली मग ती ॥
हतभागी हे जीव जगीं या स्मरणें केवळ जगती ॥
गांव कुणाचें–नांव कुणाचें–आणि कुणाचें पान ॥
सरोवराला परका मधुकर करित रसाचें पान ।
वाऱ्यासरशीं अंगावरतीं येऊन पडतीं पानें ॥
नेमधर्म त्यां कसला ? अथवा नेम तो जाणे ॥

सुंदर चित्रा ! मदपूर्णा ती कथा तुझी आठवते ॥
बाले ! रमणि ! प्रणयभरानें हृदय किती खळवळतें ॥
सळसळती हीं आजहि, सखये, मंवतीं हिरवीं रानें ॥
' गोविंदाग्रज ' परी शोधितो तीं फणशीचीं पानें ॥

बोरिवली; १०-२ १९१८

# एका शब्दासाठीं विनंति

क्षमा करीं, जिवलगे !–क्षमा करिं ! न लावितां अवधि
कोमल हृदया कठोर वचनीं छळि हा अपराधी ॥ १ ॥
क्षमा करावी मी तुज, बाले, आणि तूंहि मातें ॥
असेंच आतां जडलें आहे दोघांचें नातें ॥ २ ॥
परस्परांस्तव आपण ऐसा प्रत्ययही आला ॥
तुजवांचुनि मज सुचे रुचेना मजविणही तुजला ॥ ३ ॥
क्षणमात्राचा राग अनावर-स्वभाव दोघांचा ॥
समजुनि हें मग राग धरावा कोणी कोणाचा ? ॥ ४ ॥
जीवाच्या बागेंत खेळतो पक्षी प्रेमाचा ॥
पिसामागुनी पिसें काढणें, मार्ग न सुज्ञाचा ॥ ५ ॥
पश्चात्तापें हृदय हलवितां अश्रूंच्या धारा ॥
वाहुनि त्याला लाभूं दे तो मोत्यांचा चारा ॥ ६ ॥
जें झालें तें विसरुनि, सखये ! टाकुनि इतराजी ॥
भला बुरा मी मान्य करुनिया होशिल ना माझी ? ॥७॥
' गोविंदाग्रज ' आणुनि नयनीं जीवाचें तोय ॥
विनवित; बाले ! लिहीं स्वहस्तें तूंच पुढें— ॥ ८ ॥

मुंबई, ता. २४-३-१९१६

# निर्दय बालेस--

अखेर झाली आतां ॥ घे हा ॥ प्रणाम जातां जातां ॥ ध्रु० ॥
जिंकुनि तुजला प्रेमें होऊन दास तुझा जन्माचा ॥
या आशेवर जीव टांगला होता या दीनाचा ॥ १ ॥
नजर जराशी तुझी वदलतां थोडा थोडा होई ॥
वेडा माझा जीव बुडविला तूं शोकाच्या डोहीं ॥ २ ॥
होतें नव्हतें त्याची केली तुझ्या ठिकाणीं पोंच ॥
जीवांच्या जाळ्यांत झेलला शब्द न पडला तोंच ॥ ३ ॥
रूप मनोहर असलें बुद्धिहि तीव्र लाभली तुजला ॥
खऱ्या गुणाची पारख कांहीं असेल तव हृदयाला ॥ ४ ॥
वेडी आशा अशी धरुनिया घडा जिवाचा केला ॥
भल्याबुऱ्याचा भेद न तुजला अनुभव भलता आला ॥ ५ ॥
केल्या ज्याच्या पायघड्या मी तुझ्या पावलांसाठीं ॥
त्या हृदयाला तुडवुनि गेलिस नटव्या थाटापाठीं ॥ ६ ॥
जग सगळें हें डोळ्यांपुरतें, रूप जिवाला पुरतें ॥
उदार हृदया परि निर्दय जग दगडाखालीं पुरतें ॥ ७ ॥
ज्या देवानें जग हें केलें, ज्या प्रेमें हें चाले ॥
त्या देवाला, त्या प्रेमाला, जाळिन आतां, बाले ॥ ८ ॥
जगावांचुनी लाभतीस तरि जग मीं केलें असतें ॥
तुझ्यावांचुनी जग हें आतां असून झालें नसतें ॥ ९ ॥
दिला तिलांजलि अश्रूंचा हा त्या प्रेमाच्या नांवा ॥
परतायाचें नाहीं आतां त्या प्रेमाच्या गांवा ॥ १० ॥
होइल होइल वाटत होतें तेंच अखेरिस झालें ॥
नांव घेतल्यावांचुन आतां मनांत झुरणें आलें ॥ ११ ॥

( अपूर्ण )

# मोरपिसावरचा डोळा

डोळा साचा । हा मोरपिसाऱ्यावरचा ॥ ध्रु० ॥
बुट्टे काळ्या शालूवरतीं । तारे निळ्या नभीं लकलकती ॥
कृष्णजलावरि कमळें रमतीं । तसा डोळा हा ॥ मोरपिसाऱ्यावर पाहा ॥
दिसती रंग उघड नयनांनें । आहे विद्युत्‌-शक्तिहि यातें ।
ओढी वस्तुमात्र; जग म्हणतें । खरें असावें ॥ कां नाहीं उगिच म्हणावें ॥
मोहकता तर आहे खास । ओढी ती त्या जवळि जगास ।
वाटे सौंदर्याचा वास । असावा त्यांत ॥ ग्रह पहिला ववतां होत ॥
दिसतें काय कुणापरि यानें । रुदना खलवी का हंसण्यानें ।
फुलतें कुठल्या कीं प्रेमानें । क्षणमात्रांत ॥ हे विचार येति मनांत ॥
सजीवतेचें निर्जीव फूल । नुसती सौंदर्याची भूल ॥
ईश्वरतेची पोकळ हूल । भिन्न रंगाची ॥ ही बैठक भिन्नपणाची ॥
क्षणमात्राची मोहकता ही । चंचलतेनें चमकत राही ॥
प्रेमाचें मुळिं पाणी नाहीं । कसला डोळा ॥ हे रंग जाहले गोळा ॥
शोभा प्रेमावांचुनि फोल । जिणेंहि याचें कवडीमोल ।
अर्थाविण मेलेले बोल । टाकुनि द्याना ॥ खेळणें मुलांबाळांना ॥
कितीक असले फसवे डोळे । रंगी बेरंगी जणुं गोळे ।
जगांत पाहुनि फसती भोळे । दे ही जोड ॥ देवा ते डोळे फोड ॥

* * *

# गोफ

[ घटनेपेक्षां विघटना सुकर असते, हा व्यवहारी जगाचा सिद्धान्त आहे. हृदयाच्या ब्रह्मांडांतहि ज्यांना हेंच सत्य पटलें आहे ते भाग्यशाली ! ]

पदर आणिले तुझे कांहिं तूं, माझे आणी मीहि तसा ॥
हांसत खेळत गोफ गुंफिला, कळलें नाहीं कधीं कसा ॥ १ ॥

एकमेकांभवतीं फिरतां, गिरकी जीवांना आली ॥
चढत चालला खेळ जसा तो, नजरहि धुंद तशी झाली ॥ २
कुणीं निंदिलें कुणीं वंदिलें, कुणीं हंसलें रडलेंहि कुणी ॥
नाहिं पाहिलें आम्हीं तिकडे, विश्व बुडालें प्रेमगुणीं ॥ ३ ॥
परि दैवाचा खेळ निराळा खेळ नकोसा तुज झाला ॥
ज्या खेळानें जीव रंगला, त्याचा कंटाळा आला ॥ ४ ॥
गोफ गुंफिला उलगडण्याचा कठिण काळ येऊन थडके ॥
हाय, वदावें काय, जिवलगे, ऊर तेवढा हा धडके ॥ ५ ॥
हळूहळू ओढणें हळु जरा, ओढायाची कां घाई ॥
भलता धागा ओढितांच तूं, जीव, जिवलगे, हा जाई॥ ६ ॥
थांब, उलगडूं गोफ कठिण हा शांत बुद्धीनें सखे असा–॥
कीं न तुटावा पदर एकही, धागा धागा नीट तसा ॥ ७ ॥
ना तरि होईल हानि आपुली आणि जगाचें हंसें तसें ॥
एक्या ठायीं आलों कां वद दूर व्हावया सखे असें ॥ ८ ॥
कठिण असे, तरि उलगडणें हा गोफ असे आतां भाग ॥
ना तरि त्याचा पीळ राहुनी छळील तो जागोजाग ॥ ९ ॥
मनापासुनि जें केलें, जें मान्य जिवांनाही झालें ॥
विमनस्कपणें परि आज तें निस्तरणें नशिबीं आलें ॥ १० ॥
कठिण जोडणें परि तोडणें सुकर वाटतें जनांप्रतीं ॥
उलटा अनुभव आला आम्हा, गुंग जाहली इथें मति ॥ ११ ॥

अनुष्टुभ्

खेळतां गुंफिला गोफ, जीव त्यालागिं वाहिला ॥
'गोविंदाग्रज' सांगेना–कीं त्याचा पीळ राहिला ॥

* * *

# हृदयास—

जिवलग हृदया ! मूढ वृत्ति ही धारण केली कां असली ? ।
लाथ मार त्या चंचल जगता, प्रेमाचीं सोंगें कसलीं ! ॥
चंचल, लहरी, रंग बेगडी सुंदरतेच्या मोहानें ।
कां वाटेवर पडसी, हृदया ! विकुनी कवडीमोलानें ॥
तुझ्या जिवाच्या बोलासाठीं हपापले हे रसिक पहा ।
स्वागत करिं जा त्यांचें त्यांना हर्ष किती होईल अहा ॥
नटव्या सोंगामागें लागे जें त्या सौंदर्यासाठीं ।
नवलाखाचें मोल देसि कां ? कशास या आटाआटी ॥
जिथें गुणाची चाड न कांहीं कमअस्सल जें जातीचें ।
सौंदर्यचि तें कसलें ? केवळ एक बाहुलें मातीचें ॥
विद्यावैभव कुठें तुझें, तो ज्ञानाचा गौरव कोठें ।
आणि कुठें रंगीत खेळणें ? नवल खरोखरि हें मोठें ॥
उदारता तव विशाल पाहुनि देवालाही मोह सुटे ।
आणिक असलें खोटें नाटें नकली नाणें सांग कुठें ॥
गर्वाचें घर खालीं पडुनी खुशाल मिळुं दे मातींत ।
रसिकांच्या मृदुहृयमंदिरीं रहा, निजयशा मिरवीत ॥
चितारडसी कां ? चित्र जिवाचें पाण्यावरच्या रेघांनीं ।
'गोविंदाग्रज' सांगे तुजला रहा त्याहुनी स्वस्थानीं ॥

मुंबई, ता. १-३-१९१६.

* * *

# शेवटचें प्रेमगीत

( मला शांति मुनि भासतो )

तुटे स्नेहसंबंध सर्वस्वि आतां। टाकितां तूं असें या अनाथा ॥ ध्रु० ॥
सात वर्षे, सखे! हर्षद स्वप्न जें। पाहिलें, भोगिलें तेंच आतां।
घोरतिमिरा निशा सहज भय देतसे। जीव हा ऐकला आज उरतां।
अश्रुधारा पहा वाहती निर्भरा। चित्त विव्हल; नसे वृत्ति शांता।
नयनजलिं नाहतां, त्यासवें वाहतां। पाहिना तुजविना जीव जगता ॥
जीवनव्याप हा व्यर्थ वाटे पहा। नयनाविषयाच ही विश्वसंस्था।
कांहि नाहीं पुढें, जीव तिमिरीं बुडे। स्तिमित वा बधिर वा जात अंता।
नाश तरि सर्वथा होऊं दे एकदां। आपदां लोपवि रे कृतांता।
कष्टला जीव हा दुःखमात्रा वहा। शून्यशा जीविताप्रति वहातां ॥
यत्न केले, सखे! रत्न तुजसारखें। कधिं तरी व्हावया प्राप्त हातां।
अन्य घटना परि ना कळे कां करी। देव कीं दैव कीं तो विधाता! ॥
जन्म हा व्यर्थसा होत, होवो तसा। सर्वथा शिवपरा ईशसत्ता।
प्रेमयज्ञाप्रति प्रथमही आहुति। अपरिहार्याच जी जीवजाता ॥
एक आशा उरे–(तीच परि मज पुरे)। तिजसवें जीव करि एकमयता।
" जन्मजन्मांतरीं एकदां क्षणभरी। प्रेम लाभो तुझें शोकघाता " ॥

अनुष्टुभ्

भावोल्लेखार्थ आलेखी कष्टदें शोकनिग्रहें।
'गोविंदाग्रज', हे बाले! अंतिम प्रेमगीत हें ॥

मुंबई, ता. १–६–१९१६

* * *

७१५२८ ९-१-५८

# अल्लड प्रेमास

क्षणभर वेड्या प्रेमा थांब !
अधिर मनासह जासी कोठें ?
चुकशिल–संकटीं पडशील वाटे,
जग हें सारें बा रे खोटें !
हृदया सोडुनि; गड्या म्हणोनी जाइ न कोठें लांब !
क्षणीं पांढरा क्षणींच काळा,
रंग आवडे असा जगाला,
ठाव तयाचा कुणा न कळला !
खुळ्या तुलाची, अशा जगाची, कळेल का कृति सांग ?
जग सगळें हें देखाव्याचें ;
गुलाम केवळ रे स्वार्थाचे !
स्मशान कीं हें शुद्धत्वाचें !
शुद्ध भावडें, सरळ रोकडें, अशांत करिशिल काय ?
प्रेमा येथें शपथ लागते !
प्रासावांचुनि कविता अडते !
कत्र्यांवांचुनि कार्यहि घडतें !
देव बिचारा, तया न थारा, तुझी कथा मग काय ?
तुझ्यासारखा तुला सोबती––
मिळेल का या अफाट जगतीं ?–
––संकुचितहि हे अफाट जरि अति––
आणी न मना अशी कल्पना, अगदीं भोळा सांब !
कोणी तुजला मानिल खोटें,
तिरस्कारही दिसेल कोठें,
अपमानाचेंही भय मोठें,
बाग जगाची, ही न फुलांची, कांटे जागोजाग !

टाकिल कुणि तुज धिक्कारानें,
रडविल किंवा उपहासानें,
फसविल नकली कीं मालानें,
कोणी भटकत, उगाच रखडत, फिरविल मागोमाग !
म्हणुनि लाडक्या ! कुठें न जाई,
या हृदयांतचि लपुनी राहीं,
योग्य मित्र नच सुख तरि नाहीं !
कुसंगतीहुनि, वेड्या ! मानीं, फार बरा एकांत !

* * *

## पुनर्जात प्रेमास--

प्रभा ? ऊठ—चल उघड, झांकली मूठ !
तुंबळ सागर तव खळबळला,
हृदयीं तटवूं त्यास कशाला !
जगभर लाटा उधळायाला
दिली तुज सूट—चल उघड झांकली मूठ !
कोंडुनि असला सागर धरिला,
माझा मूर्खपणा मज कळला,
मिळतां स्थल तुज नाचायाला
करीं रे लूट—चल उघड झांकली मूठ !
क्षणभर वाटत होतें मजला,
कीं तव ओघ आटुनी गेला,
परि जो अखंड भरला त्याला
कशाची तूट—चल उघड झांकली मूठ !

उगवे सूर्य काल मावळतां,
फिरुनी फुलतें फूलहि मिटतां
प्राणजीवना, तुजही शिवतां,
मरण हें झूट—चल उघड झांकली मूठ !
द्वेषावरती दुःखावरती,
फिरवीं तुझ्या यशाची महती,
जा, जा, नाच सर्वहि जगतीं,
धांव बेछूट—चल उघड, झांकली मूठ !
विसरुनि जाऊं अनुभवजाला,
तुडवूं पायीं चल खेदाला ?
टाकूं जाळुनि नैराश्याला !
दुःख सब् झूट !—चल उघड, झांकली मूठ !
तुझिया श्वासाच्या उद्गारें
टाकूं भरुनी जग हें सारें,
एकच नादें करुं आतां रे,
सुखाची लूट—चल उघड, झांकली मूठ !
मी तूं दूर न राहूं आतां,
दाखवुं शक्ती अपुली जगता,
आणूं परमेश्वरही हाता,
ऊठरे ऊठ—चल उघड, झांकली मूठ !

* * *

# प्रेम आणि मरण

" जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी ।
झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी ॥ "

—श्रीहोनाजी बाळ.

कुठल्याशा जागीं देख ।
मैदान मोकळें एक ॥ पसरलें ॥
वृक्ष थोर एकच त्यांत ।
वाढला पुऱ्या जोमांत ॥ सारखा ॥
चहुंकडेच त्याच्या भंवतें ।
गुडघाभर सारें जग तें ॥ तेथलें ॥
झुडुपेंच खुरट इवलालीं ।
मातींत पसरल्या वेली ॥ माजती ॥
रोज तीं । कैक उपजती । आणखी मरती ।
नाहिं त्या गणती । दादही अशांची नव्हती ॥ त्याप्रती ॥
त्यासाठीं मैदानांत ।
किती वेली तळमळतात ॥ सारख्या ॥
परि कर्माचें विंदान ।
कांहीं तरि असतें आन ॥ चहुंकडे ॥
कोणत्या मुहूर्तावरतीं ।
मेघांत वीज लखलखती ॥ नाचली ॥
त्या क्षणीं । त्याचिया मनीं । तरंगति झणीं ।
गोड तरि जहरी । प्रीतीच्या नवथर लहरी ॥ न कळतां ॥
तो ठसा मनावर ठसला ।
तो घाव जिव्हारीं बसला ॥ प्रीतिचा ॥
वेड पुरें लावी त्याला ।
गगनांतिल चंचल बाला । त्यावरी ॥
जातिधर्म त्याचा सुटला ।
संबंध जगाशीं तुटला ॥ त्यापुढें ॥
आशाहि । कोठली कांहिं । राहिली नाहिं ।
सारखा जाळी । ध्यास त्यास तीन्ही काळीं ॥ एक तो ॥

मुसळधार पाऊस पडला ।
तरि कधीं टवटवी त्याला येईना ॥
जरि वारा करि थैमान ।
तरि हले न याचें पान ॥ एकही ॥
कैकदां कळ्याही आल्या ।
नच फुलल्या कांहीं केल्या ॥ परि कधीं ।
तो योग । खरा हटयोग । प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला । लागतें जगाचें त्याला ॥ हें असें ॥

ही त्याची स्थिति पाहुनियां ।
ती दीड वितीची दुनिया ॥ बडबडे ॥
कुणि हंसे कुणी करि कींव ।
तडफडे कुणाचा जीव ॥ त्यास्तव ॥
कुणि दयाहि त्यावरि करिती ।
स्वर्गस्थ देव मनिं हंसती ॥ त्याप्रती ॥
निंदिती । कुणी त्याप्रती । नजर चुकविती ।
भीतिही कोणी । जड जगास अवजड गोणी ॥ होइ तो ॥

इष्काचा जहरी प्याला ।
नशिबाला ज्याच्या आला ॥ हा असा ॥
टोंकाविण चालू मरणें ।
तें त्याचें होतें जगणें ॥ सारखें ॥
हृदयाला फसवुनि हंसणें ।
जीवाला न कळत जगणें ॥ वरिवरि ॥
पटत ना । जगीं जगपणा । त्याचिया मना ।
भाव त्या टाकीं । देवांतुनि दगडचि बाकी ॥ राहतो ॥
यापरी तपश्चर्या ती ।
किति झाली न तिला गणती ॥ राहिली ॥

इंद्राच्या इंद्रपदाला ।
थरकांप सारखा सुटला ॥ भीतिनें ॥
आश्चर्य ऋषिगण दाटे ।
ध्रुवबाळा मत्सर वाटे ॥ पाहुनी ॥
तों स्वतां । तपोदेवता । काल संपतां ।
प्रकटली अंतीं । " वरं ब्रूहि " झाली वदती ॥ त्याप्रती ॥
" तप फळास आलें पाहीं ।
माग जें मनोगत कांहीं ॥ यावरी ॥
हो चिरंजीव लवलाहीं ।
कल्पवृक्ष दुसरा होई ॥ नंदनीं ॥
प्रळयींच्या वटवृक्षाचें ।
तुज मिळेल पद भाग्याचें ॥ तरुवरा ॥ "
तो वदे । " देवि सर्व-दे, । हेंच एक हें—।
भेटवीं मजला । जीविंच्या जिवाची बाला ॥ एकदां ॥
सांगती हिताच्या गोष्टी ।
देवांच्या तेतिस कोटी ॥ मग तया ॥
" ही भलती आशा बा रे ।
सोडिं तूं वेड हें सारें ॥ घातकी ॥
स्पर्शासह मरणहि आणी ।
ती तुझ्या जिवाची राणी ॥ त्या क्षणीं ॥
ही अशी । शुद्ध राक्षसी । काय मागसी ।
माग तूं कांहीं । लाभलें कुणाला नाहीं ॥ जें कधीं "
तो हंसे जरा उपहासें ।
मग सर्वेंच वदला त्रासें ॥ त्यांप्रती ॥
" निष्प्रेम चिरंजीवन तें ।
जगिं दगडालाही मिळतें ॥ धिक् तया ॥

क्षण एक पुरे प्रेमाचा ।
वर्षाव पडो मरणांचा ।। मग पुढें ।।"
निग्रहें । वदुनि शब्द हे । अधिक आग्रहें ।।
जीव आवरुनी । ध्यानस्थ बसला फिरुनी ।। वृक्ष तो ।।
तो निग्रह पाहुनि त्याचा ।
निरुपाय सर्व देवांचा ।। जाहला ।।
मग त्याला भेटायाला ।
गगनांतिल चंचल बाला ।। धाडिली ।।
धांवली उताविळ होत ।
प्रीतीची जळती ज्योत ।। त्याकडे ।।
कडकडे । त्यावरी पडे । स्पर्श जों घडे ।
वृक्ष उन्मळला । दुभंगून खालीं पडला ।। त्या क्षणीं ।।
दुभंगून खालीं पडला ।
परि पडतां पडतां हंसला ।। एकदां ।।
हर्षाच्या येउनि लहरी
फडफडुनी पानें सारीं ।। हांसलीं ।।
त्या कळ्या सर्वही फुलल्या ।
खुलल्या त्या कायम खुलल्या ।। अजुनिही ।।
तो योग । खरा हटयोग । प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला । लाभतें मरणही त्याला ।। हें असें ।।

अनुष्टुभ् वृत्त

स्मरणार्थ तयाच्या ही बोलांची रानपालवी ।
मराठी रसिकांसाठीं 'गोविंदाग्रज' पाठवी ।।

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय

# ओसाड आडांतील एकच फूल

[ १ ]

होता एक जुनाट आड पडका, ओसाडसा जो असे,
कोठेंसा, कधिंचा विशेष नव्हता कोणास तो माहित;
होतें काय तयांत हें नच कधीं कोणी पहाया बसे,
नाहीं जात कधीं तिथें कुणि जिथें नाहीं स्वतांचें हित.
होता आड खरोखरीच अगदीं तैसा दिसायास तो,
जो जैसा दिसतो जगास दुरुनी, तैसाच तो भासतो;
घेतो कोण उगाच कष्ट इतके लोकीं खऱ्याखातर !
'आहे भूत तयांत खास !' वदती ऐसेंहि कोणी नर.
बोले वाइट त्यास कोणि, नसती होती वदंता जरी,
लोटी सृष्टिहि त्याप्रती जरि तशा त्या आडमार्गावर.
टाकीना नुसतीं जरी नजरही कोणी बिचाऱ्यावर,
देवानेंहि दिलें असेंच नव्हतें टाकून त्याला तरी !
देवाला करणें-विचित्रच तरी आहे किती गोष्ट ही,
होतें नाचत एक फूल तसल्या ओसाड आडांतहि !

[ २ ]

पानांची गरदी लता करिति त्या आडाचिया भोंवतीं,
वाटे अंथरलें जणूं दफन तें जीवंत तोंडावरी.
काळीभोर कभिन्न गर्द विलसे छाया मधें खोल ती,
आडांतील जलांतही मिसळुनी त्यालाहि काळें करी.
आडाच्या असल्या भकास उदरीं होतें तसें फूल तें;
प्रेमाचा मृत अश्रु जेविं गिळिला जीवन्मृताच्या मनीं;
केव्हांही नच लागला सुमनसा वाराहि बाहेरुनी;
काळोखांतिल तेवढेंच जग तें होतें तयाभोंवतें.

पुष्पाचें वळलें असें मुख सदा पाण्याकडे खालतीं,
श्वासानें जणुं त्याचिया चिमुकल्या लाटा जलीं हालती,
केंव्हां तन्मकरंदबिन्दु पडतां जीं वर्तुलें चालती,
घालाया रमणीकरांत बघतां तेंव्हांच मागाल तीं,
येई एक कसाबसा तरि सदा येथें रवीचा कर,
पुष्पाचें प्रतिबिंब तो जलिं करी त्यालागिं दृग्गोचर.

[ ३ ]

त्या चित्राप्रति भावबद्धनयनें आशादशा पाहणें—
हा नित्यक्रम भाबड्या सरळ त्या माझ्या फुलाचा असे;
त्याला सर्वहि वाहणें, विरुनिया त्याच्यामधें राहणें,
आशा एकच एवढी मनिं सदा वेड्या फुलाच्या वसे.
त्याचा वास असे मनोहर सदा, शंका नसे याविशीं,
या भावें परि गंध जो दरवळे न्यारीच त्याची मजा,
केंव्हांही हलतांच फूल पवनें खेदास देते रजा,
प्रेमानें डुलतां परी करितसे वृत्तीस वेडीपिशी !
हांसे फूल जलांतल्या बघुनियां त्या स्वीय चित्राकडे;
हांसे तेंहि तसेंच तो अधिक हें हांसें तसें बापडें,
नाचे हें पवनांत, तेंहि तिकडे पाण्यामधें बागडे,
'माझा भाव तयाप्रती कळतसे' मानीत हें बापडें.
जोडीचा महिमा असा चहूंकडे; धिक् सर्व जोडीविणें !
लाभे जोड तरी कुणास न रुचे शून्यांतलेंही जिणें ?

[ ४ ]

खालीं तोंड करून चंचल जलीं पाहून वेड्यापरी
भावाचे अपुल्याच रंग वठवी त्या प्रेमचित्रावरी;
घेई यापरि बांधुनी उगिच तें जीवास आशागुणीं,
हांसूं मात्र नका म्हणून कधिंही माझ्या फुलाला कुणी !

त्या आशेंत रहस्य काय लपलें जाणावयाला जरा—
वाऱ्यानें करपून जातिल अशीं व्हावीं फुलांचीं मनें;
चित्रें चंचल जीं अदृश्य उघडया डोळ्यांस भावाविणें
भावाचे अपुल्याच रंग बघणें वाटेल तेथें मना,
त्या वेडयाबगडया फुलांतच असे का तेवढा दोष हा ?
मोठे पंडित काय लाविति दिवे, ते एकदांचे पहा,
कोणीं काय कधीं कुठें बघितलें जें ये विकारांत ना ?
जो तो या जगतावरी पसरतो छाया मनाची सदा
निःश्वासें तुमच्याच सृष्टि करपे, तेव्हांच ती तापदा !

[ ५ ]

कांहीं काळ असाच फूल गमवी; आशा पुढें वाढली,
चुंबावें जलिंच्या फुलास म्हणुनी तें मान खालीं करी;
वाऱ्यानें मुख लागतांच उदका छाया विराली जलीं,
पाणी मात्र पडे मुखीं सहज तों, तैसेंच आशेवरी !
त्या धक्यासरसेंच फूल मग जें कोमेजलें एकदां,
नाहीं तें हंसलें पुन्हां ! विकसलें नाहीं पुन्हां तें कदा !
आशेनें दुसऱ्या दिनीं फिरुनि तो आला रवीचा कर,
गेला खिन्न मनें, परी न चमके त्या प्रेतमात्रावर.
पाण्यामाजि पुढें गळून पडलें तें वेडेंपिसें,
पाताळांत कुठें असेल दडलें का प्रेम निर्माल्य तें ?
छेः, छेः ! प्रेममय स्वरूप धरूनी भूतापरी हिंडतें,
कोठें आड उजाड जे, अजुनिही तेथें कधीं तें दिसे !
तें मेलें म्हणुनी उणें न ठरतें; मच्चित्त त्याला भुले !
मेलेल्या हृदया मदीय असलीं वाहीन मेलीं फुलें !

* * *

# गुलाबी कोडें

[ संध्याकाळीं सूर्य पश्चिम दिशेस असतांना पश्चिम तर तांबडी होतेच; पण पूर्व दिशेवरहि त्याच रंगाची छटा दिसते, हें पुष्कळांनीं पाहिलेंच असेल. ]

रंग गुलाबी संध्या पसरी पश्चिम दिग्भागीं,
समोर पूर्वा स्वमुख रंगवी त्याच रम्य रंगीं.
परी पश्चिमहृदयिं तांबडें सूर्यबिंब विलसे,
कशी रंगली पूर्वा याचें कारण कांहिं नसे,
विनोदचतुरा मुग्धा बाला विचारि निज नाथा
"शास्त्रज्ञा पंडिता उलगडा हें कोडें आतां !
अपरा वदनीं रमते लाली रविसहवासानें,
रवि नसतां परि कां रंगावें प्राचीच्या वदनें,
रंग इकडचा तिकडे वठला, छटा कुठुनि गेली ?
ही जादूची नजरबंदि कुणि कधीं कशी केली ?"
विनोदपंडित पति कौतुकला, हंसे तसा थोडें;
ओठ गुलाबी, गाल गुलाबी, गुलाबीच कोडें !
वदे तिला, "हें रहस्य असलें कथीन कानांत !"
करि कंठीं कर एक, दुज्यानें धरि दुसरा हात !
ओढुनि जवळीं ऐकविला तिस मुकाच कानांत,
--गालांवरचें गीत कसें तें वठवूं गानांत !
दूर सरकतां लज्जित बाला, प्राणनाथ बोले
"बघ हृदयाच्या आरशांत जें चित्र तुझे डोले ?
रविबिंबासम चुंबन बिंबचि विलसत या गालीं !
सहज तयाची छटा गुलाबी पसरे भंवतालीं.
चुंबनचित्र न परी उमटतां या दुसऱ्या गालीं,
सांग, वल्लभे ! नाचतेस कां त्यावरि ही लाली !

रंग इकडचा तिकडे वठला, छटा कुठुनि गेली,
ही जादूची नजरबंदि कुणिं कधीं कशी केली,
' कांट्यानें का काढावा कांटा ' शास्त्रज्ञा ठावें,
गुलाब टाकुनि गुलाबास मग कां नच उडवावें ?
हीं हृदयाचीं कोडीं सोडवि हृदयांचा मेळ,
शास्त्रांना हा कसा कळावा हृदयाचा खेळ ? "
ओठ गोष्ट मग कशी बोलली तीं मिटलीं तोंडें
' गोविंदाग्रज ' रसिकां टाकी गुलाबीच कोडें !

* * *

# प्रेमाची प्रामाणिकता

[ महाकवि बायरन् एके ठिकाणी प्रणयी जनाला असा उपदेश करीत आहे कीं, " प्रेमविषयापासून आपल्या प्रीतीची उत्कट व शरणागत उत्सुकता लपवून ठेवा म्हणजे तुमच्या इच्छेची पूर्तता होईल. " प्रस्तुत लेखकाच्या एका बुद्धिमान् मित्रानेंहि त्याच्याजवळ अशाच अर्थाचें विधान होतें. या दोन्ही प्रसंगीं या लेखकाला जरा चमत्कारिक वाटलें होतें. ]

सख्या ! सांगसी बोध हिताचा चातुर्याचा तसाच हा ॥
व्यवहाराच्या परी संगतीं प्रीति होइना सुखावहा ॥
दळादळाची पुरी खुलावट फूल उमलतें जरी करी ॥
रसिक भ्रमरा तरीच वाटे गुंगावेंसें तदंतरीं ॥
मेघांआडुनि रविकिरणें जरि स्पष्ट दर्शनें नच देती ॥
फुलें खालतीं काय उमलती ? किंवा रसरंगा येती ? ॥
मूठ झांकली लाखाची ती भरिते जरि चाळ तूट ॥
दैव उद्यांचें पहावया परि उघडावी लागे मूठ ॥

गंगास्नानें पावन व्हाया इच्छा झाली जरी मना ॥
देहावरचें वस्त्र तरि दूर करावें लागे ना ? ॥
प्रीतीची रसगंगा बघतां जीव विकारी असे जरी ॥
शिष्ट कल्पना त्यजुनी तयाच्या होतो आत्मा अविकारी ॥
हृदयार्पण जरि करणें आहे स्पष्ट-दान तरि करावया ॥
अश्रुजलासह अर्पावें या पुण्यमार्ग एकच सखया ॥
स्वप्रेमातें लपवायाचा बोध तुझा लाभो तुजला ॥
'गोविंदाग्रज' वाहिल प्रेमा हृदयासह निजअश्रुजला ॥

जळगांव १५-११-१९१६.

* * *

# प्रेमाखातर

[ प्रेमनिराशेमुळें हेतुशून्य व हताश झालेल्या मनुष्याला पुन्हां प्रेमाचा आधार सांपडला म्हणजे नवा जीव लाभतो असा एक प्रणयी पुरुष पावसाळ्यांत आपल्या प्रेमळ संजीवनीला भेटावयास निघाला असतां त्याच्या मित्रानें त्याला न जाण्याचा उपदेश केला आहे व त्या उपदेशाला त्या प्रणयी पुरुषाचें हें उत्तर आहे, अशी या गाण्याची कल्पना आहे. ]

प्रणयदर्शना जातां, मित्रा, न करीं उपहासा, ।
नको थांबवूं मजला, मानुनि फोल हृदयहासा ॥
कसले, डोंगर, नद्या कशाच्या, हीं विघ्नें कसलीं ? ।
प्रेमपथावर सारखींच हीं जरि असलीं नसलीं ॥
हृदयदेवतादर्शनिं आतां ओढ जिवा लागे ।
चला थांबवा त्याला, पाहूं फिरतो का मागें ॥
मार्गीं डोंगर नद्या पाहुनी घे पळता पाय- ।
असें निरर्थक निर्जिव माझें प्रेम असे काय ? ॥

नव्या दमाचा, नव्या जगाचा, ज्याचा अवतार ।
त्या प्रेमाचा वीर करारी काय न करणार ? ॥
हटतिल डोंगर, तटतिल सरिता न आपोआप ।
झटतिल मेघहि साह्य कराया धरुनि इंद्रचाप ॥
गिरिशिखरांची पडेल खालीं मोडुनिया मान ।
प्रेमापुढतीं सांग कुणाचा टिकतो अभिमान ॥
नव्या दमाचा, नव्या जगाचा, त्याचा अवतार ।
पाहुनि करितिल नद्याच त्याला स्वयें पैलपार ॥
जो निजहृदया फाडित चपलाप्रिया खेळवाया ।
वृष्टि कशी तो मेघ करिल वद मला थांबवाया ॥
तोच आपुल्या पंखांवरि मज वाहुनि नेईल ।
निदान मार्गी मला विजेचा दिवा दाखवील ॥
प्रेमें बोले, प्रेमें डोले, प्रेमें जग हाले ।
प्रेमाखातर जगीं आजवर काय नाहिं झालें ?
गिरितट फोडुनि नद्या कशाला धांवतात सांग ।
लता तरूविण सांग कुणाचे फेडितात पांग ? ॥
संध्याहृदयीं रमावयाला सूर्य धांवतो ना ? ॥
नातर गगनाच्या पड्यावर भटकवेल कोणा ? ॥
प्रेमासाठीं, रामापाठीं सीता वनवासी ।
वृंदेस्तव हरि स्मशानांतला वृंदावनवासी
रघुवीरांनीं जलनिधिवरतीं पर्वत नाचविले ।
सांग कोणतें संकट दुसरें त्यांवरि ओढवलें ॥
गोपिजनांच्या करुण रवाच्या ऐकुनि या ताना ।
कसा नखावरि गोवर्धन धरि गोकुळिंचा कान्हा ॥
पुराणांतल्या कथा कशाला पहा आजकाल ।
नाचतसे ना हवें तसें जग प्रेमें बेताल ॥

कां ब्राह्मणपद बादशहाला राणी मस्तानी
कां धर्मावर लाथ मारिली पंडितरायांनीं ॥

ब्रिजभाषेचा प्रेम वाल्मिकी प्रेतावर तरला ।
सांग तयाला प्रेमावांचुनि कोणीं हात दिला ॥

नजर गुंतली तुझी तरी कां तिकडे त्या नयनीं; ।
तसाच इकडे या नयनांस्तव मी बसलों ध्यानीं ॥

सतीदेवता पतिसह गेल्या रचुनि अग्निशय्या ।
प्रेमावांचुनि धीर कवण दे दुसरा लढवय्या ॥

तलवारींच्या धारेवरतीं जीवांचा नाच ।
रणशूरांनीं कां केला जा विचार त्यांनाच ॥

प्रेमाचा हा प्रभाव असला अखंड बा चाले ।
तशांत हें तर निराशेंतुनी प्रेम जन्मलेलें ॥

नव्या दमाचा, नव्या जगाचा ज्याचा अवतार ?
त्या प्रेमाचा वीर करारी काय न करणार ? ॥

* * *

## 'दिव्य प्रेमाची जाति'

संध्यापट गगनीं पसरी ।
तारांची राणी हंसरी ॥

कधीं गालिचा अरुणाचा ।
करि ती तेजस्वी नाचा ॥

शुक्रतारका अशी नभा ।
नवी नवी देई शोभा ॥

तारा गगनीं
परि भूवरुनी;
बघतां नयनीं
जी संचरते हृदयीं, ती।
दिव्य प्रेमाची जाति ॥ धृ० ॥ १ ॥

न मिळे अवसर अभिलाषा।
'दे घे' ची नाहीं भाषा ॥
भाव आमचा थरारला।
तरि दादहि त्याची न तिला ॥
एखाद्या किरणापुरता
प्रेमबंध होतो पुरता ॥
जिच्या जिवाला
तिळ मोबदला
नकोच कसला
निराश जन्मापासुनि ती
दिव्य प्रेमाची जाति ॥ २ ॥

चंद्र ज्या कुमुदांना।
काय जाणतो तो त्यांना ॥
फुलें हंसति पाहुनि रविला।
कळे न परि त्याचें त्याला ॥
चंद्रकांत मणि पाझरती।
चंद्र फिरे वरच्यावरतीं ॥
कवि कोठेंतरि,
ते कविता परि
फिरे दिगंतरिं,

रसिकमनें मग काव्यविरतीं
करिती ती दिव्य प्रीती ॥ ३ ॥
सौंदर्याचा उत्कर्ष ।
कुठें असे तरि दे हर्ष ॥
दिशाकाल होऊनि सान्त ।
त्या वृत्तित विरघळतात ॥
दर्शन—किंवा स्मरण पुरे ।
तन्मयता देहीं प्रसरे ॥
प्रभुची शोभा
दिव्य यशोभा
हरिते लोभा
तदाकार करिते वृत्ति
दिव्य प्रेमाची जाति ॥ ४ ॥
सौंदर्याच्या ज्या श्रेणि
तीं देवाघरचीं लेणीं ॥
जिवास होतां जाणीव
देहाची सांडी शींव ॥
उदात्त वृत्तीचा प्रसर ।
स्वार्थाचा पाडी विसर ॥
सौंदर्यानें
ऐश्वर्यानें
रंगुनि जाणें
दिव्य जीवनें तीं लोकीं
तच्चिंतनीं तदालोकीं ॥ ५ ।
प्रेमविषय अपरंपार
सूक्ष्म-रूप, भव्याकार ॥

निरभिलाष तन्मयता ती ।
दिव्य प्रेमाची जाति ।।
कौतुक, विस्मय, आश्चर्य
शून्यवृत्ति किंवा सभय ।।
अनेक परिचीं
त्या प्रेमाचीं
रूपें साचीं
आविष्करणीं जाणविती ।
दिव्य प्रेमाची जाति ।। ६ ।।

म्हापसें, १९१४.

* * *

# सामाजिक कविता

## दसरा

[ रूढीचें सीमोल्लंघन हाच समाजाचा दसरा. ]

चला आज हा आला दसरा !
पाउल पुढतें टाकायाला.
सीमोल्लंघन करावयाला,
आनंदानें नाचायाला,
सणामध्यें सण हाच खरा !
चौमासाला आतां विसरा !
मुसळधार तो पाऊस वरला,

तुडवित पायांखालीं चिखला,
शेत पेरिलें येत पिकाला,
येतां आनंदाचा दसरा !

पहिल्या दुभत्या गाई विसरा !
उन्हाळ्यांत त्या उडाल्याच ना ?
त्या गाईच्या खिल्लारांना
नव्या दमानें सोडा राना,
चला खाउं द्या पहांटचारा !

करा जरासा मुखडा हसरा !
आतां कां हीं तोंडें रडवीं ?
कडवीं बीजें करी गोडवी,
फुटलें तुटलें पुन्हांहि जडवी,
आला ना तो तुमचा दसरा

चला रूढिवर आतां घसरा !
टाकुनि सीमा मृत धर्माच्या,
दंभाच्या या अंधपणाच्या,
जुनेपणाच्या, अहंपणाच्या,
सीमोल्लंघनकालच्चि दसरा !

जुन्या मतांचा जाळा कचरा !
नव्या मताचे जे राऊत,
खरेखुरे मायेचे पूत,
येऊं द्या धैर्याला ऊत.
नका हातचा दवडूं दसरा !

नका हातचा दवडूं दसरा !
जुन्या ऋषींना सलाम ठोकुनि

करा तयारी छाती ठोकुनि
आजकालच्या ऋषींमागुनी
जा तिकडे नेइल हा दसरा !
श्रुतिस्मृतींना आतां विसरा !
अंधभक्तिचा पांगुळगाडा
मोडुनि तोडुनि उपडा पाडा !
पाताळीं तो नेउनि गाडा !
करा साजरा यापरि दसरा !

नेट धरा धीराचा जबरा !
खुल्या मनाचा अबलख घोडा
जीन नको उप्लाणी सोडा !
जेरबंद वा लगाम तोडा !
सीमोल्लंघनकालच दसरा
जुन्यापुराण्या चिंध्या विसरा
जरिपटका घ्या सुधारणेचा !
भगवा झेंडा नव्या मताचा !
नव्या दमानें फडकविण्याचा
मानवधर्माचा हा दसरा !

नव आशेच्या तृणांकुरांचा
तुरा शिरावर; चढवा साज.
मढवा न्यायाचें शिरताज,
समचित्ताचे बरकंदाज

चला जमूं द्या जमाव तुमचा !
काळाचें मैदान अफाट,
दिसतां कोठें खंदक खांचा

घा घोड्याला अमीन टांचा
वाऱ्यावरच्या करवा नाचा
कापा रस्ता आटोकाट !
चला निघूं घा असली स्वारी;
जुनाट पोकळ नगारखाना
उंटावरला कुणी शहाणा
वाजवितां त्या आधीं हाणा !
घ्या कृष्णाची करीं 'तुतारी' *

रूढीच्या किल्ल्यावर स्वारी,
'अगरकरां' ची झडवा नौबत !
'भागवतां' ची धराच हिंमत !
'केशवचंद्रां' चें घ्या चिलखत !
फुंका 'कृष्णाची' च 'तुतारी'

रूढीचा गड खालीं उतरा,
पाकोळ्या घुबडांना उडवा,
जिवंत सोनें अखंड लुटवा,
कृपण मनाचा रस्ता खुटवा,
असा साजरा कराच दसरा !

कसले पूर्वज घेउनि बसलां ?
होते मोठे सोन्या भरले
त्यांचें आतां काय राहिलें !
त्यांचें त्यांच्या मागुनि गेलें.
शिक्का कायमचा तो कसला !

---

* या गाण्यांत 'केशवसुतां'ची 'तुतारी' या सुधारणाप्रेरक जोरदार गीताचा उल्लेख 'कृष्णाची तुतारी' या नांवानें केलेला आहे.

उगाच खाउनि बसतां हाय !
पूर्वज आले चार पावलें,
एकसारखें पुढें सरकले,
म्हणुनिच ना ते इतके आले ?
त्यांना पूर्वज नव्हते काय ?

कुंभारासारखेच लोटें
खोटें ठरतें तत्त्व आज तें,
पूर्वज संतत पुढें चालते
घायकूत ही नसती धरिते
बडे बापके तुम्ही बेटे !

रडत बैसले महारमांग
दीनपणाला गर्वें छळतें,
आज्ञानाला भिउनी पळतें,
त्यां वर ध्याया नच जें वळतें
उच्चत्वा त्या लावा आग !

थांबा, ऐका देउनि कान
सुकल्या हातीं बाला कोमल,
तशाच विधवा करिती तळमळ
फत्तर फुटतिल येउनि कळवळ
कुठला पोकळ गताभिमान ?

चला उठा रे बांधा कंबर !
तुमच्यापुरतीं ही घी-शक्कर
टाकुनि, रूढीशीं द्या टक्कर !
युद्ध माजवा रे घनचक्कर !
फोडा कुचकें हें अवडंबर !

गेल्या धर्माचें हें भूत
पाहुनि बसलां कां रे भीत ?
नव्या मतांचे भालाईत
घोडे अपुले या उडवीत
नातरि रडते व्हा राऊत !

अंतकाळचें मैदान,
हिम्मतवाले चाबुकस्वार,
उत्साहाची करिं तलवार,
चित्साक्षीची ढाल तयार,
घोडा फिरवा रानोरान !

सरतां काळाचें मैदान
घोडा उडवा मग आकाशीं,
भिडवा नेऊनि स्वर्गापाशीं
पूर्णपणाशीं ईशपदाशीं,
तरीच होइल दसरा छान !

कुणी मनाचा असेल कच्चा
करील त्यालाही मनशूर
या गाण्याचे गाउनि सूर
' केशवपुत्रा ' चा महशूर
' गोविंदाग्रज ' चेला सच्चा !

* * *

# स्मशानांतलें गाणें

( बोलूनचालून भुतांचेंच गाणें, त्यांत अर्थ तरी काय असावयाचा व राग तरी काय धरावयाचा ? )

वाटे स्मशान शांतिस्थान ! ॥ ध्रु० ॥
सजीवतेचा चाले चाळा,
कवीस त्याचा ये कंटाळा,
त्रास जगाचा चुकवायाला,
शांतपणाचें, रूप जगाचें, अशा स्मशानीं जात ! ॥१॥

विश्रांतीस्तव निसर्गदेवी,
निजसदनींचा दीप मालवी,
( ज्यातें वदती अल्पधी रवी ! )
किंवा केल्या, तारा टिकल्या, फोडुनि झुंबर छान ! ॥२॥

प्रकाश रविचा यापरि मेला,
संध्यारक्षारूप पावला !
परी तिचाही शेवट झाला,
आकाशीं जी, 'गंगामाजी' पडे तिच्या तीर्थांत ! ॥३॥

अनंत-तारा-तारका-नयनीं
जरी यावया खुणवी रजनी
चंद्र न वरती परि ये भिऊनी,
स्थिति जी रविची, तीच तयाची, होइल हें भय त्यास ! ॥४॥

दुष्कृत्यांचा बहर चालला,
जोड तयांच्या कृष्णत्वाला
द्याया, अंधारही पसरला,
दुष्टत्वाशीं, अंतरनाशी, मिसळुनि जाई त्यांत. ॥५॥

भयाण जागीं, भयाण कोळीं,
भयाण वृत्ती होत निराळी;
भयाण झाली तों आरोळी !
जरा दचकला, कवि तो उठला, ऐके देउनि कान. ॥ ६ ॥

" शांतीची ही स्मशानकारा,
सजीवतेला इथें न थारा,
म्हणती मरुनी पडतो वारा !
प्रेत जगाचें, जर हें साचें; कसला मग हा नाद ? ॥ ७ ॥

पवन गातसे कां बेसूर ?–
हंसें भुतांचें कीं भेसूर,–
प्रेतांचा चौपदरी सूर–
कीं प्रेतांतुनि, सुटला म्हणुनी आत्मा करि थैमान ? " ॥ ८ ॥

तों सरणांतुनि अस्थिच उठती,
त्यांचीं तुटकीं प्रेतें होतीं,
स्कंधीं त्यांच्या भुतें बैसती !
करिती बडबड, शब्दही न धड, कवि वसधी अनुमान. ॥९॥

अणुरेणुंच्या अवकाशांत
प्रेतांचे कण हे शिरतात,
स्वैर घर्षणें ध्वनि करितात
स्मशानांतलें, गाणें चाले; त्याचा हा पडसाद. ॥ १० ॥

रातकिड्यांचा किर्र शब्द या
निघे, सारखा सूर धराया,
श्वान रडे हे साथ कराया.
तुझिया हृदयीं, धडधड जी ही, धरि तबल्याचा ताल ! ॥११॥

कवि ऐकुनि हें स्तब्ध जाहला,
प्रकार सारा कळे तयाला
मृत जिव्हेला फांटा फुटला !
ऐकायासी, त्या गानासी, करि आत्म्याचा कान. ॥१२॥

"धन्य धन्य" ती स्मशानभूमि ।
धन्य येथलीं भुतेंहि आम्ही !
सदाहि देवा या सुखधामीं—
घडवी वसती; सजीव जगतीं, नको नको आम्हांस ! ॥१३॥

धन्य तशी ती मानवजाति !
श्रेष्ठपणा जी मिरवी जगतीं,
सजीवतेचा आव घालिती,
भुतें परांतें, वदतां भूतें, तिरस्कार ये फार ! ॥ १४ ॥

बाह्यरूप नच भुतांस म्हणुनी
तुच्छ मानिती त्यां अवगणुनी,
द्विविधरूप जरि धरिती प्राणी—
तरि बाह्यांतर, रूपीं अंतर, जहनम्से अस्मान् ! ॥ १५ ॥

देवनाम भूतांप्रति पळवी,
देवाची त्यां कळे थोरवी,
मानव नवसें परि त्यां फसवी !
कोणी म्हणती, "ईश्वर नास्ति", हाच तयाचा मान ! ॥१६॥

अनेक माता, एकचि वनिता,
न्यायमार्ग हा ऐसा असतां,
अनेक वनिता, एकचि माता !
व्यर्थ पसारा मांडिति सारा, नीतीच्या जगतांत ! ॥ १७ ॥

भुतें भुतांसच कधीं न खाती,
बंधु बंधुच्या रंगत रक्तीं !
बाप मुलाची करितो माती ! ||
हा जगताच्या मनुष्यतेच्या, प्रेमाचा बाजार ! || १८ ||

नीतीसाठीं वपन मांडिती,
प्रेताह्नातीं नवरी देती,
अनाथ विधवा पदीं चिरडती !
सैतानावरि, ताण असा करि, सृष्टीचा सुलतान ! || १९ ||

शास्त्रांचे तोंडांत फवारे,
रूढीचे परि गुलाम सारे !
स्वतंत्रतेचें उसनें वारें;
पक्षी सदनीं, बसले कोंडुनि, गाति यशाचें गान ! || २० ||

समानतेच्या मारी बाता,
वरच्या लत्ता झेलित माथां,
सर्वेच खालीं झाडी लाथा !
न ती निवारी, न ही आवरीं, बेशरमी हैवान ! || २१ ||

अन्नावांचुनि सपिंड मरती;
मरतां त्यांचें पिंड अर्पिती !
सजीव तोंवरि लत्ता देती
मरतां घेती, खांद्यावरती, उफराटा सन्मान ! || २२ ||

पुण्यविक्रया करि धनदानीं,
मांग बसे तो उच्च स्थानीं !
भाविकतेला शिवे न कोणी
कपटी मांजर, दिलें तया घर, दारिं इमानी श्वान. || २३ ||

दोन पतींनीं विधवा न सती,
पतिव्रतेला परि पांच पती !
धर्म माळला आईवरती;
परी आपुलें, तेंच चांगलें, विवेक झाला ठार ! ॥२४॥

देवद्वारीं बसला नंदी,
राजद्वारीं स्वारशिबंदी,
रक्ष्य जनाला होई बंदी;
रक्ष्य वस्तुला, धक्का अपुला, रक्षण राखी प्राण. ॥२५॥

गर्भीं भार धरि तिजला भजती,
धेनु दुग्धदा, माता वदती,
भार वाहुनि आजन्म पोषिती !
मरतां उदरीं, मातृभूमि धरि, परी तिशीं बेमान ! ॥२६॥

विधवा मार्गीं मागें फिरवी,
मांजर अडवें कार्य बिघडवी,
कर्तृत्वाची हीच शोरवी !
प्रेतां हंसतां, कार्यक्षमता, न धरी परी गुमान. ॥२७॥

भुतें बिचारीं रात्रीं फिरती,
म्हणुनी त्यांतें तिरस्कारिती;
रात्रीची तर गोष्ट दूर ती—
परि दिवसांही दुष्कर्मांही पाडिति जन अंधार ! ॥२८॥

केसांनीं जे गळे कापिती,
स्त्रीच्या केसांनीं ते तरती !
प्रायश्चित्तें शुद्धहि होती.
शास्त्रें रडती, कराच सत्कृति, तरिही हलते मान. ॥२९॥

धर्मस्त्रीचा गळा कापुनी,
समाधान मग करी हिंडवुनि,
तुळशीभंवतीं देवायतनीं,
विचित्र लीला, दावुनि तिजला, दे दुःखावरि डाग ! ॥ ३० ॥

गोपी सोळा सहस्र असती,
तरिही वृंदेसाठीं श्रीपति
निघे स्मशानीं; धीर न पोटीं !
तुळशीभंवतीं, विधवा करिती, काय न हाच विचार ? ॥ ३१ ॥

वैराग्याच्या सोप्या गोष्टी
राम रडे परि सीतेसाठीं !
ब्रह्मा लागे मुलिच्या पाठीं !
भोळा शंकर, स्त्री अंकावर, गणेश राखी दार ! ॥ ३२ ॥

घराच्या देवां स्त्रिया न भजती,
पुराण-कीर्तन धुंडित फिरती,
देवहि त्यांचे वेश्यांभंवती
विवाहकालीं, शपथ वाहिली; दोघे पाळिति छान ! ॥ ३३ ॥

सुधारणेचे भक्त निपजती,
“ स्वतंत्रता द्या स्त्रियांस ” म्हणती,
पारतंत्र्य परि अपणा वरिती,
परानुकरणीं दंग; सोडुनि स्वत्वाचा अभिमान. ॥ ३४ ॥

कोणि काढितां नवी कल्पना,
करिती सारे वृथा जल्पना,
मिळतां यश त्यां, देउनि माना—
पायां पडतां, लाज न चित्ता, म्हणतो तो अवतार ! ॥ ३५ ॥

सफेत येतो रंग शिराला,
रंग आंतला तसाच काळा!
वृद्धपणा नच दुष्टत्वाला,
भय काळाचें,—नच देवाचें—तेंहि परी देहास!॥ ३६॥

चुना पांढरा, कातहि काळा,
रंग तयांतुनि निघे निराळा!
सहकार्यातें, असल्या ताळा!!
दोघे मिळुनी, एक ठिकाणीं करिती परस्परनाश!॥ ३७॥

मित्रपणानें पडे गळयांत,
गळफांसहि तो घालित हात!
कुणी कुणाचा करणें घात—
नेम न याचा; उपकाराचा मोबदला अपकार!॥ ३८॥

सुखदु:खांचा भावहि नसतां,
सुखदु:खाचीं दात्री समता.
सुखी व्हावया भगवद्‌गीता
वेद मंथुनी, श्रीकृष्णांनीं, हेंच काढिलें सार!॥ ३९॥

बळी पोंचतां भुतें न छळिती,
अल्पतुष्टता हास्यास्पद ती,
मानवतेची परी न रीती,
पिंड जयाचा खातो त्याचा करितो जगिं बोभाट!॥ ४०॥

म्हणती आम्हां भुतें बाधती!
भूतांची परि नाहीं छाती—
जायाची या असल्या जगतीं!
भुतेंच भीती या भूतांप्रति, भुतें भुतां हीं खास!॥ ४१॥

“ मरतां मानव भुतें निपजतीं ! ”
बोलायाची परि ही रीती,
भांगेतुनि कां तुळशी निघती !
कोठें आम्हीं, कोठें तुम्ही, कशास कांहीं ठाव ? ॥ ४२ ॥

ब्रह्मपदाहुनि आत्मा ढळतो,
मरुनि जगाच्या स्मशानिं येतो,
मग मानव—छे: ! भूतचि होतो,
चितेंत जळुनी, दिव्य भोगुनी, सुटतो आत्माराम ! ॥ ४३ ॥

भुतें विदेही, मानव सुंदर,
दिव्य भूमिका स्मशान-मंदिर,
प्रवेश येथें फारचि दुष्कर !
प्रेत आणितां, बोले जनता, “ राम कहो श्रीराम ! ” ॥४४॥

इतुकें गाऊनि भूतें हंसलीं,
अखेरची जणुं तान घेतली,
तया वाहवा घुबडमंडळीं—
‘ घू घू ’ शब्दें, देत मग वदे, घ्या आतां आराम ! ॥ ४५ ॥

श्वानहि साथ करोनी दमले,
विधवेनें मृत बालक त्यजिलें,
दूध तयाच्या मुखिं सांपडलें,
पिउनि तेवढे, बघुनि कविकडे, हांसत पडले श्वान ॥ ४६ ॥

कवि हें पाहुनि विस्मित झाला.
म्हणे “ पात्र मी न या स्थळाला ! ”
पळुनी पापी जगांत आला,
स्मशानांतलें गाणें असलें, कवीस नुरवी भान ! ॥ ४७ ॥

म्हणे " वरुनि जग दिसतें सुंदर—
' राम ' जाणतो ' क्या है अंदर '
स्मशानांतलें गाणें सत्वर—
अमोल म्हणुनी, टाकि उधळुनी, चहूंकडे जगतांत ! ॥४८॥

* * *

# कवि आणि कैदी

[ संसृतीच्या पाशांत सांपडलेला आत्मा एखादे वेळीं तरी आपल्या परिस्थितीच्या वर जाण्याचा विचार करतोच; पण मायावश आत्ममूढता त्यांला खालीं ओढते. अविकारी आत्म्याच्याच ' कवि ' आणि ' कैदी ' अशा दोन बाजू आहेत. ]

( चाल—एडका मदन० )

मार भरारी ! चल तोड बंधनें सारीं ! ॥ धृ० ॥
पायीं गंजत बेडी पडली,
न कळे कोणी केव्हां घडली;
पुढची चाल परी तव अडली,
व्याद भिकारी ! चल तोड बंधनें सारीं ! ॥ १ ॥

अवजड बेडीसह जड पाय,
अनाथ जीवावरतीं हाय !
टाकुनि चिरडिसि कोमल काय,
निर्दय भारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ २ ॥

नसतां मुळींच तूं अपराधी,
कोण तुझ्या ही पायीं बांधी ?
करुनी निधडा निश्चय आधीं,
फटका मारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ३ ॥

तुटतां असली भिकार बेडी,
हंसतिल तुजला भणंग वेडीं,
कोणी तुजशीं धरितिल तेढी,
तयां धिक्कारीं ! । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ४ ॥

मारी गरुड भरारी गगनीं,
सुख तें शेणकिडा कां जाणी !
जाई शेणामधेंच कुजुनी !
सुखाचा वैरी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ५ ॥

असल्या शेणकिड्यांच्या जाती,
जिकडे तिकडे बुजबुज करिती,
केवळ मरण्यासाठीं जगती,
येत ओकारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ६ ॥

प्रकाश बघतां घुबडें दडतीं,
एकांताची आवड वरतीं,
रातींबेरातीं परि फिरती,
घाण ही भारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ७ ॥

भिडतो गरुड सदा गगनाशीं,
वातावरणीं वसतिहि खाशी, !
लावुनिया टक तेजोराशि, !
बघती घारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ८ ॥

जाऊं त्यांमागुनि धीरानें
काढूं शोधुनि लपलीं भुवनें
गगनामाजि निघतिल गगनें
करी तयारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ९ ॥

रविकिरणांचे दोर मोकळे,
बांधूं नवमेघांचे दोले,
वारा देईल त्यांतें झोले,
धन्य संसारीं ! । चल तोड बंधनें सारीं ! ॥ १० ॥

* * *

# एक समस्या

असे एकदां दोघे चौघे कामाला प्रातःकाळीं ॥
घरांतुनी बाहेर निघालों; घाई जाण्याची सगळी ॥
तोंच थडकली समोर येउनि वृद्धा विधवा दारांत
अपशकुन हा पाहुनि बसला त्रासिक चरका चित्तांत ॥
" वेळ साधिते कशी बरोबर पहा अशी पीडा नसती ॥
या विद्रुप अवदसा सारख्या अशा चहूंकडे वणवणती " ॥

* * *

चार पावलें पुढें सरकलों विसरुनि सारें झोंकांत ॥
एक अडाणी कुणबट आलें कागद घेउनि हातांत ॥
अडवुनि बोले, " वाचुनि दावा दादा कागद हा इतुका " ॥
त्रासुनि वदलों, " बाबा, आम्हां दुसरीं कामें नाहिंत का ?
गिचमिड ओळी भिकार अक्षर लावित बसणें हें कोणी ।
दुसऱ्या कोणाच्या पाठीवर लाद नेउनी ही गोणी ॥
येईना वाचतां तुम्हांला तरि पत्रांचा व्यवहार ॥
कां करितां मग उगाच हा अव्यापारेषु व्यापार ? "
दिलें चिटोरें त्याचें त्याच्या अंगावरतीं टाकून ॥
चालूं झालों गप्पा मारित कांहीं कांहीं हांसून ॥

* * *

जातां किंचित् पुढें आढळे-नांव न घेणें कवनांत ॥
डोकीवरतीं पाटी घेउनि अगदीं शेजारुनि जात ॥
त्या घाणीनें मस्तक फिरलें-रागहि आला भरपूर ॥
वोलत कांहीं आम्ही झालों त्यापासुनि आधीं दूर ॥
" इतका झाला दिवस तरी हे खुशाल अजुनी फिरतात ॥
घाण घेउनी चहूंकडे ही हवे तसें वावरतात ॥
उर्मट तर हे इतके असती बेमुर्वत देतिल धक्का " ॥
बंदोबस्तच या लोकांचा नाहीं केला कुणि पक्का " ॥

*    *    *    *

जातां जातां पुढें यापरी एक दिसे पिंपळपार ॥
दत्ताचें देवालय खालीं छोटेसें शोभे फार ॥
सुंदर तरुणी हिंडत होती त्या देवांच्या भंवतालीं ॥
निरखुनि बघतां-हरहर ! होती विधवा ती बाला असली ॥
उचंबळुनी ये करुणारस-नेत्रहि अश्रूंनीं भिजले ॥
निर्दयता दैवाची बघुनी हृदय बिचारें तें थिजलें ॥
न्यायदेवता जागृत झाली त्या सौंदर्या बघतांच ॥
विषय दयेचा लावित नाहीं कोणाच्या जीवा आंच ? ॥
" धिग् धर्माला-धिग् रूढीला-तेतिस कोटी देवांना–" ॥
किती बोललों-नको सांगणें ! पाठ असे तें सर्वांना–" ॥
काम कशाचें ! धाम कशाचें ! एक प्रश्न मग हृदयांत ॥
" सुधारणा होणार तरि कधिं या दुर्दैवी देशांत ? "

अनुष्टुभ्

प्रश्नाच्या उत्तरासाठीं रसिकां जोडुनी करां ॥
' गोविंदाग्रज ' प्रार्थी कीं समस्या पूर्ण ही करा ॥

पुणें. ११-१२-१९१७

* * *

# कल्पना प्रचुर कविता

## चिमुकलीच कविता !

नाजुक सुंदर गोंडस चिमणी बाला दशवर्षा
कोण कुणाची कुठें चालली उधळित ही हर्षा !

हात चिमुकले, पाय चिमुकले, चिमुकलाच बांधा,
भूदेवी-स्वर्देवी यांतिल हाच काय सांधा !

धवल वर्ण हा देहावरती फुलत्या पुष्पाचा,
लाल छटा वर, जणूं पसरला रसचि गुलाबाचा !

त्याच फुलांच्या वळुनि पाकळ्या पोकळशीच घडी,
झालि तीच वाऱ्यावर हलत्या ओठांची जोडी !

सडा पसरला आंत कोंवळ्या बारिक मोत्यांचा,
ओंठांआडचि अर्धा पडला खेळ पहा त्यांचा !

इवलीशी हनुवटी गोजिरी, खळी तिच्यावरि ही,
निजहृदर्यिच उतराया वर्तुळ मुख जणुं लांबवि ही, !

सरळ नासिका चांफेकळिचा जणुं अंतर्भाग,
दळांआड दडलेला परागमय अवकाशांग.

कपाळपट्टी विशालतेचें बालरूप पहिलें,
कुणा भाग्यवंताचें भावी भाग्य त्यांत लिहिलें ?

किंचित् खुलत्या भिंवया-चिमणीं धनुष्येंच साचीं
चित्रपटांतिल काय चिमुकल्या रामलक्ष्मणांचीं ?

नखाएवढ्या दोन हिरकण्या हंसती-त्यांखालीं
तेजोरूपा श्रीकमला जणुं निजकमलीं रमली !

फुलें बसविलीं वलींवरतीं; गगनीं तारांना
त्याच मुहुर्तीं त्याच करें कां विधि करि या नयनां!
किरणां किरणां टाकुनि भंवतीं या नेत्रांमधुनी
पापस्पृष्टा वसुंधरेला बाला का न्हाणी!
अभ्यासास्तव सोडित उघडुनि नयनांची खाण
बालमदन निर्दोष किरणमय हे बोथट हे बाण!
केस कोवळे सरळचि काळे, कुरळेहि कांहीं,
तुळतुळीत मोकळे; मनासम नच बंधन त्यांही!

गालिं लोळती कांहीं, कांहीं कानावर पळती,
पवनीं खेळति कांहीं किंवा मानेवर ढळती;

पाशरूप पुष्कळसे परि ते पाठीवर रुळती!
चकचकीत जणुं लहरि जलाच्या पवनें झुळझुळती!

बालसर्प जणुं, अथवा उपमा कुणी अशी द्यावी!
तच्छिरिं बसवुनि साप निजशिरीं पाप कोण बसवि?

तळपति जललहरी रविकिरणीं जणूं जागजागीं,
उंच सखलशा सुटल्या वेणीच्या बंधनभागीं.

झुळझुळ मंजुळ आहे चिमणा ओघ जसा कांहीं,
गमते रमते उगमस्थानीं ही कृष्णाबाई!

गाल कोवळ्या गुलाबकळिचीं रूपें विधिमनिंचीं
पदार्थसंसर्गाविण नुसत्या चिंतनमय खनिचीं!

लज्जा निर्मायाची स्फूर्तिच विधिनयनीं चमके,
त्या नयनांनीं बघतां गालीं लाली ही फडके!

चुंबन घेतां येतिल गालचि हे श्वासासरसे
वाऱ्यावर वाहुनीच चुंबक ओंठांसह खासे

सहज मुखावर हंसे खेळतां गालीं गोड खळ्या !
फुटती मुग्धचि आनंदाच्या तयांतुनी उकळ्या !
ओंठ केशाचे-देंठचि फुलत्या पारिजातकांचे !
हास्यरसाचे करी मोगरा सांचे कलिकांचे !

कां हंसते सारखी अशी ही ? नेत्रहि हंसती कां ?
फुलें झेलि चालती बोलती ललितदला लतिका !

कीं भावी प्रणयाचें अत्तर हृदयपुष्प पिळुनी—
बालमदन करी; उडे हास्यमय सुवास दरवळुनी.
किंवा कांहीं क्रियाच इजला येत नसे दुसरी ?
निष्कारण म्हणुनीच सदाची मुद्रा ही हंसरी !

नखें पदतलीं, कीं, वर्खाच्या टिकल्या चकचकत्या,
कापुनि कच्चीं पोंवळींच मृदु केल्या का चकत्या !

करांगुलीमधिं बालमुद्रिका विराजते भद्रा,
पवित्रतेच्या सम्राटाची हीच राजमुद्रा !

तिलक गोजिरे गोंदवणाचे हिरव्या रंगाचे,
शुभ्र मुखावर तुषार कुठल्या दिव्य तरंगांचे !

निळ्या नभीं वर शुभ्र तारका जमवितात मेळ,
शुभ्रमुखनभीं इथें निळ्याशा तारांचा खेळ !

इचा उद्यांचा धनी कोण, हें ठरवावें म्हणुनी,
पुण्याईचें गणित करित विधि दशांशचिन्हांनीं !

लाल छटा वदनिंची नभींच्या शुभ्र मौक्तिकांत,
कोर बालचंद्राची विलसे संध्याहृदयांत !

रक्त कपालीं दिला रक्ततर कुंकुमतिलक बरा,
अरुणपटावर मांगल्याचा नव मंगलतारा !

चिमण्या देहा शोभविणारी चिमणीशी साडी
नीटनेटकी नेसवुनि हिस कोण कुठें धाडी ?
घालित वाला चित्रिंचेच का चित्र अलंकार,
स्वप्नांतिल संसार कुणाच्या घे कीं अवतार !

केला विधिनें स्त्रीत्वाचा हा टिचभरचि नमुना,
नवतीर्थास्तव हिंडति संगततनु गंगायमुना !
गर्भजन्म या उपाधि भोगी कीं ही तद्‌तीता
कीं भूमींतुनि अशीच वर ये ही दुसरी सीता !

उषा-चंद्रिका जणूं भेटल्या, त्या संगमकालीं
तांबुस धवलहि रस पाझरतां काय त्यांत न्हाली !
किंवा स्वर्गांतुनि ही सुटुनी आली आतांच,
नंदनवनिंचा मंद वात तरि करि भंवतीं नाच !

महाकवींच्या कल्पनेंतली भावमूर्ति का ही ?
बलवत् भावें स्फुटतर होउनि वस्तुरूप वाही !
पहा थांबली विभ्रमललिता सलीलगति बाला,
बालभाव मनिं विमल, जोडि करयुग परमेशाला.

अहा ! कोणता भाव असे हा पापमना न कळे !
द्रवुनि भक्तिनें आत्मा सारा देहीं कीं खेळे !
देवमनीं निजभक्ताविषयीं वसे भावना जी
भावरूप ती काय खेळते या हृदयामाजी ?

शुद्ध भाव, हा तिच्याच मनिंच्या पुण्याचा वारा,
हाच भाव, भगवंता ! आतां जगत्त्रयीं पसरा.

हात जोडुनि, विमले बाले ! मागितलें काय ?
स्फूर्तिनेंच कीं पावित्र्याच्या नत झाला काय ?

जें पावन, जें विशुद्ध, त्याची तूं मंगलमूर्ति,
देव कोणती करील आतां तव आशापूर्ति ?

तुझ्या मनींचा विमल भाव हा कळतां तया क्षणीं
दगडाचा देवही वांकविल देह तुझ्या चरणीं !
स्वर्गहि तुजवर धरिल सारखी दिव्याची गळती ।
त्वद्दर्शनपुण्याला मुकले गतमुनि हळहळती !
तीर्थे, पुण्यें, देवदेवता, ज्यां पाहुनि पळती,
तसलीं पापें नेत्रकिरण तव पडतां क्षणिं जळती !

टाक नजर एकदां तरी ती या पाप्यावरती—
स्वर्गि सहज तरि जाण्याइतकी पुण्याची भरती.

शुद्धभाव-परिपूर्ण मनीं क्षण मजला जाऊं दे-
कवित्व पावन करून घ्याया जराच राहूं दे-

ओघ एकदां त्या कवितेचा जगांत वाहूं दे,
नांव तरी पापाचें उरतें का मग पाहूं दे.

मम हृदयाच्या हिंदोळ्यावर चल ये घे झोले,
त्यांतुनि निघत्या कवनश्वासें विश्व सहज डोले !

कवनस्फूर्ती, मंगलमूर्ती, जराच धांव गडे !
दिव्य सुधारस वर्षू जगतीं ये जिकडेतिकडे !

अहा ! चालली बाला टाकुनि मज संशयवादीं
रंगत गुंगत दंग सदा ती आपल्याच नादीं !

नवल न तिजसह नेत्र जरी मम हे भिरभिर फिरती
भुलतें, खुलतें, डुलतें, झुलतें विश्वचि तिजभंवतीं !
पावित्र्याची उषा काय, कीं, कळी पूर्णतेची !
आशी कीं ही जगास पुढच्या प्रभुतन्मयतेची !

किंवा कांहीं तरल कल्पना कुणास आठवली,
नटवावी कशि कवनीं ती या विचारिं मति रमली;
तोंच चुकवुनी डोळा धांवे कल्पनाच बाल
स्वच्छंदानें पांघरल्याविण शब्दाची शाल !

पवन पिउनि मग तिची होत का अशी बालमूर्ति
बाला कसली खास तीच ही नवकवनस्फूर्ति !
भरभर फिरते मग वाऱ्यावर ताराया जगता
कुण्या कवीची चुकलीमुकली चिमुकुलीच कविता !

मूर्तिमती कविताच यापरि हृदया हालवितां
'गोविंदाग्रज' ही गाई मग चिमुकलीच कविता !

* * *

# बागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास—

थांब जरासा बाळ ! ॥ ध्रु० ॥

सुंदर खाशा प्रभातकाळीं,
चहूंकडे हीं फुलें उमललीं,
बाग हांसते वाटे सगळी !
शीतल वारा, या जलधारा कारंजाच्या छान !
थांब जरासा बाळ !

रम्य तडागीं निर्मळ पाणी,
गाति पांखरें गोजिरवाणीं,
आनंदाचीं बसलीं ठाणीं,
खरें असे रे ! तरी नको रे मारुं लाडक्या धांव !
थांब जरासा बाळ !

पाहुनि सौख्याचा हा ठेवा,
सृष्टि करीलचि माझा हेवा !
माझ्यापासुनि फसवुनि न्यावा,
यत्न परोपरि, करितिल सारीं, भुलशिल तूं लडिवाळ !
थांब जरासा बाळ !

तऱ्हेतऱ्हेचीं फुलें विकसलीं,
रंगी बेरंगी हीं सगळीं,
तूंही शिरतां त्यांच्या मेळीं,
माझें मग तें, फूल कोणतें, कसें ओळखूं सांग ?
थांब जरासा बाळ !

बघ सुटला हा मोठा वारा,
वायुवृत्ति तव देहहि सारा !
उडवुनि नेइल तुला भरारा !
दिगंतराला; जातां बाळा ! पुन्हां कसा मिळणार !
थांब जरासा बाळ !

स्वच्छ तडागीं प्रतिबिंबातें,
पाहुनि वेड्या धरावया तें,
चुकुनी जाशिल पाताळातें !
तयासारखा, क्षणीं पारखा होशिल बा आम्हांस !
थांब जरासा बाळ !

किती बुडबुडे पाण्यावरती,
इकडुन तिकडे तरंगताती,
चंचल लहरी, तूं त्या साथी,
क्षणांत बा रे लपाल सारे, काळाच्या उदरांत !
थांब जरासा बाळ !

फूलपांखरें हीं स्वच्छंदी,
तूंही त्यांच्यासम आनंदी
क्षणांत पडशिल त्यांच्या फंदीं !
त्यांच्या संगें, त्यांच्या रंगें, जाशिल उडुनी दूर !
थांब जरासा बाळ !

अशा तुला मग बागडतांना,
भरभर वाऱ्यावर फिरतांना
फुलांत दडतां कीं उडतांना,
कवण उपायीं; आणूं ठायीं, पुन्हां लाडक्या सांग ?
थांब जरासा बाळ !

शब्दांवाचुनि मंजुळ गाणें,
( अर्थ तयाचा देवचि जाणें ! )
गाइल माझें गोजिरवाणें,
सप्तसुरांपरि या वाऱ्यावरि विरुनी जाशील पार !
थांब जरासा बाळ !

बालरवीचे किरण कोवळे,
कारंजावर पडति मोकळे,
रंग खेळती हिरवे पिवळे,
धरावयासी त्या रंगांसी, जाशिल बाळा खास !
थांब जरासा बाळ !

जडावेगळीं अमूर्त मूर्ति,
कल्पकतेचीं कीं तूं स्फूर्ति,
पुण्याची मम आशापूर्ति,
रविकिरणांवरि, जलधारांतरिं, तन्मय होशिल पार !
थांब जरासा बाळ !

* * *

# अरुण

अहा ! उगवला पहा अरुण हा उधळित तेजाला.
जगा जागवी, तसा जागवी कविच्या चित्ताला.
जसा उडवि हा अरुण चहुंकडे गगनीं रंगाला,
तसा पहा कवि उडवी अपुल्या चित्त–तरंगाला !
विश्वसूत्रधर सारुनिया करि पडदा रजनीचा
जगद्रंगभूवरि का उडवित गुलाल गगनींचा !
करी मंगलाचरणा मंजुल द्विज गुंजारव हा,
येत्या संसाराची नांदी चाले काय अहा !
पूर्वदिशेवर लाल रंग हा कोण कुठुनि उधळी !
किंवा फुटली तिच्याच हृदयीं प्रेमाची उकळी
रविसदनाच्या गवाक्षास ही काय लाल कांच ?
पल्याड लपलें तोंड तयाचें, दिसेल आतांच ?
प्रातःकाळीं गगन-पुष्प कीं सूर्याचें फुललें ?
सुगंधमकरंदांचे रस हे चहूंकडे झुकले !
सदा सर्वदा जगदुद्धारा धरिती ज्या घेर
त्या मंगल सरितांचें आहे का हें माहेर !
कुणी महात्मा विश्वोद्धारास्तव तप आचरितां
उचंबळुनि का वाहत त्याच्या हृदयाची सरिता !
गत पुण्याच्या पुष्करिणींतुनि तेज काढण्याला
उडी रवीनें घालितांच का फेंस उचंबळला !
अखंड सौभाग्याची सरिता माझी भूमाता
काय लाविते कपाळभर ती हा मळवट आतां !

कीं सोडुनि जी अम्हां चालली कष्टें निस्तूळ
महाराष्ट्र-लक्ष्मीची त्या ही दिसे पायधूळ !

भरतें स्वर्गीं ये पितरांच्या करुणारसरंगा ।
अम्हां आळशांवर मग ये कीं पूर्वपुण्यगंगा !

कल्पलतांवर फुलें बहरतां सडा परागाचा
काय तरंगे स्वर्गंगाजलिं तांबुस रंगाचा !

दिनरजनींच्या फटींतून या फार दूर ओंड
दिसतें कीं हें कालगर्भिच्या स्वर्गाचें तोंड !

हा रजनीच्या उदरीं दिसतो गर्भचि दिवसाचा,
कीं, काळाचा बाळ नवा हा नव्याच नवसाचा !

दिनरजनींचा, शुभाशुभांचा, पापापुण्यांचा,
मंगल संगम रंगपटचि हा दावित गगनाचा !

काय निघाला मानसपुत्रचि विराट पुरुषाचा
विश्वैक्यास्तव मिरवित हा ध्वज विश्वसमत्वाचा !

विश्वहितास्तव रोज सोडि जो रविला गगनांत;
पुराणपुरुषाचा कीं उघडा पळता तळहात !

विश्वहितपरा ही खिस्ताची रक्तमया माया,
महंमदाच्या पैगामाची किंवा ही काया !

शांत रस या अभंग वाणी प्रसवे तुकयाची,
दया परतली कीं बुद्धाच्या उदार हृदयाची !

दिव्य भावना भक्तमनीं ज्या त्यांची ही मूर्ति,
भाव कवींच्या रसवंतीची कीं अस्फुट स्फूर्ति !

आज निपजत्या प्रीतीचा हा मंगल अभिषेक,
जगदीशाच्या कृपावृष्टिची कीं पहिली फेंक !

पतिव्रता गतसती जयांचें अग्निशयनिं निजणें
अखंड सौभाग्याचें त्यांचें किंवा हें लेणें !

यज्ञकाळची ही रामाची सोन्याची सीता,
येत्या अवताराची छाया, कीं रक्तस्फीता !

कीं, भवितव्या देवीच्या या विमल दुग्धधारा
धांवत सुटल्या, परितोषाया विश्व शुद्ध सारा !

उद्धाराया पुन्हां धांवली किंवा भवभीतां
श्रीकृष्णाच्या मनिं उरलेली श्रीभगवद्गीता !

भावि कालचें हें स्वर्गाचें स्वप्न असे काय ?
ब्रह्मस्वाचा भावि सगुण कीं तेजोमय काय ?
विश्व रची जी आधीं, करि मग वृद्धि पुढें त्याची
' आज ' रचाया आली का ती इच्छा ईशाची !

ब्रह्मपदाच्या किल्ल्यावर कीं फडकें जरिपटका !
चिरंतनाची सनद मानवां, तिचा ताम्रपट का !

अंत न पाही भगवंताला आली काय दया !
चिन्मंगल मग उभें नभीं हें भूवरि उतराया !

अहा ! तयाच्या स्पर्शें होई शुद्ध हृत्तरंग,
दिव्य दृष्टिला पुरता कळला अरुणाचा रंग.

मना ! कल्पना पुरे ! प्रभूची हीच असे जाण
सौंदर्याची, मांगल्याची, प्रेमाची खाण !

प्रीतिरसाच्या, सौंदर्याच्या, देवींच्या मूर्ति
नित्य निर्मि ही परमेशाची अरुणमया स्फूर्ति !

आज उद्यांच्या महाकवींनो ! हृदयिं नीट ठेवा
प्रेमरसाचा, मांगल्याचा हा अद्भुत ठेवा !

अरुण-रसानें याच रंगवा मनिंचीं परि चित्रें,
रंगवीत जा तशीं उद्यांच्या देवींचीं चित्रें !
या रंगानें रंगवितों मी माझ्या हृदयाला,
पडद्यापडद्यावरी काढिलें चित्राचित्राला !
एका पडद्यावरि परि रंगे प्रेमचित्र एक !
हृदयाच्या हृदयांतिल माझ्या तोच शिलालेख !
त्या चित्राचा, त्या पडद्याचा, मम गाना धीर !
त्या चित्रांतिल देवीचा मी विकला शाहीर !
मरतां मी, तो जपाच माझ्या हृदयाचा पडदा !
त्या देवीचा झालों अगणित जन्मांचा बंदा !
तिच्या गालिंचा अरुण सारखा, लज्जे ! वाहूं दे !
' गोविंदाग्रज ' कविच्या ' अरुणा ' त्यांतच राहूं दे !

* * *

# हालत्या पिंपळपानास–

[ राहत्या घराच्या खिडकीसमोर पिंपळाचें पान वाऱ्यानें सारखें फडफडत होतें. परमेश्वराच्या इच्छेवांचून पानसुद्धां हालत नाहीं, या लौकिक श्रुतीवरून पुढील विचार सहजच मनांत वावरूं लागले. ]

कोंवळ्या हालत्या चिमण्या पिंपळपाना !
कल्पना हले तुज बघुनि असें हलतांना !

निजशाखेच्या या शेंवटच्या टोंकांशीं
हा हिरवा, तांबुस रंग काळसर कांहीं,
तूं भिरभिर फिरतां स्पष्ट भेद नच राही.

या झुळझुळत्या वाऱ्यानें नाचसी,
कोंवळया सूर्यतापानें तळपसी,
आपल्या मिश्र रंगानें झळकसी,
तुजकडेच माझें लक्ष सारखें लागे,
बांधिलें तयाला गूढ कांहि अनुरागें !

जीं गूढ अप्सरागीतें नभिं पाझरती,
तीं वाहत येती खालीं वाऱ्यावरती !
ऐकुनि तयांचे सूर मुके नवलाचे,
या हृदयकंपनें जीव काय तव नाचे ?

कीं जगीं ताप जो सारा उसळला,
रवितेजामाजि भरारा मिसळला,
लागतां तयाचा वारा, कोमला,

थरकांप होत हा तव कोमल देहाचा !
वद नाच भीतिचा कीं हा आनंदाचा ?
हें तुझ्याच दुःखें हृदय असें तडफडतें !
विश्वैक्यवृत्तिची ध्वजा काय फडफडतें ?
तूं स्वयें हालसी, कीं तुज कोणी हालवी ?
सुखदुःखीं झुलसी स्वतां इतर कीं झुलवी ?

कळतसे तुझें तुज का हें हालणें
कीं दुसऱ्यासाठीं आहे चालणें
कीं भावा वांचुनि पाहे डोलणें ?

तव अस्तित्वाचें ज्ञान असें का तुजला ?
तुज इच्छातृप्ति क्रियाभेद का कळला ?
तुजभंवतीं जी ही सृष्टि असे पानांची,

कल्पना असे का तिला तुझ्या नाचाची ?
रस एकच तरुचा तुम्हांमधून वाही—
सुखदु:खभाव ही जोडि तुम्हां कीं नाहीं ?

विश्वेंच्या विश्वें सारीं यापरी
स्थलिं भिन्न, भिन्न आकारीं, भूवरी
नांदतीं गड्या कांतारीं कितितरी !
जाणीव तुम्हांला परस्परांची का रे
जीवैक्य असे कीं भिन्न भिन्न जग सारें ?

क्रम हाच काय वद तुझ्या जीवनाचा रे ?
परिणाम करित का सृष्टिवर हें सारें ?
कुणि चित्रगुप्त हें लिहून ठेवित आहे ?
कीं स्वैरनदाच्या ओघावर हें वाहे ?

हें अवश्य जग चालाया का असे ?
कीं नसत्याहुनिही वायां हें पिसें ?
स्फूर्तिची कुणाच्या काया हलतसे ?

मम नयनिं चित्रसम जाऊनि बैसायाचें ?
इतुकेंच कार्य काय तुझ्या नाचाचें

मम कपाळीं दुर्दैवाच्या रेषा
मजसाठीं लिहिति चिरदु:खभोग हा पेशा
परि असति तुझ्या तर रेषा साऱ्या अंगीं,
दु:खही असे का तितुकें त्यांच्या संगीं ?

कीं वाऱ्यावरच्या ताना यापरी
उमटल्या अशा फिरतांना, तुजवरी ?
त्या फिरुनि फिरुनि घेतांना अंतरीं—

निजनादब्रह्मीं गुंग होउनि डुलसि !
तें गीत आंतल्या आंत ऐकुनी खुलसी ?

कीं दुर्दैवाच्या किंकाळ्या, या ताना,
तव कोमल हृदयीं ठेविति वण जातांना
खालती पडुनि मग मातींत मिसळुनि जाया,
तूं तडफड करिशी अशी भूमिवर याया ?

परि थांब, जरा गा गाना तोषदा,
ऐकवीं माझिया कानां एकदां;
स्थिर राहिं न, पिंपळपाना ! तूं कदा.

मज गाऊं दे, मज नाचूं दे, तुजसंगें,
सुखदुःख सारखें सेवूं मानसरंगें !
संबंध असो वा नसो आपणांमाजी,
मी एक कारणासाठीं तुजवर राजी.

नवबालाहृदयीं प्रीति नवी हलतांना
तच्छिरीं हलसि तुं तसाच पिंपळपाना !

जीं हृदयकंपनें सारीं मानसीं,
तीं आम्हांतें बाहेरी दाविशी ?
निर्दोष मनानें भारी हालसी,

कोणी बाला जरि मज देइल असला मान,
तरि सुखेंच होइन मीही पिंपळपान !

* * *

# स्फुट कविता

## राजहंस माझा निजला !

[ पतिनिधनानंतर अल्पावधींतच बापडीवर एकुलत्या एक मुलाचें निधन पाहण्याचा प्रसंग आल्यावर असा भ्रम कां होणार नाहीं ?

( चाल—उद्धवा शांतवन० )

हें कोण बोललें बोला ?
‘ राजहंस माझा निजला ! ’ ॥ ध्रु० ॥

दुर्दैवनगाच्या शिखरीं । नवविधवा दुःखी आई ।
तें हृदय कसें आईचें । मी उगाच सांगत नाहीं !
जें आनंदेंही रडतें । दुःखांत कसें तें होई—
हें कुणीं कुणां सांगावें !
आईच्या बाळा ठावें !
प्रेमाच्या गांवा जावें—
मग ऐकावें या बोला । ‘ राजहंस माझा निजला ! ’
मांडीवर मेलें मूल । तो हृदया धक्का बसला ।
होउनी कळस शोकाचा । भ्रम तिच्या मानसीं बसला
मग हृदय बधिरची झालें । अति दुःख थिजवि चित्ताला
तें तिच्या जिवाचें फूल !
मांडीवर होत मलूल !
तरि शोकें पडुनी भूल—
वाटतची होतें तिजला । ‘ राजहंस माझा निजला ! ’
जन चार भोंवतीं जमलें । मृत बाळा उचलायाला ।

तों काळ नाथनिधनाचा। हतभागि मना आठवला।
तो प्रसंग पहिला तसला। हा दुसरा आतां असला!
तें चित्र दिसे चित्ताला!
हें चित्र दिसे डोळ्याला!
निज चित्र चित्तनयनाला,
मग रडुनि वदे ती सकलां! राजहंस माझा निजला!
करुं नका गलबला अगदीं। लागली झोंप मम बाळा!
आधींच झोंप त्या नाहीं। खेळाचा एकच चाळा!
जागतांच वाऱ्यासरसा! खेळाचा घेइल आळा।
वाजवूं नका पाऊल!
लागेल तया चाहूल!
झोंपेचा हलका फूल!
मग झोंपायाचा कुठला। राजहंस माझा निजला!
हें दूध जरासा प्याला। आतांसा कोठें निजला!
डोळ्याला लागे डोळा। कां तोंच भोंवतीं जमलां!
जा! नका उठवुं वेल्हाळा। मी ओळखतें हो सकलां!
तो हिराच तेव्हां नेला!
हिरकणीस आतां टपलां!
परि जिवापलिकडे याला—
लपवीन! एकची मजला! राजहंस माझा निजला!
कां असलें भलतेंसलतें। बोलतां अमंगळ त्याला?
छबकड्यावरुनि माझ्या या। ओंवाळुनि टाकिन सकलां
घेतें मी पदराखालीं। पाहूंच नका लडिवाळा!
मी गरीब कितिही असलें!

जरि कपाळ माझें फुटलें !
बोलणें तरी हें असलें—
खपणार नाहिं हो मजला ! राजहंस माझा निजला !
हें असेंच सांगुनि मागें ! नेलात जिवाचा राजा !
दाविलाहि फिरुनी नाहीं । नाहिंत का तुम्हां लाजा ?
न्यावयास आतां आलां । राजहंस राजस माझा !

हा असा कसा दुष्टावा ?
कोणत्या जन्मिचा दावा ?
कां उगिच गळा कापावा—
पाहुनी गरिब कोणाला । राजहंस माझा निजला !
हे काळे कुरळे केश । खेळतात डोक्यावरती ।
ही दृष्टि पहा मम वदनीं । नेहमीं अशी ही असती ।
हें तेज अशा रत्नाचें । झालें का आहे कमती ?

कानांत नाचती डूल,
तोंडावर हंसरें फूल,
जीवाची घालुनि झूल—
मी असाच झांकिन याला ! राजहंस माझा निजला !
या अर्ध्या उघड्या नयनीं । बाळ काय पाहत नाहीं ?
या अर्ध्या उघडया तोंडीं । बाळ काय बोलत नाहीं ?
अर्थ या अशा हंसण्याचा । मज माझा कळतो बाई !

हें हंसें मुखावर नाचे !
जणुं बोल दुग्धपानाचे !
कीं मुक्या समाधानाचे !
इतुकेंहि कळे न कुणाला—। राजहंस माझा निजला !
या माझ्या मानससरसीं । सारखें प्रेमजल वाही !

त्या तरंगलहरींवरती । राजहंस पोहत राही !
सारखा पोहुनी दमला । मग मला भुकेला बाही !

नयनांच्या शिंपांमधुनी,
अश्रूंचे मौक्तिकसुमणी,
मी दिले तया काढोनी,

मोत्यांचा चारा असला । राजहंस खाउनि निजला !
ते वैकुंठेश्वर गेले । पदिं त्यांच्या अर्पायाला ।
ही अखंड या अश्रूंची । वैजयंति मोहनमाळा ।
मी करित असें केव्हांची । धरुनियां उराशीं बाळा ।

कौस्तुभ हा माळेमधला !
हृदयाचें कोंदण याला !
तो चोराया कां आलां !

दैत्याहुनि दैत्यचि झालां ! राजहंस माझा निजला !
हें असें जाहलें म्हणतां । तरि देवचि निजला कां हो ?
जरि निर्दय होउनि निजला । आळवीन फोडुनि टाहो
कीं असा पोटचा गोळा । पोटांतचि देवा राहो !

ही कुऱ्हाड आकाशाची,
मजवरती पाडायाची,
नाहींच कल्पना त्याची,

हा तुमचा कावा सगळा ! राजहंस माझा निजला ।
जरि दूत यमाचे आले । लाडक्यास या न्यायला ।
ते निष्ठुर असले तरिही । भुलतील पाहुनी याला !
हृदयाचें होउनि पाणी । लागतील चुंबायाला

मी मुका असा घेतांना—
हा पहा पुन्हां हंसला ना !
कां अशा फिरवितां माना ?
सुख खुपे काय डोळ्यांला ? राजहंस माझा निजला !
हें सर्वस्वाचें फूल । त्याभंवती झाला गोळा ।
मी बघतें कधिंचा आहे । त्यावरती तुमचा डोळा !
एकदां करावा त्याचा । वादानें चोळामोळा !
सर्वांच्या मनिंच्या लाहो,
हाच ना स्पष्ट बोला हो,
मी इतकी वेडी कां हो—
कीं हेंहि कळेना मजला । राजहंस माझा निजला !
जरि होउं नये तें झालें । तरि सोडणार या नाहीं !
पाळणाहि रुततो ज्याला । प्रेमें जरि निजवी आई !
तो देह खांच दगडांत छेः ! नको नको ग बाई !
हृदयाची खणुनी खांच,
झांकिन मी बाळ असाच,
दुःखांचे फत्तर साच !
जा ! जाउनि सांगा काळा । राजहंस माझा निजला !
जरि काळाचाहि काळ । बाळाला न्याया आला !
तरि नाहीं मी द्यायाची । या जीवाच्या जीवाला !
सारखीं गाउनी गाणीं । निजवीन कल्पवर याला !
जा ! करा आपुलें काळें
माझेहि दमले डोळे ।
प्राणांचें पसरुनि जाळें—
मी निजतें घेउनि याला ! राजहंस माझा निजला ! ”

* * *

सांगुनी असें सकलांशीं । मृत बाळ उराशीं धरुनी ।
तन्मुखीं स्वमुख ठेवोनी । चुंबिलें एकदां फिरुनी ।
पाहिलें नीट निरखोनि । झणिं तीहि गेली निजुनी ।

मग पुन्हां कधीं ती उठली,
जाणीव कुणा ही कुठली !
परि मति या प्रश्नें हटली—

"बोलेल कोण या बोला । राजहंस माझा निजला !"
मग मातापुत्रांवरि त्या । तरु गाळिति कोमल पानें ।
ढाळिती लता निज सुमनें । पशुपक्षीहि रडती गानें ।
दशदिशा दगडही कढती । मग दुमंगुनी शोकानें

दुमदुमतें स्थळ तें अजुनी,
त्या एकच करुणागानीं,
जा जाउनि ऐका कानीं !

ऐकाल याच बोलाला । "राजहंस माझा निजला !"

* * *

# अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस–

[ मध्यरात्रीच्या सुमारास कोकिळेचा शब्द, विषण्ण व निराश हृदयाला किती सांत्वनपर वाटतो, याची सुखनिद्रित मनाला साक्ष पटणार नाहीं. ]

अवेळ तरिही बोल–कोकिळे–अवेळ तरिही बोल ! ॥ धृ० ॥

रात्र पसरली जगतावरती,
भुरके काळे मेघहि फिरती,
वारा वाहे भरभर भंवतीं,
बालचंद्रचंद्रिका घाबरी गोरीमोरी होत.

उदासीनता छाया पसरी,
सृष्टि दिसे वरुनी हंसरी—
खिन्नताच जरि अंतरिं सारी,
व्यर्थ बोलतो, व्यर्थ डोलतो संसाराचा गोल !

आनंदाच्या प्रातःकाळीं,
दिवसाच्या गजबजल्या वेळीं,
किंवा संध्या जेव्हां नटलीं,
आनंदाचीं गाणीं गाया गवई लाखकरोड !

असतां आनंदाची माया,
वृद्धि क्षणभर तिची कराया
लागे ज्याचा तोच गावया,
आनंदाला द्विगुणित करिती आनंदाचे बोल !

परंतु जेथें उदासीनता
व्याकुल करिते विषण्ण चित्ता,
तेथें त्याला द्याया समता—
गागें गात्रें, हेंच अलौकिक ईश्वरतेचें काम.

बाह्य सृष्टि जरि निद्रा भोगी,
अंतःसृष्टि तरी हतभागी
उडते तशीच राहुनि जागीं,
निजवाया निजलागीं असलें गाणें गाई गोड !

अवेळ येथें कसली बाई ?
दुःखसांत्वना गा केव्हांहि !
अनुकंपेला नियम न कांहीं
रित्या मनीं या ओत सूर; त्यां जाऊं दे अति खोल.

वळवाचा हा वारा गार
झोंबुनि पीडा देई फार,
येत गवाक्षांतुनि अनिवार;
येतां जातां सूर काढितो भलभलते भेसूर !

खिन्न चांदणें ढगाआडचें
भग्न मनोरथ झाले ज्याचे—
हंसें जणूं तें अशा मनाचें,
पुष्पवतीच्या तोंडावरची छाया काय उदास !

या अवकाळीं–या एकांतीं
निद्रेची मिळवाया शांति
थकुनी भागुनि पडलों अंतीं,
निद्रा कुठली परि त्या हृदया, भविष्य नाहीं ज्यास.

हातीं संसाराचीं मातीं,
मनिंच्या आशा मनींच खाती,
भूतकाळचीं भूतें रडती !
मिटल्या जाग्या डोळ्यांपुढतीं शून्याचें मैदान !

निष्प्रेमाची शेज सोबती,
भयाण दुनिया सारी भवंतीं,
विषण्ण येती विचार चित्तीं,
बाह्यांतर विश्वांत खेळते उदासीनता एक !

गा तर चित्ता मम रमवाया;
हीच खरी जादूची माया;
आनंदा खेळविणें वाया,
मशाल दिवसा लावुनि होतो लाभ कुणाला काय !

दूर कराया उदासीनता
गाच गडे ! अंगाई गीता,
झोंप येऊं दे माझ्या चित्ता,
लक्ष लागतें सुरांकडे तव; वाटति ते बिनमोल !
पाहुनि ही तव दयाशीलता
द्रवेल कोणी भगिनी माता,
शांत कराया हताश चित्ता—
रुक्ष जगावर स्त्रीहृदयांतिल टाकिल अश्रू एक !
त्या अश्रूच्या शीतलतेनें
भोंवतालची आग जाळणें,
निद्रा घेतां शांत मनानें
' गोविंदाग्रज ' ऐकत राहिल गुंगींतहि हे बोल !
कोकिळे ! अवेळ तरिही बोल !

* * *

# केशवसुत मेले ?

जगतास जागवायाला केशवसुत गाउनि गेले !
इंग्लंद भूमि शेलेची माहेर जडाचें बनलें,
सन्देश गूढ जे त्याचे तैसेच मानसीं जिरले,
तपोवना मानवतेच्या या बघतां मानस हंसलें

देवांचे हेतु न पुरले,
अर्धेच कार्य जें उरलें;
ते येथें करुनी गेले,
अवतरुनी फिरुनी शेले ! केशवसुत गाउनि गेले !

वळवाचा हा वारा गार
झोंबुनि पीडा देई फार,
येत गवाक्षांतुनि अनिवार;
येतां जातां सूर काढितो भळभळते भेसूर !

खिन्न चांदणें ढगाआडचें
भग्न मनोरथ झाले ज्याचे—
हंसें जणूं तें अशा मनाचें,
पुष्पव्रतीच्या तोंडावरची छाया काय उदास !

या अवकाळीं-या एकांतीं
निद्रेची मिळवाया शांति
थकुनी भागुनि पडलों अंतीं,
निद्रा कुठली परि त्या हृदया, भविष्य नाहीं ज्यास.

हातीं संसाराचीं मातीं,
मनिच्या आशा मनींच खाती,
भूतकाळचीं भूतें रडती !
मिटल्या जाग्या डोळ्यांपुढतीं शून्याचें मैदान !

निष्प्रेमाची शेज सोबती,
भयाण दुनिया सारी भवंतीं,
विषण्ण येती विचार चित्तीं,
बाह्यांतर विश्वांत खेळते उदासीनता एक !

गा तर चित्ता मम रमवाया;
हीच खरी जादूची माया;
आनंदा खेळविणें वायां,
मशाल दिवसा लावुनि होतो लाभ कुणाला काय !

दूर कराया उदासीनता
गाच गडे ! अंगाई गीता,
झोंप येऊं दे माझ्या चित्ता,
लक्ष लागतें सुरांकडे तव; वाटति ते बिनमोल !
पाहुनि ही तव दयाशीलता
द्रवेल कोणी भगिनी माता,
शांत कराया हताश चित्ता—
रुक्ष जगावर स्त्रीहृदयांतिल टाकिल अश्रू एक !
त्या अश्रूच्या शीतलतेनें
भोंवतालची आग जाळणें,
निद्रा घेतां शांत मनानें
'गोविंदाग्रज' ऐकत राहिल गुंगींतहि हे बोल !
कोकिळे ! अवेळ तरिही बोल !

* * *

## केशवसुत मेले ?

जगतास जागवायाला केशवसुत गाउनि गेले !
इंग्लंद भूमि शेलेची माहेर जडाचें बनलें,
सन्देश गूढ जे त्याचे तैसेच मानसीं जिरले,
तपोवना मानवतेच्या या बघतां मानस हंसलें
देवांचे हेतु न पुरले,
अर्धेंच कार्य जें उरलें;
ते येथें करुनी गेले,
अवतरुनी फिरुनी शेले ! केशवसुत गाउनि गेले !

एकेका शब्दें भरले काव्याचे अद्भुत पेले !
ज्यांसाठीं मानव झटले, ते सुधाकुंभ भरलेले—
वाग्देवी वरुनी टाकी केशवसुत हृदयीं झेले !
अनुभवुनि निजानंदानें
मग त्यांचें केलें गाणें,
श्वासाच्या कारंजानें
चहुंकडे उधळुनी दिधलें ! केशवसुत गाउनि गेले !
हे तुषार पडतां अंगीं बिंदूंचे सिंधू झाले !
निजलेल्या जागृति आली, हो ताजें जें थकलेलें !
मरणासचि आलें मरणें; मग केलें त्यानें काळें !
तों शब्द मुक्याला सुचले !
गूढास रूप सांपडलें !
स्वच्छंद अचेतन हाले !
नश्वर तें ईश्वर केलें ! केशवसुत गाउनि गेले !
भेदभाव विलया गेला, सूक्ष्मांत स्थूल मिळालें !
गगनाचे फाटुनि पडदे दिसलें जें त्यापलिकडलें !
मरणाचें मूळच तुटलें, जन्माचें नातें सुटलें !
वस्तूंत वस्तुपण भरलें,
जीवंत जीवही झाले,
आत्म्यास आत्मपद आलें,
ब्रह्महि ब्रह्मसें ठरलें ! केशवसुत गाउनि गेले !
कळलें कीं 'आम्ही कोण', * 'हरपलें श्रेय' सांपडलें;
आत्मा हो 'वेडापीर', सृष्टींत 'भृङ्ग' सा रंगे;
मारुनियां 'गोफण' काळा निज 'निशाण' नभिं फडकविलें !

* हीं केशवसुतांच्या कवितांचीं नांवें आहेत. अरेरे ! हेंहि सांगावें लागतें !

ऐकतांच विजयि ‘ तुतारी ’
हो चिरंजीव ‘ म्हातारी ’;
मग वाजवितांच ‘ सतारी ’
सर्वत्र ‘ झपूर्झा ’ झालें ! केशवसुत गाउनि गेले !
या स्थितींत त्या ब्रह्माची ब्रह्माशीं मिळणी घडली.
जें चिरंतनाच्यासाठीं सांगता तयाची झाली.
परी जनता वेडी कुठली, “ केशवसुत मेले ” वदली !
परि जन्ममरण हें वारें
कल्पनाच नाचवि सारें !
मूर्खांनो ! रडतां कां रे,
कीं “ केशवसुत ते मेले ! ” केशवसुत गाउनि गेले !
जे एकाठायीं होते, ते सर्वांठायीं भरले;
सर्वांच्या हृदयीं भरलें सर्वांच्या जीवीं भिनलें;
विश्व स्थिर ज्यांनीं केलें, कां वदतां तेच--निमाले ;
लीलेनें त्यांनीं गातां
ही सजीव केली जडता;
अणुरेणूंमधुनी आतां
निघतील तयांचे चेले ! केशवसुत गाउनि गेले !
सर्वठायिं सर्वहि काळीं सर्वांनीं ज्यास पहावें,
पाहतां पाहतां वाटे डोळ्यांनीं ज्यास गिळावें,
तो विषय होई मरणाचा जन बोले; काय करावें ?
जें चकव्यावांचुनि चकले
जरि ते कुणि कांहीं भकले,
तरि ‘ गोविंदाग्रज ’ बोले
केशवसुत कसले मेले ? केशवसुत गातचि बसले !

# घुंगुरवाळा

[ जगाच्या संगीतांत शब्दमय काव्यापेक्षां निःशब्द किंबहुना, नादशून्य सुद्धां काव्याचाच भरणा विशेष आहे. अल्लड मातेला सातआठ महिन्यांच्या चिमुकल्यानें उत्कट आनंदानें वाळा वाजविला म्हणजे एकाग्रतेनें ऐकत राहवेसें वाटतें, तें याच कारणामुळें. ]

वाजिव रे बाळा ! वेल्हाळा ! रुमझुम् घुंगुरवाळा ! ॥ धृ० ॥
अस्फुट विश्वाचें । प्रेमाचें । गाणें आनंदाचें–
वदलों जे नादी । संवादी । तुझिया जन्माआधीं–
पहिल्या प्रीतीचे । गंमतीचे । कांहींसे भीतीचे,
बाळा ! ते बोल । तूं बोल । आज मनीं जे खोल ।
रात्रीच्या काळीं । जों बसली । ब्रह्मानंदीं टाळी,
मनिं तेव्हां बाणें । जें गाणें । अस्फुट मंजुळवाणें.
धीर न परि हृदया । उघडाया । उघडपणें तें गाया !
वदलों मग पाहीं । दोघेंही लाजुनि कांहीं कांहीं !
हृदयीं खळबळलें । दरवळलें । विना ऐकिल्या कळलें !
गाणें मंजुळ तें । झुळझुळतें । तुझिया वाळ्याभंवतें !
वाळा हाळूं दे । बोलूं दे । आनंदें डोलूं दे.
एकच हा चाळा । वेल्हाळा । घे रे तान्ह्या बाळा !
एकच पायाचा । वाळ्याचा । नाच गोड बाळाचा–
ऐकुनि आनंदें । त्या छंदें । घर सगळें नाचूं दे !
'गोविंदाग्रज' ही । कवनांही । त्या छंदावर गाई !

* * *

# ' समसमां संयोग कीं जाहला ! '

—कृष्णशास्त्री चिपळूणकर

[ अशीं फुलें नेहमीं सांपडत नाहींत, म्हणूनच जगांतले ग्रामोफोन कविहृदयाच्या नालायकीचीं गाणीं गात असतात. ]

संध्याकाळ सदा उदास करितो माझ्या अभागी मना ।
त्यानें हर्षति जीवमात्र, परि तो मातेंच दे यातना ॥
नित्याचा क्रम हा ठरविला कीं कांळ जायाप्रती ।
कोठेंही तरि शून्यवृत्ति फिरुनी, येणें घरा मागुतीं ॥ १ ॥
येतां एक दिनीं असेंच, दिसली वेली कुठेंशी मला ।
होतीं कांहिं फुलें तिच्यावर—मना आनंद तैं वाटला ॥
घ्यावीं काढुनि दोन तीन म्हणुनी जों जीव माझा भुले ।
वारा वाहुनियां जरी-भरभरां सारीं उडालीं फुलें ॥ २ ॥
वेलीचीं नव्हतीं फुलें—तिजवरी होतीं कुणीं टाकिलीं ।
( प्रेमाचे शुकपाठ बोलत नटी, तें आठवे त्या स्थलीं ) ॥
कांहीं त्यांतुनि घेतलीं उचलुनी, चालावया लागलों ।
"यांचें काय करूं" विचार करितां हा मी परी भागलों ॥ ३ ॥
कोणी मित्र मला पुढें भटकतां वाटेमधें भेटला ।
प्रेमें ओढुनिया स्वकीय सदनीं तो शीघ्र नेई मला ॥
माझें स्वागत तो करी बहुपरी खेदास न्याया लया ।
ग्रामोफोनहि लाविला; रिझवि तें गाणें मना माझिया ॥ ४ ॥
त्या गाण्यांतिल शब्दसंघ पडला होता मनासारखा ।
गाणाराहि गळा किती मधुर तो लोकींच या पारखा ॥
अर्थानें तर वेड लागत मना; उत्कर्ष झाला रसा ।
नाहीं एकच तेवढें हृदय तें; हा खेळ, देवा ! कसा ॥ ५ ॥
ग्रामोफोनवरी तेव्हां संतोषें जीव हर्षतां ।
फुलें तीं टाकुनी होई ' गोविंदाग्रज ' चालता ॥ ६ ॥



* * *

# भीमकबाळा

[ माझ्या ' वेड्याच्या बाजारांत ' एका उपवर मुलीच्या तोंडीं हें साधें गाणें तिचीच स्थिति वर्णन करण्यासाठीं घातलें आहे. गाणें त्या मुलीनेंच केलें आहे अशी कल्पना आहे. माझी स्वतःची एवढीच कविता मला आवडते. ]

( चाल—यादवराया भाई याहो )

भीमकबाळा ती वेल्हाळा टाकुनि गोपाळा ।
निश्चय केला बंधुवरानें द्यावी शिशुपाळा ॥
विवाहकाळीं खळ तो आला तंव राजसबाळा ।
शोकभरानें विव्हळ झाली, दोष देइ माळा ॥
" अजुनि तरी या दासीसाठीं या हो गोपाळा ।
काळवेळ ही जवळी आली, संकट हें टाळा ॥
ऐन समयिं कां निष्ठुर झालां ? काय असें केलें ? ॥
दीनांवरिचें प्रेम सदाचें आज कुठें लपलें ? ॥
कधिं वाहिनसें झालें मजला सांवळि ती काया ।
कधिं वाहिन ही काया माझी देवा तव पायां ॥
कधीं सांठविन रूप मनोहर या नयनीं देवा ।
मिळेल केव्हां अभागिनीला प्रेमाचा ठेवा ॥
नका करूं छळ याहुनि माझा अजुनी घननीळा ।
वाट बघूं किति घेऊनि हातीं अश्रूंची माळा ? ॥
किती आळवूं परोपरीनें कंठ किं हो सुकला ।
तरी यावया अजून माझा माधव कां चुकला ? ॥
सर्वसाक्षि भगवंता ! आतां अंत नका पाहूं ।
—कीं विषपानें प्राण तरी हा पदकमळा वाहूं ॥

मीच अभागी; म्हणुनी आपण अजुनी नच आलां ॥
ब्रह्म सगुण जें दुर्लभ सकळां; मिळे कसें मजला ? ॥
रडतां यापरि अश्रुजलानें पदर भिजुनि बाई ।
ऊर भरूनि ये–शब्द न चाले–कवन विरुनि जाई ॥ १ ॥

* * *

# स्मृतिगीत

[ माझ्या ‘ प्रेमसंन्यास ’ नाटकांतील नायिकेच्या तोंडीं हें गाणें ठेविलें आहे. उत्तररामचरित्रांतील ‘ ते हि नो दिवसा गताः ’ एतदन्त सुप्रसिद्ध श्लोकाची लीलेच्या–नायिकेच्या–कोमल हृदयावर पडलेली ही विततच्छाया आहे अशी कल्पना करून तिनेंच हें गाणें जोडलें आहे असें दाखविलें आहे. एरवीं भाषांतर करण्याची माझी इच्छा नव्हती. ]

( चाल—चंद्रकांत राजाची )

आठवतो का सांग, सखे ! तो काळ विवाहांचा ॥
बाळपणाचा, मुग्धपणाचा निर्मळ भावाचा ! ॥
संसाराचें चित्र चिमुकलें, चिमुकलेच जीव ॥
फुललें नव्हतें हृदयांचेंही राजस राजीव ! ॥
पाहत होते तात तदा त्या लीला बालांच्या,
जणुं आठवती त्यांसहि लीला त्याच सुकालाच्या ॥
जपति परोपरि प्रसन्नहृदया पुण्यमया माता ॥
गेले ते दिन, सीते, यापरि हा ! बघतां बघतां ॥
बाळपणींचे प्रसंग जणुं ते घडति आज फिरुनी ॥
चित्रपटा या अश्रुजलानें चल टाकूं धुवुनी ॥
तूं सीता ती; राम तोच मी; त्याच आज माता ॥
परि जे गेले दिन ते आतां येतिल का हाता ?

कशास आशा नसती आतां--झालें तें गेलें ! ॥
सुकलें फूल न देत वास जरि अश्रूंनीं भिजलें ॥

* * *

## कळ्यांचीं फुलें कशीं झालीं ?

( ला बाइला० ही चाल--थोडा फेरफार करून )

बाळ कुणी । संध्याकाळीं रमे गुणी ॥
खेळतसे । बाळ अंगणीं हवें तसें ॥
बागेंत । मौजेनें झोके घेत ॥
तों दिसली । सुंदरशी त्याला वेली ॥
देंठ कोंवळे । हिरवे पिवळे । नाजुक सगळे ॥
ती वेली । हिरवा शालू पांघरली ॥ १ ॥

परि तया । हवा सोबती खेळाया ॥
खेळगडी । मूल फूल सुंदर जोडी ॥
पाहतसे । परि वेलीला मूल नसे ॥
तिच्या कळ्या । होत्या मिटलेल्या सगळ्या ॥
जणुं दमल्या । फार खेळुनी; मग निजल्या ॥
हवेंत डुलणें । हेंच खेळणें । खेळुनि निजणें ॥
ही त्यांची । गादी हिरव्या पानांची ॥ २ ॥

बाळ गुणी । वाइट वाटे फार मनीं ॥
दिवसभरी । खेळुनि आला परत घरीं ।
झोंपेंत । कितीदां गेला बागेंत ॥
धीर कुठें । पहांट होता बाळ उठे ॥
बागेंत । धांव तसाची तो घेत ॥

मौज तों किती। कळ्या न दिसती। फुलेंच हंसती ॥
बाळ डुले। चहूंकडे पाहून फुलें ॥ ३ ॥

आईला। शोधाया धांवत गेला ॥
मग बोले। आई बघ हीं गोड फुलें ॥
काल कळ्या। आज फुलें झाल्या सगळ्या ॥
कशा उमलल्या। कुणीं हंसविल्या। हांसत बसल्या ॥
कशा कळ्या। आई, सांग मला सगळ्या ॥ ४ ॥

मग आई। बाळाला उत्तर देई ॥
"खेळासी। जमति चांदण्या आकाशीं ॥
त्या हंसती। चहूंकडे पाहत बसती ॥
तों दिसल्या। कळ्या बिचाऱ्या हिरमुसल्या ॥
कळवळल्या। फार चांदण्या मग रडल्या ॥
आंसू पडले। ते दंव झाले। धांवत आले ॥
भुईवरी। पडले साऱ्या कळ्यांवरी ॥ ५ ॥

तो साचा। रंग पांढरा तारांचा ॥
कळ्यांवरी। चहूंकडें जाउनि पसरी ॥
मग हंसल्या। कळ्या फुलें हंसतां झाल्या" ॥
सर्व असें। आई बाळा सांगतसे ॥
ऐकुनि हें। बाळ तिच्या वदना पाहे ॥
कां न कळे। मिठी मारिली तिला बळें ॥
त्या काळीं। आई आनंदें हंसली ॥
हंसतां रडली। असवें पडलीं। त्याच्या गालीं ॥
तों साची। कळी उमलली बाळाची ॥ ६ ॥

* * *

## एकच मागणें !

आहे जो विधिलेख भालिं लिहिला कोणास तो नाकळे।
आहे जो सुखदुःखभोग नशिबीं, कोणास तो ना टळे ॥
आहे जीवित हा हिशेब सगळा–हा बोध चित्तीं ठसे।
देणें हें गतकाळिंचें सकळही सव्याज देणें असे ॥ १ ॥

आशा मावळल्या; समूळ तुटले हृद्‌बंध नानापरी।
इच्छा केवळ दुःखदा, अनुभवें हें बाणलें अंतरीं ॥
आतां एकच मागणें तव पदीं, देवा, असे एवढें।
संसारी मिळतां न तें मन सदा शोकाग्नितापें कढे ॥ २ ॥

आतां दुःख नको, नकोच सुखही, होणार होवो सुखें।
इच्छा वावरती मनांत, तरि हीं केलीं मुकीं तन्मुखें ॥
" जें कांहीं घडतें सदैव तुझिया इच्छाबळें तें घडे ॥ "
ऐसें जाणुनि सोसण्यास मज तें सद्‌धैर्य दे तेवढें ॥ ३ ॥

* * *

## निजलेल्या बाल-कवीस–

[ माझे परमप्रिय मित्र रा. **त्र्यंबक बापूजी ठोमरे**–महाराष्ट्रसवंतीचे रसाळ बांधव–'आनंदीआनंद' करून सोडणारे सुप्रसिद्ध बाल-कवि– एकदां प्रातःकाळ अतीत झाला तरी झोपेंतच गुंग होते; गद्यांत दोनतीनदां हांका मारून फुकट गेल्यावर पुढील गीतवादानें त्यांना जागें केलें. सदर पद्य फारच थोडया वेळांत केलें असल्यामुळें बाल-कवीचें यथार्थ गुणवर्णन त्यांत कोठून सांपडणार ? त्यांच्या ' अरुण ' व ' चौघडा ' या दोन मुरलीगीतांचा प्रस्तुत गीतांत उडता उल्लेख केला आहे. ]

जगद्‌गायका बालकवे ! चल, ऊठ ऊठ आतां ॥
तूंच निजसि तरि कोण सांग मज जागवील जगता ॥ ध्रु० ॥

हा तुझा अरुण बघ उगवे पूर्वेकडे ॥
वद कोण तयाचें गाणें गाईल गडे ॥
हा देवद्वारीं चौघडाहि घडघडे ॥
करि कोण तुझ्याविण बोल तयाचे खडे ॥
तव कवनाची वाट पाहती पहा उगवतीं किरणें ॥
गाउनि गाणीं प्रेमळ त्या उल्हास तूंच रे देणें ॥ १ ॥

बघ सृष्टीचे कवि कसे भरारति गगनीं ॥
गातात कोणत्या स्वैर सुरांचीं गाणीं ॥
चल एकजीव हो लौकर त्यांच्या गानीं ॥
स्वर्गांत सांग मग तेंच आमुच्या कानीं ॥
सौंदर्याची द्वाहि फिरविण्या बा तव अवतार ॥
मग ऊठ निजसि कां असा गड्या रे झोंप झालि फार ॥२॥

बघ फुलें उमललीं आतां सारीं नवीं ॥
तव रसवंतीचीं फुलेंहि आम्हां हवीं ॥
तव रसाळ रसना-रससागरिं जग झुलवी ॥
रस उधळुनि गगनीं लपल्या मुकुलां खुलवी ॥
नव्या सृष्टिच्या नव्या यशाचा तूंच शिलेदार ॥
नव कवितेच्या जरिपटक्याचा तुलाच अधिकार ॥ ३ ॥

तव गान खळाला नेईल पुण्याकडे ॥
शिकवील यमाला सदयत्वाचे धडे ॥
फत्तरांत वाजविल प्रेमाचे चौघडे ॥
नेईल सज्जनां आनंदापलिकडे ॥
सूर खडा धर लावुनि गगनापलिकडे नक्की ॥
करिं पुढें खडा जगदीश देउनी प्रेमगांठ पक्की ॥ ४ ॥

भ्रमभरें विश्व हें सर्व जयांमधिं बुडे ॥
चल फोडुनि टाकूं ते फसवे बुडबुडे ॥
मग बसूं जाउनि काळाच्याही पुढें ॥
तव सुराबरोबर कोण न यापरि उडे ॥
'गोविंदाग्रज' कविसि * तुजसवें ने देउनि हाता ॥
जगद्गायका बालकवे ! चल, ऊठ ऊठ आतां ॥ ५ ॥

* * *

## श्रीमहाराष्ट्रगीत

मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्रदेशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्रदेशा ॥ ध्रु० ॥
राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा ।
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा ।
अंजनकांचनकरवंदीच्या कांटेरी देशा ।
बकुल फुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा ।
भावभक्तिच्या देशा, आणिक बुद्धीच्या देशा ।
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा ।
ध्येय जें तुझ्या अंतरीं,
निशाणावरी,
नाचतें करीं.
जोडी इहपरलोकांसी ।
व्यवहारा परमार्थासी ।
वैभवासी वैराग्यासी ।

---

* स्वतःकडे हा शब्द लावून घेतला याबद्दल उदारहृदयांकडून क्षमा होईलच अशी आशा आहे.

जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा ॥
प्रणाम-घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्रदेशा ॥ १ ॥

अपार सिंधुच्या भव्य बांधवा ! महाराष्ट्रदेशा ।
सह्याद्रीच्या सख्या ! जिवलगा ! महाराष्ट्रदेशा ॥
पाषाणाच्या देहीं वरिसी तूं हिरव्या वेषा ।
गोदा, कृष्णा, भीमा तुझिया ललाटिंच्या रेषा ॥
तुझिया देहीं करी प्रतिष्ठा प्रथम प्राणांची ।
मंगल वसती जनस्थानिंची श्रीरघुनाथांची ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं० ॥ २ ॥

भिन्न वृत्तिचीं भिन्न भिन्न ही एक जीवसत्त्वें ।
तुझिया देहीं प्रकट दाविती दिव्य जीवतत्त्वें ।
चित्पावन बुद्धीनें करिसी तूं कर्तबगारी ।
देशस्थाच्या खुल्या दिलाची तुजला दिलदारी ।
कायस्थाचें इमान फिरवी रक्ताचा फेर ।
ठाक मराठी मनगट दावी तुझें हाडपेर ।
ध्येय जें तुझ्या अंतरीं० ॥ ३ ॥

ठायीं ठायीं पांडवलेणीं सह्याद्रीपोटीं ।
किल्ले सत्तावीस बांधिले सह्याद्रीपाठीं ।
तोरणगडचा, प्रतापगडचा, पन्हाळगडिचाही ।
लढवय्या झुंजार डोंगरीं तूंच सख्या पाहीं ॥
सिंधुदुर्ग हा, विजयदुर्ग हा, ही अंजनवेल ।
दर्यावर्दी मर्दुमकीची ग्वाही सांगेल ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं० ॥ ४ ॥

तुझ्या भुकेला वरी नागली आणि कणीकोंडा ।
वहाण पायीं अंगिं कांबळी उशाखालिं धोंडा ॥

विळा-कोयता धरी दिगंबर दख्खनचा हात ।
इकडे कर्नाटक हांसतसे, तिकडे गुजरात ।।
आणि मराठी भाला घेई दख्खन-कंगाल ।
तिकडे इस्तंबूल शरारे, तिकडे बंगाल ।।
ध्येय जें तुझ्या अंतरीं० ।। ५ ।।

रायगडावर माय जिवाची गवळण बिनधोक ।
झोंक हिरकणी नांव ठेवुनी जाइ रोखठोक ।।
करीत पावन अर्पुनि पंचप्राणांचा पिंड ।
हिरडस-मावळचा श्रीबाजी, ती पावन खिंड ।।
करी रायगड रायरिचा तो जिजाइचा तान्हा,
कोंडाण्याचा करी सिंहगड मालुसरा तान्हा ।। ६ ।।

रसवंतीच्या पहिल्या बाळा मुकुंदराजाला ।
पहिला वहिला अष्टांगांनीं प्रणाम हा त्याला ।।
शहर पुण्याच्या, शिवनेरीच्या, पंढरिच्या देशा ।
पुंडलिकाच्या, शिवरायांच्या, टिळकांच्या देशा ।।
अनंत कोटी ग्रंथ रचुनिया जोडि तुझ्या नामा ।
वाल्मीकीचें शतकोटी यश विष्णुदास नामा ।। ७ ।।

मयूर कविच्या पूर्ण यमकमय महाराष्ट्रदेशा ।
कवि कृष्णाच्या * नियमका हे महाराष्ट्रदेशा ।।
देवी ज्ञानेश्वरी करि जिथें भक्तीचा खेळ ।
तिथेंच गीतारहस्य वसवी बुद्धीचा मेळ ।।
जिथें रंगलीं साधीभोळीं जनाइचीं गाणीं ।
तिथेंच खेळे श्रीपादांची × कलावती वाणी ।। ८ ।।

---

* केशवसुत.

× श्रीपाद कृष्ण कोल्हटकर.

विकावयाला अमोल असली अभंगमय वाणी ।
करी तुझी बाजारपेठ तो देहूचा वाणी ॥
तुला जागवी ऐन पहाटे गवळी गोपाळ ।
धार दुधाची काढित काढित होनाजी बाळ ॥
मर्दानी इष्काचा प्याला तुझा भरायासी ।
उभा ठाकला सगनभाउ हा शाहुनगरवासी ॥ ९ ॥
प्रभाकराची जडण घडण कडकडित म्हणायाला ।
दा हातांचा मुजरा माझा तुळशीरामाला ॥
भीमथडीहुनि चहुं मुलखांवर फिरले धारकरी ।
भीमथडीवर चहूं मुलखांतुनि जमले वारकरी ।
आळंदीच्या ज्ञानोबाची भिंत घेत धांव ।
पुंडलिकाचें नांव चालवी दगडाची नाव ॥
बोलघुमट घुमवीत सारखा नवलाची भाक ।
जेजुरीवर चढी पायरी उभी नऊ लाख ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं० ॥ १० ॥

(अपूर्ण)

* * *

## कृष्णाकांठीं कुंडल

[ कुंडल कृष्णाकांठीं नाहीं, पण घटकाभर त्याला तेथें नेलें आहे. त्या वेळच्या गांवकऱ्यांचा थारेपालट आजच्या कुंडलकरांना दगदग देणार नाहीं अशी आशा आहे. गांवठाणांच्या या हालचालींनें भूगोलाच्या भक्तांची थोडीशी दिशाभूल झाल्यास एक आण्याच्या भूगोलपत्रकानें त्यांचें समाधान होण्यासारखें आहे. ]

## साक्या

– १ –

मनांत माझ्या गुणगुणतें हे रसिका कोणी कांहीं।
"कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं॥"
नव्याभरानें जुन्या जिवाचें गाणें हृदयीं खवळे।
फिरत्या भंवऱ्यावरी मनाच्या फेस भराभर उसळे।
उचंबळुनि येतील बोल ते उधळुनि देतों वरतीं।
पढिकांची चतुराई सारी तेथुन झाली परती॥
साधाभोळा मराठमोळा जोमदार घाटाचा।
रानफुलांचा साज चढविला त्यास त्याच थाटाचा॥
शाहीराच्या रसवंतीला भावभेटीचें लेणें।
एकसुराच्या एकसराला बालेघाटी दाणे।
असेल, रसिका, असलें कांहीं ऐकायाचा हेत।
तर ये; मनिंच्या मळयांत पिकलें हें शाळूचें शेत॥
राखण करि त्या जीवासाठीं डोळयांचा हा माळा।
तुझी बाहुली बसवि त्यांत, मग गोफण मारीं काळा॥
गोफणगुंडा फाडुनि टाकी पडदा काळाचाही।
तुटती धागे तीन शेंकडा उणेपुरे हे पाहीं॥
शिवनेरीचा हिरा चमकतो दख्खनच्या दरबारीं।
रायगडाचें तटबंदीचें कोंदण साजे भारी॥
सह्याद्रीभर चमके त्याचा जित्या जीवाचा जोर।
तेजानें बघ पाजळल्या त्या राई काळ्या भोर॥
त्याच लकाकीमध्यें तळपल्या त्या एका राईंत।
कृष्णाकांठीं कुंडल शिकवी मायलेंकरां प्रीत॥

त्या राईंतील सगळ्या वेली एकच गाणें गाती ।
त्या गाण्यांतिल प्रेमकहाणी वेड लाविते म्हणती ॥
प्रीतीचें तें गाणें होतें; सहज लागल्या नादीं ।
कोणी येतां जातां त्यासी तेंच सांगतें आधीं ॥
झुळझुळत्या वाऱ्यावर त्यांचीं पानें हलतांनाहीं ।
गुणगुणती तें गाणें; त्यांना छंदचि दुसरा नाहीं ॥
वाऱ्याची धुगधुगी हलवि, तरि वेली तें कुजबुजती ।
सोंसाट्याचा सूर लागला तरी तेंच ओरडती ॥
तुझ्यासारख्या रसिकासाठीं त्या तें गाणें रानीं ।
कळ्यांफुलांच्या वेलपत्तिनें लिहिती पानोपानीं ॥
चल, तें वाचुनि पहा एकदां बोलशील मग तूंही
" कृष्णाकाठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं "

## [ त्या दोन प्रेमी जिवांची गांठ पडल्यावर ती त्याला विचारते ]

कुठली दौलत या खांद्यावर मान ठेवुनि निजते ।
कुण्या कुळाचें नांव उजळितें तलवारीचें पातें ॥
कोण गडाचा उभा बुरुज हा बांका बरकंदाज ।
कुणीं चढविला लाजत मुरकत देहावर हा साज ।

## [ तेव्हां तो सांगतो ]

रायगडावर धनी आमुचा, त्याला विकली काया ।
या देहाला, नांव साजणी, रायबागचा राया ॥

* * *

शिवरायाच्या शब्दांसंगें नाचतसें तकदीर ।
दोरीपासुनि सुटलेला हा वाऱ्यावरचा तीर ॥

मैदानावर बेलगाम कीं फिरे मोकळा वारू ।
भर दरियावर भरकटतां धरि फेर फिरंगी तारूं ॥
तलवारीच्या धारेवरतीं हा जीव बारगीर ।
भालफळावर दिलें टांगुनी हातांनीं तकदीर ॥
रायगडावर खडे पसरले शिवरायाच्या पायीं ।
हिरेमाणकें तीं; आम्हांला दुसरी दौलत नाहीं ॥
मैदानाचा सुभा मोकळा, दुनिया मातीमोल ।
जिवंत मुडदा दिला गाडुनी पाताळाहुनि खोल ॥
पळत्या पायावरचा इमला; हिरवा महाल माझा ।
रानगांवचे कांटे किल्ले; त्याच रानचा राजा ॥
एकमांड घोड्यावर जाणें उत्तर हिंदुस्थानीं ।
भीमथडीला भाकर; तोंवर गंगथडीला पाणी ॥
जंगलशाही मिरास सारी, हिरवी दौलत न्यारी ।
रायबागच्या बादशहाची फिरते बेगम प्यारी ॥
होइल असतां बालीउम्मर सुरत ऐसी न्यारी ।
कुंडलवाली बादशहाची वाली बेगम प्यारी ।
जयवंतीशीं लग्न लाविलें जेव्हां शिवरायांनीं ।
तोरणगडिं तें तोरण बांधिति साऱ्या कुंडलकरणी

**[ तिनें बरोबर घेऊन चला असा हट्ट धरला तेव्हां तो म्हणतो व ती त्याला उत्तर देते ]**

तुझ्या कपाळीं सुबक बसावी बघ मोत्यांची जाळी ।
करवंदीची कांटेजाळी, परी आमुच्या भाळीं ॥
रायगडावर उघड्या पडल्या नव्या हिऱ्यांच्या खाणी ।
नटेल त्यांनीं रायबागच्या रायाजीची राणी ॥

टकमक टोंकावरी राहणें चढण उभी ती फार ।
पडेल खालीं बघतां असली नाजुक नवती नार ॥
प्रीतीच्या पंखांनीं येइल टाकुनि मागें गगना ।
रायबागच्या राघूमार्गे ही मान्यांची मैना ॥
थंडीची हुडहुडी निवाली, सरता झाला माघ ।
रायगडावर जागा झाला जंगलांतला वाघ ॥
शहरगांवच्या हिरव्या फिरत्या पोरी चुकल्यावाणी ।
उजाड रानीं पडल्या तर त्या लागतील ना झुरणी ? ॥
चला विचारा त्या वाघाला, कधीं लागली पाठीं ॥
तुझी रानची राणी कुंडलच्या बाजारासाठीं ॥
वाघाची किंकाळी मोंगल घोड्याची कीं टाप ।
ऐकुनि छातीवरच्या चोरां सुटेल ना थरकांप ॥
तरीच कां ही कमरेवरची नागिण इतकी रोड ?
रायबागच्या रणमर्दाची जन्माची जी जोड ॥
शिवनेरीच्या शिवरायांनीं हीच दिली कां शीक ? ।
रायबागचे राघू पढले पोपटपंची ठीक ! ॥
नाहीं कोणी फसावयाचें बोल असे ऐकुनियां ! ।
दुसरी ग्वाही गाते आतां, अलम दख्खनी दुनिया ।

### [ तरी तिचा निश्चय फिरविण्याकरितां तो सुचवितो ]

फसाल पुरत्या; असल्या गांठी जन्माच्या ठरलेल्या ।
बनी बनाई बदलायाची नाहीं कांहीं केल्या ॥
" तेंच सांगतें–जिवा जिवाच्या आतां नजरा जमल्या ।
बनी बनाई बदलायाची नाहीं कांहीं केल्या ॥ "

### [ तिचा निरोप घेऊन स्वारींत गेला असतां ]

फुलांफुलांतुनि रंगत होतीं मधुर सुगंधी स्वप्नें ।

### [ झाडावरच्या मैनेला दूती करून ]

सखे, संवगडी म्हणतिल ज्याला ‘ रानगांवचा राजा ’ ।
खूणगांठ ती, मैनाबाई—तोच शिपाई माझा ॥
तोच दिलाचा दोस्त, जिवाचा माझ्या मालक तोच ।
जें जें माझें त्याची त्याची झाली त्याला पोंच ॥
झाडावरचा राघू झाला जसा तुझा वेमान ।
तसाच राघू रायबागचा, कापी माझी मान ॥
वाऱ्यावरती उडती फिरती असली मैनाराणी ।
तुझ्या गड्यानें परी सोडितां झालिस बापुडवाणी ॥
आणिक जें जें सुचेल तें तें सांग साजणीबाई ।
पढवणूक ही नको, तुलाही कळतें सारें कांहीं ॥
भरकन गेली उडुनी मैना, उरे मराठी मैना ।
हुरहुर करुनी जीव भागला काय सांगणें दैना ! ॥

### [ पुढें तो घायाळ होऊन मेला तेव्हां ]

जीव सांडुनि पडला माझा जीवाचा अलबेला ।
तोंडीं माती पडुनि रंगला जीवनरसरंगेला ॥
शिवबांच्या शिरपेंचासाठीं—बोली ठरली होती ।
तोडुनि मंगलसूत्र जिवाचा देणें माणिकमोतीं ॥
शिवनेरीच्या शिवा, कसा हो केला माझा घात ।
हातावरचा राघू नेला उडवुनि हातोहात ॥
घारीनें झडपिला हातिचा बघतां बघतां हार ।
पुढती केला हात जरा तों विरून गेली गार ॥
चुना लाविला पानाला तो अजुनि वाळला नाहीं ।
विडा घेतल्यावांचुनि केली कां हो इतकी घाई ? ॥

असें जसेंच्या तसेंच वठलें जातें पाउल तुमचें ।
पाय काढिला इथून पुरता; पुन्हां न परतायाचें ! ॥
अखंड भरला नव रंगांनीं हा इष्काचा प्याला ।
दुनिया झुलती है ये हरदम; नहीं झुकानेवाला ! ॥

[ संदर्भ न लागणाऱ्या ओळी ]

जशी रानच्या पत्रीसाठीं रुसे मंगळागौर ।
रुसा साजणी, फुलते गुलशन दिलेचमनकी और ॥
लपंडाव हा सरला, राया, राज्य तुम्हांवर आलें ।
हंसेल बाई या बोला ही साधीभोळी राई ।
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं " ॥

[ त्या शोकानें तिचा अंत झाल्यावर ]

ज्योत ज्योतिला मिळुनी गेली, माती मातीलाही ।
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं " ॥

( अपूर्ण )

* * *

# काव्याची व्याख्या

शब्दांमध्यें, अर्थामध्यें, प्रासांमध्यें काव्य नसे ।
नानारंगीं वस्तूंतहि नच सौंदर्याचा लेश वसे ॥
सिंहाचें बळ अफाट म्हणजे शौर्याचें तें स्थानच कां ? ।
गोड सुरावट वेळू करिती गाणें त्याला म्हणूं नका ॥
उंची इमला शिल्प दाखविल, शोभा म्हणजे काव्य नव्हे ।
काव्य कराया जित्या जिवाचें जातिवंत करणेंच हवें ! ॥

* * *

काव्याची रचना नसे कठिण ही, अर्थास लागे कवि ।
आलीं वक्र जरी प्रकाशकिरणें तेजास दावी रवि ॥
अर्थावांचुनि बोल सुंदर जरी शोभा न त्यातें असे ।
शृंगारूनि उगाच प्रेत, परि ते जीवंत कां होतसे ॥ १ ॥

* * *

# विनोदी कविता

## काय करावें ?

[ आचरटपणापलीकडे या ओव्यांची फारशी किंमत नाहीं. ]

उन्हाळ्यासाठीं पाणी न ठेवून । नदी वेगें जातां पळून ।
भक्कम दगडांचें धरण बांधून । तिला अडवितां येतसे ॥ १ ॥

अगदीं आपला नेम धरून । तोफ सुटतां धडधडून ।
हळूच बाजूला सरून । मारा चुकवितां येतसे ॥ २ ॥

अंतराळीं कडकडून । वीज घरावरि पडतां तुटून ।
उंच खांबांत बांधून । पाताळीं सोडितां येतसे ॥ ३ ॥

सावकारांनीं वैर धरून । जप्ती आणितां दावा करून ।
मागील बाकी देऊन । तिला उठवितां येतसे ॥ ४ ॥

अगदीं नीट रोख धरून । म्हैस मार्गीं येतां धांवून ।
एकदम छत्री उघडून । तिला पळवितां येतसे ॥ ५ ॥

जुन्यानव्याची चोरी करून । भिकार कवि येतां कविता घेऊन
कशी तरी एकदां वाचून । त्रास चुकवितां येतसे ॥ ६ ॥

सर्वांस उपाय येत दिसून । परि एका गोष्टीस आहे न्यून ।
तोंडाळ बायको कडकडून—। येतां, काय करावें ॥ ७ ॥

* * *

## चिन्तातुर जंतु !

'निजलें जग; कां आतां इतक्या तारा खिळल्या गगनाला ।
काय म्हणावें त्या देवाला—" "वर जाउनि म्हण जा त्याला." ॥१॥

"तेज रवीचें फुकट सांडतें उजाड माळावर उघड्या ।
उधळणूक ती बघवत नाहीं—" "डोळे फोडुनि घेच गड्या." ॥ २ ॥

"हिरवीं पानें उगाच केलीं झाडांवर इतकीं कां हीं ।
मातींत त्यांचें काय होतसे—?—" "मातिस मिळुनि जा पाहीं !"॥ ३ ॥

"पुराबरोबर फुकटावारी पाणी हें वाहुनि जात ।
काय करावें जीव तळमळे—" "उडी टाक त्या पुरांत." ॥ ४ ॥

"ही जीवांची इतकी गरदी जग आहे का रास्त ।
भरती मूर्खांचीच होत ना" ? "एक तूंचि होसी जास्त." ॥ ५ ॥

देवा, तो विश्वसंसार राहूं द्या राहिला तरी ।
या चिन्तातुर जन्तूंना एकदां मुक्ति द्या परी ॥ ६ ॥

पुणें, ९-११-१९१७

* * *

## हुकमेहुकूम

करमत नव्हतें म्हणुनि एकदां असाच गेलों रानीं ॥
वसंत का—परि ऋतु दुसरा कधि कुणीं पाहिला कवनीं !।

समोर होता झाडावरतीं एक चिमुकला पक्षी ।
बोलुनि चालुनि कवि पडलों मी–सहजाचि त्याला लक्षी ॥
वसंत ऋतु तो; रम्य वनहि तें; पक्षि आणि कविराय ।
तुम्हीच सांगा रसिका आतां हवें आणखी काय ? ॥
सत्वर कविच्या रसिकपणानें सांगितलें त्या गाया ।
नवल वाटतें सांगाया परि–कीं तें गेलें वायां ॥
“ वृक्षावरच्या माझ्या मित्रा, कांहीं गाणें नाच ।
गमतीखातर आणि जरासा इकडे तिकडे नाच ॥
बंधु तुझा मी —माझ्यासाठीं गड्या लाग तूं गाया ।
हें बघ देतों कण धान्याचे कांहीं तुजला खाया ॥
स्तुति गाण्याची तुझ्या बहुपरी करिन चारचौघांत ।
चित्रहि आणिन तुझें कशाच्या तरी खास अंकांत ॥
गाण्याची या तुझ्या शिफारस करूं अशी भरपूर ।
कीं, शाळाखातेंही वेड्या करील तें मंजूर ” ॥
अशा प्रकारें फार विनविलें जीव तोडुनि साच ।
भिकारडें तें कांहीं केल्या परंतु ऐकेनाच ॥
गा म्हटल्या जो गात नसे त्या सृष्टीचा कवि म्हणती ।
मस्तक फिरलें हातपायही रागानें थरथरती ॥
“ एक मारितो दगड असा कीं पडेल वासुनि चोंच । ”
म्हणुनि वांकलों तसाच खालीं आवेशानें तोंच– ॥
लगबग दिसले स्नेही माझे–संपादक त्या–ह्याचे ॥
म्हणूं लागले, “ भले ! तुम्हांला कुठें कुठें पाह्याचें ॥
या अंकाचा चालू तक्ता ( फर्मा ) होत नाहिं भरपूर ।
कामाचा खोळंबा झाला, द्या कांहीं मजकूर ’

वसंत अंकीं वसंतवर्णनपर कविता चालेल ।
परंतु झटदिशिं करा; नातरी काम उगीच लांबेल ॥
सरासरी द्या खरडुनी ओळी अठरापासुनि वीस " ।
ऐकिलें न हें तो कवनाची झाली स्फूर्ति कवीस ॥
झाडावरचा पिसाट कवि तो तसाच टाकुनि रानीं ।
चला रसिकहो लांबी रुंदी नीट ठेवुनीं ध्यानीं ॥
वसंतकाळीं त्या वर्णाया वनांतुनी माघारी ।
'गोविंदाग्रज' कवीश्वराची घरीं परतली स्वारी ॥

पुणें, १२-१०-१९१२

* * *

# विहिणींचा कलकलाट

( ओवी )

वीरांच्या गर्जना थोर । घुबडांचा आवाज घोर
घायाळांचें रडणें अघोर । हेंही त्यांत घातलें ॥ १ ॥
रणवाद्यांचा दणदणाट । हत्यारांचा खणखणाट ।
विजयघंटांचा घणघणाट । एका जागीं मिळविलें ॥ २ ॥
दारुकामाचा फडफडाट । घोड्यांचा खडखडाट ।
तोफांचा धडधडाट । यांची त्यांत भर केली ॥ ३ ॥
प्रळयमेघांचा गडगडाट । आणि विजांचा कडकडाट ।
भूमिभंगाचा तडतडाट । भरतीस हें घातलें ॥ ४ ॥
सागराचें खवळणें । दारू पिणाराचें बरळणें ।
आणि मुलांचें ओरडणें । शाळा सुटतां वेळचें ॥ ५ ॥
नाना वाजंत्री हीं सारीं । एक केली यत्नें तरी ।
त्या कलकलाटाची न ये सरी । लग्नांत विहिणी करितात जो ॥६॥

* * *

# तात्विक कविता

## एखाद्याचें नशीब

कांहीं गोड फुलें सदा विहरती स्वर्गांगनांच्या शिरीं,
कांहीं ठेवितसे कुणी रसिकही स्वच्छंद हृन्मंदिरीं;
कांहीं जाउनि बैसती प्रभुपदीं पापापदा वारि तें;
एखादें फुटकें नशीब–म्हणुनि प्रेतास शृंगारितें !

कोणी पर्वत आपुल्या शिरिं धरी हैमप्रभा शीतला,
कोणाच्या उदरामधून निघती मोठ्या नद्या निर्मला;
कोणाला वनदेवता वरितसे मोदांत जी नाहते,
एखाद्यामधुनीं परंतु जळती ज्वालानदी वाहते !

झाडें जोडुनि पत्रयुग्म फुटलें मेघांप्रती याचती,
स्वच्छंदें जलबिंदु तोंच सगळ्या पानांवरी नाचती;
सारीं पालवती, फुलें विहरती, शोभा वरी लोळते,
एखाद्यावर मात्र वीज पडुनी त्या जाळते पोळते !

चाले खेळ असा जगांत; बहुधा सौख्यांत सारे जरि,
एखादा पडतो तसाच चुकुनी दुःखार्णवीं यापरी;
पाही कोण अशा हताशहृदया ? जो तो असे आपला,
देवा ! तूं तरि टाकिं अश्रु वरुनी, त्यासाठीं तो तापला !

* * *

# अनामिकाचे अभंग

[ ज्या प्रदेशांत पाऊल टाकावयाचें आहे तेथील रहिवासी साधूसंतांना तुमचा आमचा स्पर्श अनामिकापेक्षांहि अमंगळ आहे; शिवाय, मराठी-चिये नगरीं या पंढरीच्या पाहुण्यांची श्रीचंद्रभागातटीं जी प्रेमळ पंगत झाली, तिच्या उष्टयाखरकट्यासाठींच हात पसरण्याचा जिथें संकल्प आहे, तिथें नांवाचा अभिमान अनाठायीं आहे. मराठी रसवंतीच्या पवित्र अभंगस्वरूपाला माझ्या अनामिक वृत्तीच्या पामर वाणींनें स्पर्शदूषित करण्याच्या या अतिप्रसंगाची जनस्वरूप जनार्दनाकडून मला क्षमा होईल अशी आशा आहे.

## मंगलाचरण

नमो पांडुरंगा नमस्ते श्रीरंगा । रुक्मिणीच्या रंगा नमो नमः ॥ १ ॥
सर्वां मंडळांचा एकरूप निधि । तूंच देवा विधि-हरिहर ॥ २ ॥
ऐकिल्या देवांच्या तेहतीस कोटी । तीं रूपें गोमटीं देवा तुझीं ॥ ३ ॥
निर्गुणाचें ब्रह्म सगुणाची मूर्त । दोहीं ठायीं कीर्त एका तुझी ॥ ४ ॥
म्हणे '++' अगा पंढरीच्या देवा । अनामिक सेवा घ्यावी आतां ॥५॥

## १

कवित्वाचा येथें वाहिला मीपणा । लक्ष्मीनारायण तुझे पायीं ॥ १ ॥
गणामात्रांचा तो नको ताळेबंद । नको वृत्त छंद नाम गाया ॥ २ ॥
विना कानामात्रा आणिक वेलांटी । लेखन–कामाठी मांडिली हे ॥३॥
साहित्याची कळा झाली तिऱ्हाईत । शुद्धाशुद्धातीत नाम तुझें ॥ ४ ॥
म्हणे '+ +' जें जें मनीं मुखीं आलें । तें तें येथें झालें ब्रह्मार्पण ॥ ५ ॥

## २

क्षणमात्र थांबा असंगाच्या संगा । अहो पांडुरंगा कृपावंता ॥ १ ॥
मनाचा मुहूर्त साधुनि हा आज । सोडुनिया लाज बोलतों मीं ॥२॥

माझ्यावरी मीच मांडीन फिर्याद । तुझ्यापायीं दाद मागावया ॥३ ॥
नका देवराया धरूं भीडभाड । कराल तो निवाडा मान्य आहे ॥४॥
म्हणे '++' देवा रुखमाईच्यां कांता । परी दूर आतां नका राहूं ॥५॥

३

जीवेंभावें देवा आम्ही अमंगळ । जातीचे चांडाळ, थोर नांवें ॥ १ ॥
पांडुरंगा आम्ही युगांचे दुर्जन । क्षणाचे सज्जन पश्चात्तापें ॥ २ ॥
व्रत एकादशी मात्र हें देहाशीं । नित्य मनापाशीं दिवाळीच ॥ ३ ॥
नांवाचेच साव आम्ही थोर । मनाचे हे चोर सर्वकाळ ॥ ४ ॥
तुझे पायीं आतां चोरी नसे कांहीं । म्हणे '++' नाहीं भयभीति ॥५॥

४

मागायची आहे मेख । तुजपाशीं हीच एक ॥ १ ॥
सुखदुःखें हीं केवळ । जन्मा आलियाचें फळ ॥ २ ॥
इंद्राचंद्रा कर्मरेखा । तेथें माझी कोण लेखा ॥ ३ ॥
हेंचि एक द्यावें दान । घडो कांहीं तुझें गान ॥ ४ ॥
म्हणे '++' हीन दीन । मृगजळींचा हा मीन ॥ ५ ॥

५

नाहीं भक्तिभाव नीट । तरी हांक मोकली धीट ॥ १ ॥
नाहीं मुक्तीचा हव्यास । नसे नामाचाही ध्यास ॥ २ ॥
नेमधर्म कोणा ठावा । एकरूप उजवा डावा ॥ ३ ॥
तुम्हीं यावें आम्हांसाठीं । कवित्वही न ऐसें गांठी ॥ ४ ॥
म्हणे '++' हांके साच । अधिकार पाप हाच ॥ ५॥

६

आलां गोपगोपींसाठीं । देवा तुम्हीं यमुनाकांठीं ॥ १ ॥
पुंडलीका द्याया भेटी । देव आले वाळवंटीं ॥ २ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८७०

नामयाच्या कारणीं । राउळाचीहि फिरवणी ॥ ३ ॥
दामाजीच्या संकष्टीं । विठू धेडे होई कष्टी ॥ ४ ॥
म्हणे '++' मायबापा । भीशी काय माझ्या पापा ॥ ५ ॥

७

धन्य धन्य माझें पाप । तुज आणिल आपोआप ॥ १ ॥
माझ्या पातकांची रास देवा । पाडीवर इरेस ॥ २ ॥
"आजवरी थोरथोर । पायीं नेलें पतित घोर ॥ ३ ॥
परि याचें पाप फार । पाहूं होतो का उद्धार" ॥ ४ ॥
परि '××' ऐशा भरीं । देवा याल माझ्या घरीं ॥ ५ ॥

८

नेघे देवा तुझ्या नांवा । तुझा माझा उभा दावा ॥ १ ॥
नामें उद्धरिले सारे । मीच एक राहिन बा रे ॥ २ ॥
तुझ्या नांवा गालबोट । सुखें खावें दांतओठ ॥ ३ ॥
पाहूं बोलाविल्यावीण । हरी का तें माझा शीण ॥ ४ ॥
देवा तुझी घ्याया लाज । '××' ठाकलासे आज ॥ ५ ।

९

काय महिमा नामांकित । आज दाखवा प्रचीत ॥ १ ॥
पूर्वी नांव झालें फार । नको त्याचा बडिवार ॥ २ ॥
दावि मज प्रत्यय कांहीं । नको संतांची ती ग्वाही ॥ ३ ॥
देणें घेणें हातोहात । उधारीची नाहीं बात ॥ ४ ॥
धन्य '××' भाग्यवंत । देवा तुझा पाही अंत ॥ ५ ॥

१०

काळयवनाच्या भेणें । दडीं पाण्यापोटीं देणें ॥ १ ॥
धाकें आणि दैत्याच्याच । मोहिनीचा केला नाच ॥ २ ॥

काच बळीचा अगोचर । देव झाला मूठभर ॥ ३ ॥
परि येतां पापें माझीं । कुठें दडाल देवाजी ॥ ४ ॥
म्हणे '× ×' धीटपाठ । येथें अस्सलाशीं गांठ ॥ ५ ॥

* * *

## विरामचिन्हें

जेव्हां जीवनलेखनास जगतीं प्रारंभ मीं मांडिला,
जो जों दृष्टिंत ये पदार्थ सहजीं वाटे हवासा मला !
बाल्याची पहिली अशी बदलली दृष्टी सदा बागडे
तेव्हां 'स्वल्पविराम' मात्र दिसती स्वच्छंद चोंहींकडे !
आहे काय जगांत ? काय तिकडे ? हें कोण ? कोठें असे ?
सांगा ईश्वर कोण ? त्यापलिकडे तें काय ? केव्हां ? कसें ?
जें तें पाहुनि यापरी भकतसें; दृक् संशयें टाकित,
सारा जीवनलेख मी करितसे तैं 'प्रश्नचिन्हां'कित !
अर्धांगी पुढतीं करी वश मना, शृंगारदेवी नटे,
अर्धे जीवन सार्थ होइल इथें साक्षा मनाची पटे;
प्रेमानें मग एकजीव बनतां भूमीवरी स्वर्ग ये !
केला 'अर्धविराम' तेथ; गमलें येथून हालूं नये !
झाली व्यापक दृष्टि; चित्त फिरलें साश्चर्य विश्वांतरीं
दिक्कालादि अनंतरूप बघतां मी होत वेड्यापरी !
सूक्ष्मस्थूलहि सारखी भ्रमविती; लागे मुळीं अंत न,
त्या काळीं मग जाहलें सहजची 'उद्गार'वाची मन !
आशा, प्रेम, नवीन वैभव, तशी कीर्तिप्रभा, सद्यश,
हीं एकेक समर्थ आज नसती चित्ता कराया वश !

सर्वांचा परमोच्च संगम चिरं जेथें असे जाहला,
देवा ! ' पूर्णविराम ' त्या तव पदीं दे शीघ्र आतां मला !

* * *

## फूल ना फुलाची पाकळी

शहाजहानाआधीं मेली ख्यालिखुशाली ती त्याची ।
खडा तेवढा ताजमहालच भूषा जी या जगताची ॥
चुकल्या तरुणा ! वेश्याक्रीडन आज तुझें स्मरणांत नसे ।
कालिदासकृत शाकुंतल परि सरस्वतीच्या कंठि असे ॥
खुनी खड्यांनीं भरले रांजण वाल्ह्याचे फुटले सारे ।
उरलें रामायण तें नटवीं श्रीरामा निज आधारें ॥
गोकुळांतल्या चोरांचा नच गोपींना आतां त्रास ।
श्रीकृष्णाची गीता उरली द्याया मरत्या उल्हास ॥
गडगडणें, काळोख, विजा हीं गेलीं वळवाच्या मागें ।
अन्नब्रह्मचि साक्ष तयाची द्याया हें राही जागें ॥
कांटे सुकले फांदीवरतीं—धन त्यांची झाली राना ।
गुलाब, देवा, तुम्हां वाहिला, गोड करुनि तो कां घ्या ना ॥
दूषण वगळुनि भूषणमात्रें प्रभुपूजन करि काळ असें ।
तुम्ही आम्ही कष्टी होणें हा कुठला मग न्याय असे ॥

अनुष्टुभ्

' गोविंदाग्रज ' अर्पी ही स्वभावें चरणांवरी ।
रसिका, घ्या फूल नाहीं फुलाची पाकळी तरी ।

पुणें, ता. २४-११-१९१७.

* * *

# जीवितास—

[ ईश्वरकल्प-सौंदर्यांचा परिचय या लोकीं नेत्रप्रत्यक्षापुरताच आहे असें नेहमीं प्रत्ययास येतें. प्रतीतीनें त्यांना खेद होत नाहीं ते एका अर्थी धन्यच ! ]

—आणि, जीविता, लाभ हाच कां तुझ्या संगतीं राहुनिया ?
असेंच जाणें असे सदा का कालौघावर वाहुनिया ? ।
सौंदर्याच्या दर्शनमात्रें जागृत होत्या जीवांत ।
विकल चेतना नाचे नुसती स्वस्थानीं व्हाया श्रांत ॥
जनसंमर्दीं अलभ्य शोभा पाहुनि, ठसवुनि मनिं घेणें ।
एकांतीं तच्चिंतन करणें; दुःखावेगीं विस्मरणें ।
दिव्यदर्शनें हृदयपटावर नवरंगांनीं रेखावीं ।
आणि आंतल्या अश्रूंनीं तीं सवेंच धुवुनी काढावीं ॥
अवश्य जीवश्वसनें निर्दयनिश्वासांनीं योजावी ।
हृदयजलानें भरतां नयनें गेली घटिका मोजावी ॥
आद्यंतींचे क्षण सोडुनिया अशेष जीवनिं या देख ।
परिस्थितीचा रंग काढितां क्षणयुग्मचि उरतें एक ॥
पहिला क्षण तो कीं ज्यावरतीं स्वप्रकाश आशा धाडी ।
दुज्या क्षणावरि तीव्र निराशा छाया प्रेतमया पाडी ॥
आयुष्याच्या क्षणाक्षणाला हिशोब केवळ हा आहे ।
परंपरेला त्याच्या दिधल नाम मनोहर जीवन हें ॥
रंग बदलुनी खेळत राही अशा क्षणांची ही जोडी ।
स्थलकालांच्या भिन्नत्वानें नित्य नवी दिसती कोडीं ॥
क्षणाक्षणाला जननमरण हे प्राणिमात्र भोगीत राही ।
चौऱ्यांशीचा फेरा याविण आणिक दुसरा तो नाहीं ।

फसव्या पाण्यावरीं पोहुनी, दम कोंडुनि मरतां मरतां ।
गोविंदाग्रज म्हणे, जीविता ! लाभ तुझा नच यापरता ॥

* * *

# मुरली

[ प्रीति, भक्ति आणि मुक्ति या भावयोगाच्या तीन पायऱ्या आहेत. प्रीतीच्या परमोच्च स्थितीवरच भक्तीचें पहिलें पाऊल उमटून भक्तीच्या मोकळ्या भरारींत भक्त-भगवंतांचें पूर्णैक्य होत असतें, हें दाखविण्यासाठीं स्त्री-हृदयाचें प्रेमळ रहस्य ओळखून भागवत कवींनीं ' राधा गौळण ' कृष्णपरमात्म्या-समोर उभी केलेली आहे. जगाच्या भूतकाळांत भोळया भावड्या भक्तिप्रीतिच्या संयोगाचें इतकें ठळक चित्र याव्यतिरिक्त इतरत्र सांपडणार नाहीं म्हणून या गीतांत भक्तजीवात्मा राधारूपानें दाखवून प्रीतिभक्तीच्या बदलत्या सीमा-रेषेवर त्याची स्थापना केली आहे. मनुष्याच्या आयुष्यांत असा एक काळ एकदां तरी येतोच कीं ज्या वेळीं ईश्वराचें अस्तित्व भावनापूर्ण हृदयाला पटतें आणि तेव्हां मात्र बुद्धिप्रधान मस्तकाचें समाधान करण्यासाठीं तळमळणारा जीवात्मा .ईश्वरी साक्षात्काराची–प्रत्युत्तराची याचना करीत असतो. हें दैवी प्रत्युत्तर त्या योग्य वेळीं मिळालें नाहीं म्हणजे मात्र मनुष्य पुन्हां भोंवऱ्यांत गुरफटतो. या गाण्यांत अशा ईश्वरी उत्तराला ' मुरलीध्वनि ' कल्पून त्यासाठीं झुरणाऱ्या राधेच्या पांच चढत्या स्थिती ( कडवी १४।१८।२१।३२।३७ ) दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. —' गोविंदाग्रज ' ]

ही एक आस मनिं उरलि ॥
कन्हय्या ! बजाव बजाव मुरली ! ॥ ध्रु० ॥

जरि फुटले दोन्ही कान । नच राही भूक तहान
तिळभरही नुरलें भान ॥
बध वृत्ति वृत्तिमधिं मुरलि । कन्हय्या ! बजाव० ॥ १ ॥

कां गाणें मजला व्हावें । चित्तासहि नाहीं ठावें ॥
दृष्टिला केविं दिसावें ॥
मम आस नसे परि पुरलि। कन्हय्या ! बजाव० ॥२॥

मी अगदीं भोळी राधा। तूं माधवजी ! नच साधा ॥
मोहिनी करी सुखबाधा ॥
तुज दासी विनवुनि झुरली । कन्हय्या ! बजाव० ॥३॥

चांदणें चहुंकडे खुललें। फत्तरही सारे फुललें ॥
आनंदें विश्वहि झुलले ॥
स्फूर्तीच त्यांत तव शिरलि । कन्हय्या ! बजाव० ॥४॥

तीनेंच शब्द मम निघती । जग फिरुनि, फिरुनि मनिं रिघती ॥
मज आतां दुसरी न गति ॥
जगतीच सारि जणुं जिरलि । कन्हय्या ! बजाव० ॥५॥

अणुरेणुहि देहीं स्वैर । भिन्नता विसरली वैर ॥
अब नंदलाल ! कर खैर ॥
प्रेमाची दुनिया उरलि। कन्हय्या ! बजाव० ॥६॥

बुद्धीचा तुटला धीर । आशामय होय शरीर ॥
जलिं बुडे जलधिचें तीर ॥
बघ, बघतां दृष्टिहि विरलि । कन्हय्या ! बजाव० ॥७॥

कथुं काय काय मज वाटे । आनंद मात्र मनिं दाटे ॥
तरुशिरीं मूळ उफराटें ॥
शून्यांत परावें भरलि। कन्हय्या ! बजाव० ॥७॥

जन्माचें झालें चीज । कायमची मेली नीज ।
विश्वाचें गवसें बीज ॥
चिद्वृत्ति त्यांत अवतरलि । कन्हय्या ! बजाव० ॥९॥

मायेची मेली बिजली । परि खऱ्या जलीं ती विझली ।।
तीव्रता तियेची थिजली ।।
सुकलेलीं विश्वें भिजलिं । कन्हया ! बजाव० ।।१०।।

कोसळति सरींवर सरी । लहरींवर उठती लहरी ।।
अश्रूंची गरदी भारी ।।
अवकाश तुडुंब सगळिं । कन्हय्या ! बजाव० ।।११।।

पुष्पांविण येई वास । वाऱ्याविण चाले श्वास ! ।।
हर्षाविण आतां हास ।।
मरणाविण सुटका झालि । कन्हय्या ! बजाव० ।।१२।।

ब्रह्मगोल त्वन्मय झाला । चहुंकडेच मुरलीवाला ।।
त्वद्रूप गोपिकाबाला ।।
मी मला शून्य या कालिं । कन्हय्या ! बजाव० ।।१३।।

सांवळ्या यशोदाबाळा ! । बंधाला पडला आळा ।।
स्वैराचा वाढे चाळा ।।
बावरी राधिका बनालि । कन्हय्या ! बजाव० ।।१४।।

किति करूं कन्हय्या ! धांवा । गा, नाच, वाजवी पांवा ।।
त्यांतच हा जीव विरावा ।।
यावांचुनि इच्छा नुरलि । कन्हय्या ! बजाव० ।।१५।।

एकेक ऐकुनी सूर । दुःखाचा हो जरि चूर ।।
सारखी तरी हुरहुर ।।
न कळे ही लागे कसलि । कन्हय्या ! बजाव० ।।१६।।

तूं मनांतला चंडोल । मग माझ्या मनिंचे बोल ।।
जरि हृदयीं लपले खोल ।।
तरि खोल हृदय या कालिं । कन्हय्या ! बजाव० ।।१७।।

बोल, बोल तव बिनमोल। जीवाचें देइन मोल ॥
परि बोल एकदां बोल ॥
नातरि राधिका मुकलि। कन्हय्या! बजाव० ॥१८॥

फिर विश्वाचा हा गोल। सांभाळुनि माझा तोल ॥
प्रेमाला धरुनी सोल ॥
बघ मागुनि राधा आलि। कन्हय्या! बजाव० ॥१९॥

मुरलीची प्यालें भांग। घडिघडी थरारें अंग ॥
या लहरी उठति कां सांग ॥
आनंदवृत्ति पाझरलि। कन्हय्या! बजाव० ॥२०॥

उलगडति पीळ हृदयाचे। जणुं सुटति बंध देहाचे ॥
कीं जीव देहभर नाचे ॥
कुणिकडे राधिका भकलि। कन्हय्या! बजाव० ॥२१॥

ही लहर अशा देहाची। हालचाल आनंदाची ॥
चेतनाच कीं जीवाची ॥
तुज भेटाया जणुं आलि। कन्हय्या! बजाव० ॥२२॥

तिजमुळें होउनी दंग। वाऱ्यांत तरंगे अंग ॥
अणुअणुही होति दुभंग ॥
त्यांमाजि नादवी मुरलि। कन्हय्या! बजाव० ॥२३॥

हृदयाचे ठोके पडती। अवकाश त्यांत जे उरती ॥
परि मुरलिरवाची भरती ॥
मग एकच धडकी सगळि। कन्हय्या! बजाव० ॥२४॥

मुरलीचा मंजुळ नाद। हृदयांत खुलवि पडसाद ॥
मम जीवाची ही साद ॥
तुज हांका मारित सुटलि। कन्हय्या। बजाव० ॥२५॥

सारखा मुरलि वाजीव । अणुअणुसि देहिं दे जीव ॥
त्यांमाजि नाद गाजीव ॥
हृदयाचे पडदे उकलि । कन्हय्या ! बजाव० ॥ २६ ॥

जीवाच्या कमळा भुलवी । निजगुंजारविं त्या डुलवी ॥
पाकळी पाकळी खुलवी ॥
झुलवी त्या पाडुनि भुरळि । कन्हय्या ! बजाव० ॥ २७ ॥
कृष्णजि ! त्यांत तूं भृंग । त्यांतच रे होई गुंग ॥
गुंजारव करि उत्तुंग ॥
ही मोहरात्र ओसरालि । कन्हय्या ! बजाव० ॥ २८ ॥

चांदणें खुले दिलरंगीं । हो एक नादरससंगीं ॥
पोहत मी स्वैर तरंगीं ॥
बघ शुद्धबुद्ध मम हरलि । कन्हय्या ! बजाव० ॥ २९ ॥
या रसीं देहकण न्हाले । जो तो निजनादीं डोले ॥
क्षणभरांत सारे फुलले ॥
बघ फुलें तयांचीं झालिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३० ॥

करुनि त्या फुलांचा झेला : जीवाचा छेलछबेला ॥
नटवीन कधीं अलबेला ॥
झेला मज, आलें जवळि । कन्हय्या ! बजाव० ॥ ३१ ॥
शृंगाररसानें नटली । तुज राधा रमवूं झटली ॥
जन्मांची ओळख पटली ॥
कृष्णांत राधिका रमलि । कन्हय्या ! बजाव० ॥ ३२ ॥
वांकड्या अधरिं हा पावा । वांकडाच डोळा डावा ॥
किति वेळ असाच पहावा ।
अब खेल करो वनमालि ! ॥ कन्हय्या० ॥ ३३ ॥

श्वासें मज हृदयीं भरवीं । नादें कीं ओढुनि नेई ॥
चुंबनेंच कीं मज वनवीं ॥
तव ओंठांवरली लालि । कन्हय्या ! वजाव० ॥ ३४ ॥

दृढ आलिंगन दे अथवा । अवकाश न त्यांत असावा ॥
एकरूप जीवाभावा ॥
बघ आतां घट हा भरली । बोलाची बोली सरली ॥
तव देहिं देह मम जिरवि । कन्हय्या ! वजाव० ॥३५॥

जीवाची भाषा हरली ॥
ठायींच वृत्तिही हरलि । कन्हय्या ! वजाव० ॥३६॥

जीवाचा पंछी प्यारा । मज आतां दिससी न्यारा ॥
मुरलीचा पिउनी वारा ॥
चहुंकडेच राधा झुकलि । कन्हय्या ! वजाव ॥३७॥
उरलें न शीत वा उष्ण । कांहीं न शुभ्र वा कृष्ण ॥
एकरूप राधाकृष्ण ॥
जयनाद गात ही मुरलि । कन्हय्या ! वजाव० ॥३८॥
चहुंकडेच आतां शांत । विश्व शांत, आत्मा शांत ॥
कृष्ण शांत, राधा शांत ॥
मुरलींत शांतता भरलि । कन्हय्या ! वजाव० ॥३९॥
भोगुनी तापमय उष्णा । मुरलिची लागतां तृष्णा ॥
जग गाइल राधाकृष्णा ॥
ही साक्ष मनोमन मुरलि । कन्हय्या ! वजाव० ॥४०॥
ही अखंड मुरली वाजे । सर्वांच्या हृदयीं गाजे ॥
मग कोण वदावा लाजे ॥
कीं धन्य धन्य ही मुरलि । कन्हय्या ! वजाव० ॥४१॥

त्या नादरसांचे प्याले । मनिं 'गोविंदाग्रज' प्याले ॥
शाहीर मुरलिचे बनले ॥
मग गानिं वाजवित मुरलि । कन्हय्या ! बजाव० ॥ ४२ ॥

* * *

## फुटकी तपेली

[ आत्मज्ञान मायेंतून गळूं लागलें म्हणजे आत्मा अगतिक होतो. ]

नको तपेली फुटकी असली !

जीव बोलतो पाणी पाणी
चिरकालाची तहान लागुनि;
अशी तपेली मजला देउनि, थट्टा करितां तथें कसली !

प्रवास करणें फार दूरवर;

आद्याच्या पर्यंतापासुनि
अंताच्या आरंभामधुनी—
एक अनंत माप घेउनि, कैक अनंतें जाणें भरभर !

विश्व कशाचे घेउनि बसला ?—

विश्व मला जें दिसतें त्यांतील—
विश्वें तुमचीं अणुसम होतिल,

प्रवास माझा असा भयंकर !

निजक्षणीं तें तुमच्या जिरविल, काळांचा बाजारच सगळा !
या विश्वाच्या मागुनि जाणें,
मागुनि सुटुनी धांवणें,
अथवा सर्वांठायिं पसरणें, आद्यंतांचें कापुनि अंतर !

कडक कायदा धांवायाचा !

पाउल एखादें जरि चुकणें,
पहिल्यापासुनि पुन्हां धांवणें !
आपुल्याच वा भंवतीं फिरणें ! मार्ग कुठुनि मग सरावयाचा

आधीं असते पुष्कळ सोबत,

कितीक 'मी, मी' मजला दिसती,
पुढें चालतां भरभर मरती;
मरुनी माझ्या ठायीं जगती, माझीच मला उरते संगत !

माझें 'मी' पण फारच मोठें !

दुज्या रहाया जागा नाहीं,
एकलकोंडा म्हणुनी राही,
खोटें 'मी' अंगिच पाहीं, राहिल सोबत मज तीं कोठें ?

मज जाणाया मीच विचक्षण !

नसते परके आधिं जाणतों,
असल्या मलाच न परी बघतों;
मज ओळखतां इतर विसरतों; माझें सर्वच फार विलक्षण !

तऱ्हाच माझी विचित्र असली !

असला मी, तो प्रवास तसला,
कडक कायदा त्याचा असला,
तशा प्रवासीं असल्या मजला, अशी तपेली देतां कसली ?

अनंततेची तहान माझी,

मिळतां पाणी वाढे उलटी,
अधिकचि पाणी अधिकाचि मोठी,
जलब्रह्म या तिजसाठीं तरीच होइल मग ती राजी !

भांडीं असलीं कां मज देतां ?

भरतांना जीं होतिं रिकामी,
भरुनि ठेविली तरि कुचकामी,
पडतिल कोणाच्या तीं कामीं ? कधीं परत बोला हो घेतां ?

बोगविण्याचें उगाच ओझें !

करीं प्रवासामाजी खोटी,
फुटकि तपेली तुमची खोटी,
मृजगळ नसतें दावी खोटी, कधीं तिच्यांतुन नच गळलें जें

मायेची ही खरी तपेली;

मृगजळ प्याया आंत उतरतों
अफाट तरि मी त्यांतच बुडतों,
नसत्यामाजीं असतां जिरतों, नको मला ही असली मेली ?

ब्रह्माडाची करा तपेली

माझी ओळख पाणि तिच्यांतिल,
कैक अनंतें तयांत जिरतिल,
माझ्यावांचुनि सारे विरतिल, शिरें तपेलीं ही अशा जलीं !

ब्रह्मांडाची खरी तपेली;

करा रिकामी तरिही भरली,
भरुनी भरणें भरवुनि उरली,
जिरतिल विश्वें कितीक असलीं, कांठवरी जरि आधीं भरली !

माझी ओळख विचित्र पाणी;

जुनी ओळख मग नवीस आणी,
पाण्या वी अव्याहत पाणी,
पाण्यांतहि मम खेळे पाणी, हाय ! कसें हें कोणि न जाणी !

ब्रह्मांडाची करा तपेली;

तृषा नाहिंशी तिनें करीन,
तपेलीसही जलिं भरवीन,
प्रवासासही जलिं जिरवीन, नको मला ही असली मेली !

प्रकार घ्या हा मनिं एकंदर;

सर्वस्वाची करा तपेली,
माझ्या पाण्यानें भरलेली,
पाहुनि तिजला तिन्ही काळीं, खुबी ओळखा क्या है अंदर !

* * *

## शेवटची कविता !

[ शेवटची कविता ! माझी शेवटची कविता ! तिला प्रस्तावना काय लिहूं ? माझी उद्यांची अनाथ कवितादेवी—देवि, तूंच काय लिहावयाचें तें लिही ! ]

शांत शांत दशदिशा, शांतवा तुमचें दशभाग,
शांत जरा व्हा सुरासुरांनों, सकळ महाभाग !
अवकाशांतिल वायुसागरा, लाटा करि बंद,
जलचक्रा, तव फिरत्या झुळकी ठेव जरा बंद !
देवदूत हो पाऊल वाजवूं नका, व्हाच शांत !
भूतांनो, क्षण बंद करा हा तुमचा आकांत !
प्रकाशांतल्या अणुरेणू हो, बंद करा नाच,
काळोखाच्या रजःकणांनो, करा सहन जाच !
नका सळसळूं देऊं तरु हो, तुमच्या पानांना,
श्वासहि सोडुं न द्या लतिकांनो, कोमल कुसुमांना !

फुलत्या कलिकांनो, ठेवा ग स्तब्ध हृदयपात्र,
अर्धी उघडीं तोंडें तशींच ठेवा क्षणमात्र !
नक्षत्रांनो, चमकेची ही नकोच चाहूल,
काळा, पळत्या क्षणाक्षणाचें थांबवि पाऊल !
हृदया धडधड करिशी कां रे ; तूंच कसें फिरशी ?
कोंड घालि तरि, जीवा धडपड करी मुळीं न अशी
महाभाग हो, या आज्ञेचा मानुं नका राग,
आज्ञा नच ही, परी करपल्या आशेची आग !
स्वप्नामधल्या स्वप्नांतहि मज येत काळझोंप,
म्हणुनी हृदयांतुनी उपटितो नवलाचें रोप !
राग नका धरुं हतभाग्याचा ऐकुनि आकांत,
शांत शांत परि जिकडे तिकडे व्हा सारें शांत !
वाहूं द्या हा मम कवितेचा प्रवाह शेवटचा,
ऐकूं द्या हा तिजला माझा निरोप शेवटचा !
ऐकिलेंस ना—देवि, काय हें कसला हा पूर !
रडशी कां, वद, तुझें हृदयही झालें का चूर !
होय देवते, कविते, करितों मीच तुझा घात,
हा मातेच्या पहा गळ्यावर बाळाचा हात !
सावध सावध देवि शारदे, क्षणभर दे कान,
चराचरांनो, निरोप ऐका व्हाच सावधान !
गा विहगांनो, कवीश्वरांनो, गगनगायकांनो !
हंसा मुलांनो, हंसा फुलांनो, हंसा तारकांनो !
ऐकत नाहीं मी त्या तुमच्या मादक मुरलीला,
पाहत नाहीं सौंदर्याच्या मोहकतर लीला !
कुंदलते, करि कुंद कळ्यांनीं हंसुनी उपहास,
गड्या गुलाबा, झाडावरींतच हवा तसा हांस !

मार भरारी गरुडा, गगनीं; मी येतच नाहीं,
हे प्रतिभेचे पंख कापितो माझ्या हातांही !
चमक सारखी इकडून तिकडे तूं चंचल बिजली,
स्थिरावली कल्पना जागच्या जागीं ती थिजली
फूलपांखरा, तुझी तरळता फुलाफुलांवरतीं—
नाचूं दे; परि तरळ मना मी खिळिले जड जगतीं !
खुशाल आम्रा, मज मदनाचे पुष्पबाण मार,
ही सोनेरी ढाल रुप्याची हातीं तरवार !
आईच्या मांडीवर पाहुनि मेलेलें मूल
पडावयाची नाहीं आतां मम चित्ता भूल !
नवयुवतींच्या नेत्रकिरणि कुणि जरि केली जाळीं,
तोडिन तरि मी क्षणार्धांत तीं सारीं या काळीं !
राधारमणा श्रीकृष्णा, तूं बंद करी मुरली,
मनिंची मनांत जिरवीन इच्छा जी उरलीसुरली !
कलगीसाठीं कुणीं धांवला जरीतुरेवाला,
लागाबांधा तुटला आतां सलाम हा त्याला !
मज रिझवाया कालिदास बा येऊं द्या बाण,
नीरसतेचें चिलखत करि मज अभेद्य पाषाण ! [ अपूर्ण

* * *

# माझा मृत्युलेख

यावज्जीवहि ' काय मी ' न कळलें आप्तांप्रती नीटसें ।
मित्रांतेंहि कळे न गूढ—न कळे माझें मलाही तसें ।।
अज्ञाता ! मरणोत्तर प्रकट तें होईल तूंतें कसें ?
कोठें आणि कधीं तरी जगतिं मी होऊन गेलों असें ।। १ ।।

ता. १–४–१९१८

An April Fool's Work

# अभ्यासासाठीं टीपा

## प्रेमगीतें

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत गडकरी यांचा कवि म्हणून जो नांवलौकिक झाला तो मुख्यत्वें ते ' प्रेमाचे शाहीर ' या उपाधीनें झाला. गडकरी यांनीं एकूण ३८ प्रेमगीतें लिहिलीं व ही संख्या ' वाग्वैजयंती ' मधील इतर विषयांवरील कवितांच्या संख्येपेक्षां अधिक आहे यांत शंका नाहीं. इंग्रजी वाङ्मयांतील सौंदर्यवादी प्रेमकवींच्या काव्य-वाचनानें व इंग्रजी वाङ्मयांतील व लोकजीवनांतील प्रेमभावनेच्या मोहक दर्शनानें महाराष्ट्रांतील सुशिक्षित पांढरपेशा वर्ग आधींच मोहरून गेला होता. या पार्श्वभूमीवर जेव्हां गडकरी यांनीं आपल्या नाटकांतून व कवितांतून प्रेमभावनेची सफल वा असफल चित्रें रंगविलीं तेव्हां या वाचकांच्या मनावर त्याची तत्काल मोहिनी पडली जावी व गडकरी यांच्या काव्याला लोकप्रियता लाभली जावी हें साहजिकच ठरतें. गडकरी यांची प्रेमकविता विविध रंग—रूपांनी बहरलेली आहे. त्यांच्या कांहीं प्रेमगीतांत प्रेम—भावनेचें वर्णन व महत्त्व आलेलें आहे व त्यांतून सहजगत्या त्यांचे प्रेमविषयक विचार—प्रेमाचें तत्त्वज्ञान—प्रगट झालेले आहेत. त्यांच्या कांहीं प्रेमकवितांत निव्वळ कल्पनासौंदर्य व शब्दमाधुर्य ओतप्रोत भरलेलें आहे. आणि त्यांच्या कांहीं प्रेमकवितांत आत्मनिष्ठेमुळें अनुभवजन्य जिव्हाळा अनुभवतां येण्यासारखा आहे. या तिसऱ्या प्रकारच्या आत्मनिष्ठ प्रेमकवितेनें गडकरी यांनीं प्रेम केलेलें होतें, त्यांची प्रेमदेवता ही कोणी दोन अक्षरी असावी, व तिनें त्यांच्या प्रेमास प्रत्युत्तर दिलें नसल्यामुळें त्याच नैराश्यें-तून गडकरी यांच्या प्रेमकाव्याची निर्मिति झाली असावी अशा संशोधनास अवसर मिळालेला आहे. गडकरी यांच्या प्रेमकवितांचें हें त्रिविध स्वरूप लक्षांत घेणें आवश्यक आहे. हें लक्षांत न घेतलें गेल्यामुळेंच ' गडकरी हे प्रेमाचे अद्वितीय शाहीर आहेत ' या एका टोंकापासून ' गडकरी यांची प्रेमकविता निव्वळ कल्पनाकल्पित, शब्दमाधुर्यपूर्ण पण भावरहित आहे ' या दुसऱ्या टोंकापर्यंत टीकाकारांच्या टीकांची मर्यादा पोंचली आहे.

१. **हृदयशारदेस**—ही हृदयशारदा प्रत्यक्ष प्रमाणें देऊन सिद्ध करण्याची सुंदरी नाहीं. कवीनें केवळ काल्पनिक स्त्री, हृदयशारदा मानूनच हें काव्य लिहिलें आहे.

पृष्ठ ३ ओळ ४ ‘ माझी तारा,... ’ ही तारा गडकरी यांची प्रेमदेवता असावी असा निष्कर्ष प्रा. रा. शं. वाळिंबे ‘ गडकऱ्यांचें अंतरंग ’ या पुस्तकांत काढतात.

,, ओळ १७–१८ ‘ वक्षःस्थलिं तव...मरण ’ गडकरी यांची ही आवडती कल्पना ‘ प्रेम आणि मरण ’ या कवितेंत पूर्ण स्वरूपांत आढळेल.

२. ती कोण ? हें भाषा व विचार यांचा समन्वय साधणारें सुंदर सुनीत आहे.

पृष्ठ ४ ओळ ५ : “ जीवांचें जगणें असेंच असतें सापेक्ष प्रेमवारी : डोळेभेट दुरून भाव अथवा आशाहि त्याला पुरे ! ”

गडकरी यांच्या प्रेमविषयक तत्त्वज्ञानाचा एक भाग वरील चरणांत आला आहे. प्रेमिकांचें समाधान तुलनेनें किति अल्प मोबदल्यांत होत आहे तें पहा.

**४. फुलें वेचिलीं पण**—अनुभूतिजन्य भावनोत्कटतेपेक्षां येथें प्रसंगजन्य कल्पनाविलासावरच भर आहे. आरंभीं पन्हाळगडाच्या पठाराच्या आसमंतात् गोळा केलेलीं, विविध ऋतूंतील फुलें कविसृष्टींत एकदम फुललेलीं आहेत.

पृष्ठ ६ ओळ १६–‘ गुदस्त तें गुलदस्त ... ’ पूर्वजन्मानुसार या जन्मीं कर्में भोगावीं लागतात या हिंदु संस्कृतीच्या विचाराला ही मुसलमानी भाषा जोडली जाणें जरा चमत्कारिकच ! पण गडकरी यांचा तो हव्यास होता.

**५. जुन्या कवितांचा आठवण**—गडकरी यांचें बालपण-कांहीं वर्षें कर्जतला गेलें. त्या बालपणांतील त्यांची मैत्रीण ‘ तारा ’ हीस उद्देशून ही कविता असावी. अनुभूतीचा जिव्हाळा साध्या शब्दांतून प्रकट होतो. यांतील शब्द सोडलेल्या जागीं ‘ तारा ’ हें नांव असावें असा पुरावा प्रा. वाळिंबे देतात.

पृष्ठ ८ : २ या वरून बालपणांतील निर्दोष मनानें केलेल्या सात्त्विक प्रेमाची पूर्तता झाली नव्हती व ही खंत अनेक वर्षें गडकरी यांच्या मनांत वाटत होती.

**६ फणसाचें पान**—पृष्ठ ८, ओळ ७–९ ‘ दोनच नयनीं दिसेना ’ हें प्रेमाचें तत्त्वज्ञान या ओळींतून प्रकट होतें. त्याचप्रमाणें गडकऱ्यांची प्रेमविषयक आर्तता या कवितेंत सहजगत्या आढळून येते.

" फणसाच्या त्या पानावरती दिसल्या ज्या मज रेषा ।
कधींकाळाच्या उघडुनि दाविति मनिंच्या आंतरवेषा ।।
लिहुनि ठेविली पूर्ववयामधिं कथा गोड जी पानीं ।
पुन्हा वाचिली, आणि जहाला सखेद हर्षहि रमणि । " ।।

बालपणच्या प्रेमीजनाच्या, संगतींत फणसाच्या पानावर व्यक्त केलेली प्रेमभावना, तें फणसाचे पान पुन्हां दिसताच, जागृत व्हावी, प्रेमभंग झालेला असूनहि ती आठवण रमणीय व्हावी हाच काव्यानंदमीमांसेंतील पुनः-प्रत्ययाचा आनंद. ' सखेद हर्ष ' ही शब्द योजना किती साभिप्राय आहे !

रोमँटिक संप्रदायाचा प्रसिद्ध आंग्लकवि शेले असेंच म्हणत नाहीं काय:-

Music, when soft voices die.
Vibrates in the memory ;
Odours, when sweet violets sicken,
Live within the sense they quicken ...
And so thy thoughts, when thou art gone
Love itself shall slumber on.

७. एका शब्दासाठीं विनंति—पृष्ठ ९ ओळ १६—अरेरे या बालेनें 'होय' हा शब्द लिहूं नये ना ?

८. निर्दय बालेस—प्रेमभंगामुळें सात्त्विक संताप येऊन गडकरी यांनीं ही कविता लिहिली असावी. पृष्ठ १० : ओळी १७–१८. प्रेमाचें मानवी जीवनातील स्थान

९. मोरपिसावरचा डोळा—गडकरी यांची जी प्रेमनिराशा झाली त्याचें स्वरूप त्यांच्या प्रेमदेवतेनें त्यांच्याशीं प्रेमाचे फसवे खेळ करून अखेर दुसऱ्यास वरलें असें होतें काय ?—'निर्दय बालेस', 'मोरपिसावरचा डोळा' या कवितांवरून तशी कल्पना सूचित होते.

१०. गोफ—प्रा. कविभूषण खापर्डे यांना यांत गडकरी यांनीं बालकवींचें अनुकरण केलें असल्याचा भाग अधिक वाटतो. पण ' अष्टदिशांचा गोफ' या बालकवींच्या कवितेपेक्षां ह्या कवितेचें स्वरूप अगदींच भिन्न आहे. 'भावबंधनांत'हि प्रेमाचा गोफ गुंफण्यावर त्यांचें एक पद आहेच.

**११. हृदयास**--प्रेमभंग झाल्यामुळें बुद्धिवादाच्या आहारीं जाऊन गडकरी, 'गोविंदाग्रजांच्या' भाविक अंतःकरणास व्यावहारिक उपदेश करीत आहेत. यांत प्रेमदेवतेचा केलेला अधिक्षेप गडकऱ्यांच्या तीव्र अहंकारास शोभेसा असला, तरी थोर प्रेमिकास शोभणारा नाहीं. विशेषतः ' नटवें सोंग, वेगडी रंग; कमअस्सल जात, मातीचें बाहुलें, खोटें नाणें ' हीं विशेषणें अस्सल प्रेमभावनेचीं निदर्शक होतील काय ? प्रा. खापर्डे, प्रा. हर्षे यांच्यासारख्या टीकाकारांना याचमुळें कवीच्या उच्च व शुद्ध ' प्रेमा ' विषयीं वारंवार संदेह वाटत असावा, परंतु प्रा. वाळिंबे यांचें मत निराळें आहे. त्यांना ' हा क्षणिक उद्वेगाचा आविष्कार ' वाटतो.

आत्यंतिक प्रेम करूनहि दयितेनें फसवेगिरी केली तर प्रेमिकाला क्रूर वंचनेनें राग येणें साहजिक आहे. ' शाकुंतल ' या नाटकांतील शकुंतलेचें रागाचें भाषण नैसर्गिक नाहीं काय ?

**१२. शेवटचें प्रेमगीत**—आत्मनिष्ठ प्रेमगीत. सात वर्षांची तपश्चर्या व्यर्थ गेली ह्या वैफल्यानें स्फुरलेलें हें प्रेमगीत आहे, पण त्यांत ' हृदयास ' मधील व्यवहारज्ञान नाहीं, तर खऱ्या प्रेमवीराची श्रद्धा आहे. ' जन्मजन्मांतरीं एकदां क्षणभरीं । प्रेम लाभो तुझें शोकघाता ' ही हृदयास भेदून टाकणारी भाववाणीच ' क्षण एक पुरे प्रेमाचा । वर्षाव घडो मरणाचा ' हें प्रेमविषयक तत्त्वज्ञान सांगू शकते.

**१३. अल्लड प्रेमास**—' जग सगळें हें देखाव्याचें ' ' प्रेमा येथें शपथ लागते ' ही वैफल्यदर्शक विचारसरणी सांगणारे गडकरी ' हृदयास ' या कवितेच्या मनोभूमिकेंत पुनश्च आले आहेत.

**१४. पुनर्जात प्रेमास**—' टाकूं जाळुनि नैराश्याला ' ही साद घालणारा प्रेमवीर कवि आशावादी आहे. अर्थातच यांत भावनोत्कटतेपेक्षां आशावादी विचारसरणीचाच पगडा अधिक आहे.

**१५. प्रेम आणि मरण**—' प्रेमाचे शाहीर ' असणाऱ्या गोविंदाग्रजांची ही सुविख्यात कविता आहे. एका कथाप्रधान रूपकांतून गडकरी प्रेमाचें स्वरूप व सामर्थ्य विशद करीत आहेत. **होनाजी बाळ**—पेशवाईच्या अखेरीस होऊन गेलेला हा शाहीर होनाजी गवळी. घनश्याम सुंदरा ही

याची भूपाळी फारच प्रसिद्ध आहे. गडकरी यांनीं आपल्या कवितेस पोषक असे काव्यचरण होनाजीचे घेतले आहेत. गडकरी यांचें जुन्या लावणी-- वाङ्मयाचें वाचन विशेष होतें--हें ' नवथर लहरी, जिव्हारी घाव, दीड वितीची दुनिया, इष्काचा जहरी प्याला ' इत्यादि शब्दांवरून सहजच दिसून येईल.

पृष्ठ २०--२१ ' निष्प्रेम चिरंजीवन तें....वर्षाव पडो मरणांचा ' प्रेमाचें निष्ठावंत तत्त्वज्ञान; ओळी ७९--८०:--प्रख्यात आंग्लकवि टेनिसन यांच्या पुढील विचाराशीं साम्य आढळेल.

" It is better to have loved and lost
than never to have loved at all. "

हटयोग--भक्त स्वतः शरीर कष्टवून उपास्य देवतेस वश करून घेतो. या कवितेंत आत्मनिष्ठा नसली तरी रसोत्कटता आहे. कीट्सप्रमाणेंच प्रेमसाफल्य व मृत्यु यांची सांगड घालण्याचा रोमँटिक सप्रदाय येथें पाळला गेला आहे.

" वृक्ष थोर एकच त्यांत । वाढला पुरा जोमांत । "

प्रा. वाळिंबे यांना या चरणांत गडकरी यांना स्वतःच्या कर्तबगारीविषयीं वाटणारा अमर्याद विश्वास प्रकट झाला आहे असें वाटतें आणि त्यामुळेंच या रूपकांतून स्वतःच्या प्रेमभावनेचा आविष्कार पर्यायानें ( By Proxy ) ते करीत आहेत असा निष्कर्ष काढतात.

ओळी ९०-१००--काव्यात्मकतेवर कळस म्हणजे परिणामकारक व नाट्यात्मक वाटणाऱ्या, अनुष्टुभ् छंदांतील या शेवटच्या दोन ओळी आहेत.

**१६ ओसाड आडांतील एकच फूल**--जगांतील एकाकी जीवनावरील प्रतीकात्मक काव्य. गडकरी ह्यांचा प्रेमभंग झाला होता, त्यावरील तर हें रूपक नसेल ?

पृष्ठ २३ ओळी १९--२० ' जोडीचा महिमा असा चहुंकडे... जिणें. '

स्त्रीशिवाय पुरुषी जीवन व्यर्थ होय हा विचार यांत स्पष्टपणें डोकावतो. रचनेंतील पांच सुनीतें हें या कवितेचें एक वैशिष्ट्य होय. शेक्सपीअर पद्धतीनें प्रथम बारा ओळी लिहून शेवटच्या दोन ओळींत कलाटणी आहे.

ही वाचतांना रूपकांतून आत्मनिष्ठा प्रकट करण्याच्या पद्धतीशीं समांतर अशी—' प्रोजेक्शन ' पद्धतीची, शेली या कवीची ' A Sensitive Plant ' कविता आठवते असें प्रा. वाळिंबे म्हणतात : अर्थात् त्यावरून गडकरी यांनीं ही कविता रचलेली नाहीं. परंतु रोमँटिक स्वभावाच्या समान कविमनाचा आविष्कार कसा चालतो याचें तौलनिक दर्शन यांत घडतें.

१७. **गुलाबी कोडें**—हें प्रेमगीत या सदरांत असलें तरी मुख्यत्वें तें कवीच्या कल्पनाविलासानें निर्माण केलेलें नर्म शृंगार-गीत आहे. सर्व टीकाकारांनीं एकमतानें वाखाणलेली गडकरी यांची ही उत्कृष्ट कविता आहे. अफाट कल्पना, नादमधुर प्रासादिक शब्दयोजना व निर्दोष रचना पहा.

१८. **प्रेमाची प्रामाणिकता** प्रख्यात आंग्लकवि लॉर्ड बायरन याच्या कवितेच्या आधारें ही सुचली आहे. कांहीं टीकाकारांना यांत ' अश्लीलतेचा वास ' येतो.

१९. **प्रेमाखातर**—गडकरी यांची उत्कृष्ट व उत्कट कविता. प्रेमाचें तत्त्वज्ञान-दर्शक पुढील ओळी पहा.

पृष्ठ २८ ' प्रेमें बोले, प्रेमें डोले, प्रेमें जग हाले
प्रेमाखातर जगीं आजवर काय नाहिं झालें ? "

पृष्ठ २९ ' ब्राह्मणपद बादशहाला '—थोरले बाजीराव पेशवे यांनीं मस्तानी स्वीकारली. ' पंडितराय '—सोळाव्या शतकांतील विद्वान कवि जगन्नाथ पंडित यांनीं दिल्लीस शहाजहानच्या दरबारांतील लवंगी ह्या मुसलमान स्त्रीशीं विवाह लावला. ' व्रिजभाषेचा प्रेमवाल्मिकी '—हिंदी भाषेंतील सुविख्यात कवि तुळशीदास. प्रेमभावनेची निष्ठा, भाषेतील ढंगदार ओघ यामुळे आचार्य अत्रे यांना ही कविता ' प्रेमाचें एक तेजस्वी स्तोत्रच ' वाटतें.

२०. **दिव्य प्रेमाची जाती**—दिव्य प्रेमाला 'न मिळे अवसर अभिलाषा ।
' दे घे ' ची नाहीं भाषा । ' हे विचार प्रेमाचें उदात्त रूप दाखवितात. तसेंच—

उदात्त वृत्तीचा प्रसर । स्वार्थाचा पाडी विसर । ...
निरभिलाष तन्मयता ती । दिव्य प्रेमाची जाती ॥

याहि ओळींत हेंच सूत्र आलें आहे. दिव्य प्रेम निसर्गजीवनांत आढळतें हें पूर्वार्धांत विविध उदाहरणांनीं स्पष्ट केलेलें आहे. आणि कोणत्याहि सुंदर

वस्तूंत अविनाशी आनंद देण्याचें सामर्थ्य असतें हा सिद्धांत सांगितला आहे. "सौंदर्याचा उत्कर्ष । कुठें असें तरि दे हर्ष ॥" या काव्यचरणांच्या वेळीं कीटस्चे पुढील उद्गार 'A thing of beauty is a joy for ever' सहज आठवतील.

## सामाजिक कविता

गोविंदाग्रजांची सामाजिक कविता संख्येनें फार थोडी आहे व आहे त्यांतहि केशवसुतांच्या सामाजिक कवितांतून आढळणारी पोटतिडिक किंवा ज्वलंत भावना आढळत नाहीं. 'दसरा'. या कवितेच्या शेवटीं त्यांनीं स्वतःला 'केशवसुतांचा सच्चा चेला' असे म्हणवून घेतलें आहे व त्यांच्या 'तुतारी' चा उल्लेखहि दोन ठिकाणीं केला आहे. 'तुतारी मंडळाचे' ते एक सदस्य होते. पण असें असूनहि त्यांच्या सामाजिक काव्यांत उत्कटतेपेक्षां कल्पनाविलासाचा व अनुकरणाचा भागच अधिक आढळतो. गडकरी स्वतः देवभक्त होते व जुन्या पारंपारिक नैतिक कल्पनांचाच पुरस्कार त्यांनीं आपल्या नाट्यसृष्टींतून केलेला आढळेल. त्याची प्रकृति सामाजिक सुधारणांना तितकीशी अनुकूल नव्हती असेंच एकंदरींत त्यांचें सर्व वाङ्मय वाचल्यावर लक्षांत येतें. त्यामुळेंच 'तुतारी' च्या पद्धतीवर लिहिल्या गेलेल्या 'दसरा' या त्यांच्या कवितेंत जिवंतपणा किंवा पोटतिडिक आढळत नाहीं. जोरदार भाषा, विविध कल्पना इत्यादि गोष्टींमुळें या कवितेचें बाह्यांग मात्र चांगलें सजविलेलें आढळेल. 'स्मशानांतील गाणें' या कवितेची कल्पनाच मुळीं चमत्कृतिमय आहे. स्मशानांत भुतांच्या तोंडीं घातलेल्या गाण्यांत मानवी व्यवहारावर जळजळीत उपरोध आढळत असला तरी भावनेच्या उत्कटतेपेक्षां चमत्कृति हाच या कवितेचा विशेष ठरेल. 'एक समस्या' ही तर उघड उघड बोलक्या सुधारकांचा उपहास करणारी कविता आहे. एकंदरींत सामाजिक सुधारणांविषयीं गडकऱ्यांना तितकीशी आस्था वाटत असावी असें त्यांच्या कवितांवरून किंवा त्यांच्या इतर वाङ्मयावरून वाटत नाहीं. त्यामुळेंच त्यांच्या या विषयांवरील कवितांतून भावनेच्या उत्कटतेपेक्षां कल्पनांची कलाकुसरच अधिक जाणवते.

**२१. दसरा:** केशवसुतांच्या तुतारीची ही नक्कल आहे. 'पादाकुलक' हें 'तुतारी'ला वापरलेलें वृत्तच या कवितेला त्यांनीं वापरलें आहे. 'जुन्या

रूढी विसरा-नव्या कल्पनांचा व विचारांचा आतां स्वीकार करा' हा 'तुतारी'त आलेला विचारच या कवितेंत प्रामुख्यानें आला आहे. अनेक ठिकाणीं कल्पनासाम्यहि आढळतें.

पृ. ३२-ओळ १७ : चौमास-चातुर्मास.

पृ. ३३-ओळ १९ : "जुन्या मतांचा जाळा कचरा"... या कल्पनेशीं 'तुतारी' मधील "जुने जाउं द्या मरणालागुनि। जाळुनि किंवा पुरुनि टाका" या कल्पनेचें साम्य पहा.

पृ. ३३-ओळ ३९-"जुन्या ऋषींना सलाम ठोकुनि..." केशवसुतांची पुढील कल्पना पहा : पूर्वज वदले त्या गमले जे। ऐका खुशाल सादर चित्तें परंतु सरका निःशंक पुढते ॥"

पृ. ३४-वरील 'कसले पूर्वज घेउनि बसला' ही कल्पनाहि याच स्वरूपाची आहे.

पृ. ३४-ओळ ११-उप्लाणी : खोगीर न घातलेला घोडा.

पृ. ३४-ओळ १८-'मानव धर्म'-केशवसुतांनीं 'समतेचा ध्वज उंच धरा रे' असें म्हटलें आहे. 'मानवधर्मा' च्या मागें हीच कल्पना अभिप्रेत असावी.

पृ. ३४-ओळ-२४-'काळाचें मैदान अफाट' या कल्पनेशीं केशवसुतांचा 'प्राप्त-काल हा विशाल भूधर। सुंदर लेणीं तयांत खोदा। निजनामें त्यावरती नोंदा ॥' या कल्पनेशीं साम्य पहा. केशवसुतांनीं घेतलेले प्रतीक अधिक समर्पक वाटतें.

पृ. ३५-भागवतः-राजारामशास्त्री रामकृष्ण भागवत. (१८५१-१९०८) आगरकरांच्या काळांतील निष्ठावन्त सुधारक.

पृ. ३५-ओळ-११-१२ : केशवचन्द्रः-केशवचन्द्र सेन. बंगालमधील मोठे समाज-सुधारक व ब्राह्मोसमाजाचे पुढारी.

**२१. स्मशानांतील गाणें :** या कवितेचे तीन भाग पडतात. १ ते १२ कडव्यांत स्मशानांतील वातावरण निर्माण केलें आहे. १३ ते ४४ कडव्यांत भुतांचें गाणें आहे, आणि ४५ ते ४८ कडव्यापर्यंतचा भाग उपसंहारात्मक आहे. पहिल्या भागांत स्मशानांतील भयाण वातावरण निर्माण करण्यासाठीं

कवीनें शब्दयोजनाहि मोठी चमत्कृतिपूर्ण केली आहे. भुतांच्या गाण्याला रातकिड्यांचा किर्रर्र शब्द सूर धरतो आहे, श्वानाचें रडणें त्याला साथ देतें आहे, आणि वाचकाच्या हृदयांतील धडधड त्याला ताल देते आहे. स्मशानाचें असें भयानक वर्णन गोविंदाग्रजांनीं काव्यांत व नाटकांत अनेक ठिकाणीं केलें आहे. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, गोविंदाग्रज कमालीचे भित्रे होते. शनिवारवाड्याच्या फुटक्या बुरुजावरून रात्रीं एकट्यानें त्यांना जाण्याची भीति वाटत असे. ‘ भावबंधन ’ मधील ‘ महेश्वरा ’ प्रमाणें जिवंतपणीं ते एकटे स्मशानांत कधींच गेले नाहींत. पण त्यांचीं स्मशानाचीं वर्णनें मात्र परिणामकारक साधलीं आहेत.

कडवे ३ : यांतील कल्पना स्मशानांतील वातावरणाशीं कशी सुसंगत आहे. याची सहज कल्पना येईल.

कडवें १३ ते ४४ : हा कवितेचा मुख्य भाग. भुतांच्या या गाण्यांत मानवांची दुटप्पी वृत्ति, त्यांचें कपट, त्यांची रूढिप्रियता, त्यांची स्वार्थवृत्ति इत्यादि गोष्टींवर भुतांनीं टीका केली आहे. या टीकेच्या कचाट्यांतून देवहि सुटले नाहींत. त्यामुळें केवळ सामाजिक सुधारणा हाच या कवितेचा विषय नाहीं. ‘ वनवासी फूल ’ ही रे. टिळकांची कविता या कवितेंतील विचार-साम्याच्या दृष्टीनें वाचण्यासारखी आहे.

‘ कापट्याचा सागर म्हणजे हा तुमचा संसार ’ हें त्या वनवासी फुलानें मानवी जीवनासंबंधीं केलेलें विधान हेंच याहि गाण्याचें सूत्र आहे.

कडवें २१—बेशरमी हैवान. कवितेंत मधून मधून फारशी शब्द पेरण्याची गोविंदाग्रजांची हौस. ‘ राम जाणतो क्या है अंदर ’ ही शेवटच्या कडव्यांतील ओळ पहा.

कडवें—२४—‘ पतिव्रतेला परि पांच पति ’—द्रौपदीचा उल्लेख—‘ अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी तथा ’ ही पांच पतिव्रतांची यादी आहे.

कडवें—२९—‘स्त्रीच्या केसांनीं ते तरती.’—विधवेनें केशवपन केलें नाहीं तर तिच्या मृत पतीला मुक्ति मिळत नाहीं ही कल्पना.

कडवें—४६—‘ विधवेनें मृत बालक त्यजिलें. ’ सामाजिक अन्यायाचा चमत्कृतिमय व करुण उल्लेख.

**२३. कवि आणि कैदी :** या कवितेच्या अर्थासंबंधीं बरेच मतभेद दिसतात. कवीनें कवितेला जोडलेली टीप संदिग्ध आहे. श्री. हर्षे यांना ही कविता कवीच्या वैवाहिक जीवनाच्या वैफल्यांतून निर्माण झाली आहे असें वाटतें. ते म्हणतात : " पुढें ते वैवाहिक बंधनांनीं जखडले गेल्यानंतरहि एक वेळ हीं सर्व बंधनें तोडून टाकून, स्वैर भरारी मारण्याचेहि विचार त्यांच्या मनांत आले होते, असें ' कवि आणि कैदी ' या कवितेंतील उल्लेखावरून दिसतें. " ( गोविंदाग्रज पृ. ८५ ) त्यांचें हें विधान म्हणजे त्यांच्या प्रतिभेची ही स्वैर भरारी आहे, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. कांहींना या कवितेंत आध्यात्मिक अर्थ दिसतो व कवीनें जोडलेल्या टीपेनें याला थोडीफार पुष्टीहि मिळते. पण साधारपणें रूढि आणि व्यवहार यांच्या बेडीमुळें जखडल्या गेलेल्या प्रतिभावंत व्यक्तींना अनेकदां ही बेडी तोडून प्रतिभेनें दाखविलेल्या जगांत स्वैर संचार करावासा वाटतो, नवे नवे अनुभव घ्यावेसे वाटतात, नव्या नव्या सौंदर्याचें दर्शन घेण्याची व दिव्य अनुभूतीनें न्हाऊन निघण्याची त्यांना इच्छा होते. अशा प्रतिभासंपन्न कलावंताच्या अंतःकरणाचा कानोसा या कवितेंत घेण्याचा प्रयत्न केला असावा असें एकंदर कविता वाचतांना वाटतें. संकुचित विश्वांत राहण्याचा कंटाळा आल्यानें प्रतिभेच्या साहाय्यानें लपलेलीं भुवनें शोधून काढण्याची कलावंताची उत्कट इच्छा हा या कवितेचा विषय असावा. मात्र ' ब्याद ', ' शेण ', ' ओकारी ' अशा सारखे रसभंग करणारे शब्द यांत आले नसते तर बरें झालें असतें. शेवटल्या कडव्यांतील रविकिरणांच्या मोकळ्या दोऱ्यांवर मेघांचे दोले बांधून त्यावर झोके घेण्याची कल्पना मोठी सुंदर आहे.

**२४. एक ' समस्या ' :** ही कविता म्हणजे बोलघेवड्या सुधारकावर केलेली टीका आहे. यांतील उपरोध मोठा मार्मिक आहे. वृद्ध, विधवा, अडाणी कुणबट व भंगी रस्त्यांत दिसतांच संतापणारा हा सुधारक पिंपळपारावर प्रदक्षिणा घालणारी सुंदर तरुण विधवा दिसल्याबरोबर सुधारणेचा आक्रोश करूं लागतो आणि ' सुधारणा होणार तरी कधीं या दुर्दैवी देशांत ! ' असा प्रश्न विचारूं लागतो. यांत सुधारणेचा उपहास केला नसून, पोषाखी सुधारकांच्या वृत्तीचा उपहास केला आहे हें लक्षांत ठेवावयास हवें.

## कल्पना–प्रचुर कविता

कल्पना हाच गोविंदाग्रजांच्या काव्याचा आत्मा असें म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. विशेषतः ज्या कवितांतून त्यांची कल्पनाशक्ति स्वैर विहार करतांना आढळतें त्या ठिकाणीं कुबेराच्या औदार्यानें अलंकारांचा वर्षाव करतांना ते आढळतात. त्यांच्या कल्पनेची भरारी पाहून मन स्तिमित होतें. पण याबरोबरच कल्पनेच्या आत्यंतिक आहारीं गेल्यामुळें भावनेची बाजु तितकीच लंगडी पडते. या कविता बुद्धीला भुलवतात पण मनाला हलवूं शकत नाहींत. चिमुकलीच कविता ' किंवा ' बागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास ' या कवितांतून लहान मुलांचें वर्णन येत असलें तरी वत्सल रस कुठेंच येत नाहीं. कल्पनेची वारेमाप उधळपट्टी मात्र आढळतें. अनेकदां या कल्पनांचा अतिरेक होतो व रसभंग करणाऱ्या कल्पना कवितेंत डोकावूं लागतात. ' बागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास ' या कवितेंत याची साक्ष पटेल. ' अरुणां 'त बालकवींची कोमलता नाहीं. केवळ उत्प्रेक्षांचा वर्षाव आहे. या कविता गडकऱ्यांच्या विशाल कल्पना–वैभवाची निश्चित साक्ष देतील.

२५. **चिमुकलीच कविता**—एका लहान मुलीचें केसापासून पायाच्या नखापर्यंत उत्प्रेक्षामय वर्णन हा या कवितेचा मुख्य विषय. या वर्णनांत गडकऱ्यांनीं तीळहि उणा पडूं न देण्याचें ठरविलेलें दिसतें. कवितेच्या शेवटच्या वर्णनावर बालकवींच्या शैलीची छटा उमटलेली दिसते.

२६. **बागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास**–नांवांत गोविंदाग्रजांनीं आपली अनुप्रासाची हौस भागविली आहे. कवितेची कल्पना चमत्कृतिपूर्ण आहे. बागेंत लहानगा बाळ खेळत असतां बागेंतील विविध सौंदर्याशीं बाळ एकरूप झाला तर आपलें बाळ कोणतें तें ओळखतां येणार नाहीं अशी त्या बालकाच्या आईला शंका वाटते. बागेंतील विविध सुंदर दृश्यें घेऊन बाळ त्या त्या सौंदर्याशीं एकरूप कसा होईल हें मोठ्या चमत्कृतिपूर्ण रीतीनें आईच्या तोंडीं घातलें आहे. पण यांत कल्पनाचमत्कृति आहे–आईच्या वात्सल्याचा प्रत्यय कुठें येत नाहीं. विशेषतः ५–६–७ या कडव्यांतील कल्पना मातेच्या भावनेशीं विसंगतच वाटतात.

२७. **अरुण :** बालकवींच्या ' अरुणा ' चें अनुकरण आहे पण बालकवींच्या ' अरुणां 'तील कोमलता यांत नाहीं. एकामागून एक येणाऱ्या चमत्कृतिपूर्ण

उत्प्रेक्षा हाच या ‘ अरुणा ’ चा विषय–शेवटच्या आठ ओळींतून मात्र कवितेला कलाटणी मिळाली आहे. स्वतःच्या जीवनांतील प्रेमभावनेचा उल्लेख त्यांत असावा असें वाटतें. गडकऱ्यांनीं दोन अरुण लिहिले. त्यापैकीं हा पहिला ‘ अरुण. ’ दुसरा ‘ अरुण ’ त्यांच्यांत शब्दांत सांगावयाचें म्हणजे ‘ भयंकर ’ आहे. या अरुणांतील अनेक उत्प्रेक्षा गोविंदाग्रजांच्या प्रतिभेची साक्ष देतात.

पृ ६० ओळ १–सती केलेल्या स्त्रियांचा उल्लेख.

३–सीतात्याग केल्यानंतर ‘ अश्वमेध ’ यज्ञाच्या प्रसंगीं रामानें सीतेची सुवर्णमूर्ति शेजारीं ठेवली होती.

पृ. ६१ ओ. ५ पासून पुढें गोविंदाग्रजांनीं कवितेला दिलेली कलाटणी लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्यांच्या जीवनांतील प्रेम-प्रकरणाचा यांत उल्लेख असावा अशी टीकाकारांची समजूत आहे.

**२८. हालत्या पिंपळपानास** : हालत्या पिंपळपानास पाहून ज्या विविध कल्पना कवीला सुचल्या त्याचें स्वरूप विविध प्रकारचें आहे. त्यांत केवळ कल्पनाविलास नाहीं–त्यांत थोडेंफार तत्त्वज्ञान आहे–स्वतःच्या दुःखमय जीवनाचा उल्लेख आहे आणि ‘ अरुण ’ प्रमाणेंच चमत्कृतिमय रीतीनें केलेला प्रेमाचा उल्लेख आहे. इतर कल्पनाप्रचुर कवितांपेक्षां कवि या काव्यांत अधिक अंतर्मुख झाले आहेत. त्यामुळें कविता थोड्याफार प्रमाणांत तात्त्विक स्वरूपाचीच झाली आहे.

पृ. ६३–ओ. १८–१९ वैयक्तिक उल्लेख. ‘अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस’ या कवितेंतील पुढील उल्लेख पहा :

हातीं संसाराची माती।
मनिंच्या आशा मनींच खाती।
भूतकाळचीं भूतें रडतीं।( पृ. ७२ )

पृ. ६४–ओ. १४–१५ या ठिकाणीं आलेला उल्लेख ‘पिंपळपान’ या अलंकाराचा आहे. हा सोन्याचा अलंकार असून तो केसाच्या भांगाजवळ कपाळावर रुळत असतो.

## स्फुट कविता

**२९. राजहंस माझा निजला**—एके काळीं अत्यंत लोकप्रिय झालेली कविता. विषय सर्वस्पर्शी–भावना उत्कट. त्यामुळें या कवितेनें लोकांना वेड लावलें. पण कृत्रिमता, भावनेचा भडकपणा व शब्दाची आतषबाजी या दोषांतून कवितेचें समर्थन करणें कठीण आहे. श्री. हर्षे यांनीं या कवितेचें पिंजून केलेलें विश्लेषण थोडें अतिरेकी वाटलें तरी अगदींच अस्थानीं नाहीं. कवितेंत नाट्य आहे. त्यामुळें सामान्यांच्या मनाची ही कविता सहज पकड घेते-पण सूचकता व संयम सोडल्यामुळें त्यांत आलेला रडवेपणाहि दृष्टि-आड करतां येत नाहीं. करुणरसांतील संयमाचा अभाव या ठिकाणींच नाहीं, तर त्यांच्या नाटकांतहि अनेक वेळां जाणवतो. श्री. हर्षे यांनीं कवितेची मूळ बैठकच चुकीची असल्याचा दावा मांडला आहे. आपला राजहंस मेलेला नाहीं, जिवंतच आहे अशा भ्रमांत असलेली आई त्याच्या मृत्यूचा पुन्हांपुन्हां उल्लेख करते व शेवटीं स्वत:च मरून जाते हें त्यांना पटत नाहीं. पण मानसशास्त्रदृष्ट्या त्यांनीं काढलेला दोष बरोबर नाहीं. एकुलत्या एका मुलाच्या मृत्यूनें धक्का बसलेलें आईचें मन अर्धवट भ्रमांत असतें–दारुण वास्तव परिस्थितीचे चटके मनाला वारंवार तिच्या मनाला बसत असतात हें विसरून चालावयाचें नाहीं. 'दुर्दैवनग', 'कौस्तुभमणी' इत्यादि संबंधीं त्यांनीं घेतलेले आक्षेप अगदींच अनुल्लेखनीय आहेत. दुसऱ्या कडव्यांतील 'धक्का' शब्द मात्र खटकतो.

**३०. अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस**—गडकऱ्यांच्या वैयक्तिक जीवनांतील कटुतेचा व निराशेचा उल्लेख या काव्यांत आपणाला आढळतो. 'हातीं संसाराची माती...' व 'निष्प्रेमाची शेज सोबती...' या दोन कडव्यांवरून गडकऱ्यांचें वैवाहिक जीवन सुखी नव्हतें असा निष्कर्ष बऱ्याच टीकाकारांनीं काढला आहे. या कवितेंतील भावनेची उत्कटता मात्र उल्लेखनीय आहे.

**३१. केशवसुत मेले ?**—स्वत:ला 'केशवसुतांचा सच्चा चेला' म्हणवून घेणाऱ्या कवीनें केशवसुतांना त्यांच्या मृत्यूनंतर वाहिलेली ही आदरांजली आहे. केशवसुतांविषयीं गोविंदाग्रजांना वाटणारा आदर यांत

शब्दांनून व्यक्त झालेला दिसेल. 'एकाठायीं होते। ते सर्व ठायीं भरले ॥' या कडव्यांतील कल्पना मोठी उदात्त आहे.

३२. **घुंगुरवाळा**—ही छोटीशी कविता कल्पनेनें व नादमयतेनें नटलेली आहे. बालकाच्या घुंगुरवाळयाच्या नादांत त्याच्या आईला जे अस्फुट सूर ऐकू येतात ते कवीनें मोठ्या सूचक रीतीनें वर्णन केले आहेत. या काव्यांतील अनुप्रासहि अतिशय विलोभनीय आहे.

३४. **भीमकवाळा**—ही गडकऱ्यांची दुसरी चांगली कविता. हें गीत नाटकांत घातलें आहे व नाटकांतील कथानकाच्या संदर्भांत या गीताची गोडी अधिकच रम्य वाटेल. स्वतंत्रपणें वाचलें तरी उत्कट नाट्यगीत म्हणून तें सरस आहे. कवितेंतील भाषेचा साधेपणा हा विशेष लक्षांत घेण्यासारखा आहे.

३५. **स्मृतिगीत**—हेंहि एक नाटकांत घातलेलें गीत आहे. भवभूतीच्या उत्तर रामचरित्रांतील 'ते हि नो दिवसा गताः' या श्लोकाचें तें स्वैर रूपांतर आहे. पण भाषेंतील साधेपणा व त्यांतून प्रकट होणारी उत्कट भावना यामुळें हेंहि नाट्यगीत रम्य वाटतें.

३६. **कळ्यांचीं फुलें कशीं झालीं ?**—केशवसुतांच्या 'दंवाचे थेंब' या कवितेची दाट छाया या कवितेवर पडली असावी.

३९. **श्री महाराष्ट्रगीत**—ही कविता शेवटीं अपूर्णच राहिली. महाराष्ट्राच्या वैभवाचें व सामर्थ्याचें सर्व वर्णन यांत यावयाचें होतें. आहे त्या वर्णनांत संगति नाहीं किंवा कालानुक्रमहि पाळलेला नाहीं.

पृ. ८६ ओळ ६—हिरकणी नांवाची गवळण रायगडावर दूध विकण्यासाठीं आली होती. परत जाण्यास तिला रात्र झाली. किल्ल्याचे सर्व दरवाजे बंद झालेले-व तिचें तान्हें मूल ती पायथ्याशीं घरीं ठेवून आलेली-शेवटीं ती अत्यंत अवघड अशा कड्यावरून खालीं उतरली व घरीं तान्हुल्याजवळ गेली. या तिच्या धाडसाबद्दल शिवाजीमहाराजांनीं तिला साडी चोळी देऊन गौरव केलाच पण ज्या कड्यावरून ती खालीं उतरली त्या कड्याला हिरकणी असें नांव दिलें. या कथेचा उल्लेख या ओळींत आहे.

पृ. ८५–ओ. १२—मुकुंदराज. मराठींतील आद्यकवि; 'विवेकसिंधु' व 'परमामृत' हे ग्रंथ त्यांनीं लिहिले.

पृ. ८६–ओ. १६—विष्णुदास नामा–संत नामदेव. शतकोटी अभंग लिहिण्याची यांनीं प्रतिज्ञा केली होती.

,, ओ. १८—मयूरंकवि–मोरोपंत.

,, ओ, १९.—केशवसुतांना 'नियमक' कां म्हटलें आहे याची निश्चित कल्पना येत नाहीं. कवितेला पूर्वींच्या अनेक बंधनांतून केशवसुतांनीं सोडविलें या दृष्टीनें हें विशेषण त्यांना दिलेलें असावें. यमकाचीं पूर्वींचीं बंधनें त्यांनीं पुष्कळच शिथिल केलीं.

,, ओ. २१—'गीतारहस्य'–लोकमान्य टिळकांनीं भगवद्गीतेवर रचलेली टीका. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरींतून भक्तिमार्गाचा पुरस्कार केला आहे तर लो. टिळकांनीं गीतारहस्यांतून कर्ममार्गाचा पुरस्कार केला आहे.

,, ओ. २२—जनाई–जनाबाई. नामदेवाची मोलकरीण.

पृ. ८७ ओ. २—देहूचा वाणी–तुकाराम.

,, ओ. ९—धारकरी–योद्धे.

४०. **कृष्णाकांठीं कुंडल**—गडकऱ्यांची जी कविता अपूर्ण राहिल्या-बद्दल अतिशय हळहळ वाटते अशी ही कविता आहे. शिवाजीचा बारगीर 'रायबागचा राया' आणि कुंडलच्या 'मान्यांची मैना' यांच्या दुर्दैवी प्रेमाची कथा गडकऱ्यांच्या मोहक वाणीनें फुलली आहे. नादमय शब्दरचना, मोहक शब्दचित्रें व स्वप्नमय वातावरण यामुळें या अपुऱ्या कवितेला सौंदर्याचा निराळाच उन्मादकारी साज चढल्याचा प्रत्यय येतो. शाहिराची रसवंती जणूं फुलत असल्याचा प्रत्यय काव्य वाचतांना येतो. काळाचा पडदा फाडून तीनशें वर्षें मागें आपण जातों आणि कृष्णाकांठच्या राईंत प्रणयाच्या उन्मादकारी धुंदींत बेभान होऊन जातो. शब्दांची घडणहि काळाला साजेशी. 'बाका बरकंदाज' 'तकदीर', 'जंगलशाही मिरास', 'नवती नार' इत्यादि शब्द त्या वेळचें वातावरण डोळ्यासमोर उभें करतात. काव्य अपूर्ण आहे. पण रायबागचा राया व मान्यांची मैना याचे सवाल–जवाब ऐकतांना

मराठमोळ्या प्रीतीचें मोहक दर्शन होतें–फुलांफुलांतून रंगणारीं मधुर स्वप्नें आपणापुढें तरळूं लागतात आणि काव्य संपतांच 'कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं', अशी जड जाणीव आपणालाहि होते. कल्पनाविलास, नादमाधुर्य व भावसौंदर्य यांनीं नटलेली ही कविता पुरी झाली असती तर–!

## विनोदी कविता

गोविंदाग्रजांच्या विनोदी कविता थोड्याच आहेत. नाटकांतून ज्यानें हास्यरसाचे पाट वाहविले आहेत व बाळकराम।करवीं ठकीच्या लग्नाचे प्रयोग करून ज्यानें महाराष्ट्राला खदखदून हंसविलें आहे, त्याला काव्याच्या क्षेत्रांत विनोद विशेष साधला नाहीं. अतिशयोक्ति किंवा उपरोध या दोनच हत्यारांचा त्यांनीं या क्षेत्रांत विशेष उपयोग केलेला दिसतो. 'काय करावें?' व 'विहिणींचा कलकलाट' या अतिशयोक्तिवर आधारलेल्या असल्या तरी त्यांतील विनोद अनुभवाला येत असल्यानें पटण्यासारखा आहे. 'चिन्तातुर जन्तु' हीं तर उपरोधिक कविता आहे. जगाच्या काळजीचें ओझें सतत मस्तकावर वाहणाऱ्या 'चिन्तातुर जन्तूंचा' प्रश्न व त्याला कवीनें दिलेलें उत्तर या स्वरूपांत केलेला उपरोध कांहींसा कडक असला तरी गडकऱ्यांच्या प्रतिभेचा एक निराळाच पैलू ती दाखविते. संपादकांच्या मागणीप्रमाणें 'हुकमेहुकूम' कविता करणाऱ्या कविब्रुवांचा उपहास 'हुकमेहुकूम' या कवितेंत आढळेल. सामाजिक जीवनांतील विसंगतीचें दर्शन त्यांनीं 'एक समस्या' मध्यें कसें घडविलें हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे.

## तात्त्विक कविता

या विभागांतील कांहीं कविता स्पष्टपणें कांहीं आध्यात्मिक वळण दर्शविणाऱ्या आहेत, तर 'मुरली' व 'फुटकी तपेली' या कविता आध्यात्मिक असल्या तरी त्या गूढगुंजनात्मक आहेत. गडकरी हे जरी सुधारणावादी होते तरी ते अज्ञेयवादी किंवा नास्तिक नव्हते. परमेश्वरी अस्तित्वावर त्यांची दृढ श्रद्धा होती. आणि यामुळें आत्यंतिक निराशेनंतर त्यांचें लक्ष देवाकडे वेधलें गेलें असल्यास नवल नाहीं.

**४७ अनामिकाचे अभंग**—नामदेव–तुकारामादि संतकवींच्या अभंगवाङ्मयाशीं गोविंदाग्रजांचा दाट परिचय होताच. पण कांहीं वेळेला त्यांच्या

वृत्तींशींहि ते परिचित होत असावेत [ कांहीं टीकाकारांना हे अनामिकाचे अभग म्हणजे वरपांगी अनुकरण वाटतें-पण तें तसें नाहीं. ]

पृ. ९५ ओळ ६ --तुकारामाच्या अभंगांशीं साम्य लक्षांत सहजच येईल. उदाहरणार्थ--

‘ करितों कवित्व म्हणाल हें कोण्ही । न्हे माझी वाणी पदरीची ।’
‘ काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें... । ’

पृ. १०० ओळ ५ ‘ पांडुरंगा आम्ही युगाचे दुर्जन । क्षणाचे सज्जन पश्चात्तापें । ’ केवढें हें दारुण आत्मविश्लेषण आहे.

पृ. १०१ अभंग ७, ८, ९, १० — गोविंदाग्रजांच्या या अभंगांवरून त्यांच्या नामदेव–तुकोबांच्या अभंगांच्या व मोरोपंतांच्या केकावलीच्या अभ्यासाची साक्ष पटेल.

४८. विरामचिन्ह--व्याकरणांतूनहि रम्य काव्य निर्माण करणाऱ्या गोविंदाग्रजांच्या या कल्पनाविलासाचें व ‘ नवनवोन्मेषशाली ’ प्रतिभेचें सर्वच टीकाकारांनीं कौतुक केलें आहे. जीवनांतील विविध स्थित्यंतरें विरामचिन्हांत येथें आहेत. अशाच तऱ्हेनें भर्तृहरीनें एका श्लोकांत ही स्थित्यंतरें दिलेलीं आहेत :

‘ क्षणं बालो भूत्वा क्षणमपि युवा कामरसिकः
क्षणं वित्तैर्हीनः क्षणमपि च संपूर्णविभवः ॥
जराजीर्णैरंगैर्नट इव वलीमंडिततनुः ।
नरः संसारान्ते विशति यमधानीजवनिकाम् ॥ ’

( वैराग्य शतक : ४८ )

शेक्सपीअरनें ‘ As You Like It ’ या सुखान्तिकेंत अशाच तऱ्हेनें जीवनाच्या विशाल रंगभूमीवरील सात अवस्थान्तरें सांगितलेलीं आहेत. ( Seven stages of Life. )

**४९. फूल ना फुलाची पाकळी**--‘ दूषण वगळुनि भूषणमात्रें प्रभुपूजन करि काळ असे ! ’ हा जीवनांतील महामंत्र विविध पौराणिक व ऐतिहासिक

उदाहरणांनीं गडकरी सांगत आहेत. कांहीं टीकाकारांना यांत त्यांचा ' तीव्र अहंकार ' लपलेला वाटतो, तर कांहींना ही कविता म्हणजे Self-defence' —आत्मतरफदारीपर—वाटते. कवीच्या खाजगी जीवनाकडे पूर्वग्रहदूषित दृष्टीनें बघून कलाकृतीचें मूल्य ठरविणाऱ्या फाजील टीकाकारांचीं तोंडें यांत गप्प केलेलीं आढळतील.

५०. जीवितास—या कवितेवर कवीनें जोडलेली टीप ही वैषयिक वृत्तीची निदर्शक आहे असें हर्षे म्हणतात.

' जनसंमर्दी अलभ्य शोभा पाहुनि, ठसवुनि मनिं घेणें '...या काव्य-चरणांतील सूचना सामाजिक शिष्टतेस सोडून आहे असा कांहीं टीकाकारांचा आरोप आहे. या उलट प्रा. वाळिंबे यांना ही कविता म्हणजे गडकऱ्यांच्या प्रेमभंगानें विकल झालेल्या व जगाचें दुःख पिऊन तळमळणाऱ्या अंतःकरणाचे सहजोद्गार वाटते. रोमॅन्टिक संप्रदायाचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

' फसव्या पाण्यावरी पोहुनी, दम कोंडुनि मरतां मरतां ।
गोविंदाग्रज ' म्हणे, जीविता । लाभ तुझा नच यापरता ॥ "

गोविंदाग्रजांच्या निराश वृत्तींतून निघालेली जीवनविषयक कल्पना किती स्पष्ट आहे तें येथें आढळेल. ' आशानिराशेच्या ' या विचित्र व जीवघेण्या खेळाला जीवन हें नांव आहे.

## गडकरी आणि गूढ-गुंजनपर काव्य

गोविंदाग्रजांनीं मुरली, घुबडास, फुटकी तपेली, कलगीचें गाणें इत्यादि गूढ गुंजनपर कविता लिहिल्या आहेत. गूढगुंजनात्मक काव्य हा प्रकार मराठी संत वाङ्मयांतहि आढळतो. ज्ञानेश्वर नामदेव, तुकाराम इत्यादि कवींनीं सहजगत्या अर्थ न कळणाऱ्या, पण अध्यात्मिक अर्थ भरलेल्या कविता लिहिलेल्या आहेत. केशवसुतांनीं ' झपूर्झा, हरपलें श्रेय ' इत्यादि गूढ-गुंजनपर काव्य केलेलें आहे. गूढ-गुंजनपर म्हणजे कवीनें जीव, जगत् व ईश्वर यांच्या परस्पर संबंधाबद्दल केलेलें विचारमंथन. मात्र हें विचारमंथन पुष्कळ वेळां संदिग्ध व दुर्बोध असते; आत्म्याची परतत्त्व जाणून घेण्याची दुर्दम्य इच्छा व त्याची थोडीफार जाणीव होतांच तें प्रकट करण्याची—आत्माविष्कारणाची – तीव्र तळमळ यांत आढळते. परंतु या आविष्करणांत शब्द अपुरे पडतात अपरिचित वस्तु परिचित शब्दांत प्रकट केली जातांना

नेहमींचे अर्थसंकेत अस्पष्ट वाटतात व कांहीं तरी दुर्बोध–गहन व गूढ–विषयावरील हें कवीचें स्वगत वाटूं लागतें. आध्यात्मिक अधिकारी वाचकच त्यांतून अर्थ काढूं शकतात व त्यांतील रसाचा आस्वाद घेऊं शकतात. सर्वसामान्य वाचकांना तें गूढ–गुंजनच राहतें.

गडकरी यांचें गूढगुंजनपर काव्य हें टीकाकारांच्या चांगल्या–वाईट टीकांचा विषय झालेलें आहे. श्री. हर्षे यांना हें काव्य ' अर्थशून्य शाब्दिक रचना, ' ' बेफाम बाष्कळता ' व केशवसुतांची भ्रष्ट नकल वाटतें, ' आध्यात्मिक अनुभूति नसलेली शाब्दिक ब्रह्मज्ञानाची पोकळ बडबड ' वाटतें. या उलट प्रा. ब. ग. खापर्डे यांना या गूढगुंजनात्मक काव्यांत ' गोविंदाग्रजांच्या उत्क्रांतीचा अथवा त्यांच्या अनुभवाचा, आणि काव्यशक्तीचा, परमोच्च बिंदू ' आढळतो. आध्यात्मिक उन्नतींत पुढें सरसावणाऱ्या कवीचे अनुभव सामान्य लोकांना दुर्बोध-निदान अपरिचित-वाटणारच !

५१. मुरली— सर्व टीकाकारांनीं वाखाणलेली गोविंदाग्रजांची उत्कृष्ट कविता. त्यांतील अद्वैतवादी मनाची भक्तिभावना, तरल कल्पना, अलंकारांची सुबकता, शब्दांची नादमधुर पखरण इत्यादि काव्यगुणांना तोड नाहीं.

ईश्वराचें अस्तित्व भावपूर्ण हृदयास पटलेलें आहे, पण बुद्धिवादाचें समाधान करण्यासाठीं ईश्वरी प्रत्युत्तराची–श्रीकृष्णाच्या मुरलीरवाची–याचना करणाऱ्या व तळमळणाऱ्या भक्ताच्या मनाचीं विविध आंदोलनें यांत आहेत. ईश्वर व भक्त यांच्यावर कृष्ण व राधा यांच्या मधुरभक्तीचें रमणीय रूपक केलेलें आहे. या मधुर भक्तीच्या विविध अवस्था गडकरी यांनीं अत्यंत प्रासादिक पण कोमल शब्दांनीं रंगविण्याचा प्रयत्न केलेला आहे. आध्यात्मिक अधिकारी मनुष्यास येथें ' शब्दांविण संवादिजे ' अशी प्रतीति यावी; तुकारामानें लिहिलेल्या ' विराण्या ' व गडकरी यांची ' मुरली ' यांची जात एकच !

श्री. हर्षे यांना यांत वैचारिक ' असंबद्धता ' वाटते, त्यांत ' ध्येयपूर्ण प्रेमाचें चित्रीकरण ' वाटतें. तथापि ' अत्युत्कृष्ट नादमधुर कविता ' म्हणून ती कायम लोकप्रिय राहील असें वाटतें.

दा. क्र. ८७१०

५२. फुटकी तपेली——आध्यात्मिक विचारानें ओतप्रत भरलेली ही कविता आहे. परतत्त्वाची ओळख करून घेणाऱ्या आर्त आत्म्याला मायेचा ( प्रकृतीचा ) कांहींच उपयोग होत नाहीं. ऐहिकतेच्या साधनानें परतत्त्वाचें साध्य कधींच लाभणार नाहीं हा विचार यांत आहे.

ओळ ५-६ ' आद्याच्या पर्यंतापासुनि । अंताच्या आरंभामधुन ' । असले विरोधाभासात्मक पण तात्त्विक सत्य सांगणारे काव्यचरण हे केवळ वरपांगी अनुकरणांतून निर्माण होणार नाहींत.

पृष्ठ ११२ ओळ १४-१६ ' नसते परके...विलक्षण. '

' कोऽहम् ? ' या आर्त जिज्ञासूस ' सोऽहम् ' हें कळलें म्हणजे आत्मज्ञान मिळालेंच.

पृष्ठ ११३ ओळी ९ ते १२——संसाराचें मृगजळ पिऊन समाधान कसें होणार ? ' ब्रह्म सत्यं जगत् मिथ्या ' हाच विचार या रूपकांतून प्रकट होतो.

५३. शेवटची कविता——गोविंदाग्रजांच्या ' वाग्वैजयंतींत नसलेली, पण ऐन मृत्यूच्या दारांत असतांना लिहिलेली ही शेवटचीच कविता, पण ती अपूर्ण आहे. ' समीक्षक 'च्या १९४४ च्या खास ' गडकरी ' अंकांत ' ती प्रथम प्रसिद्ध झाली. कवीच्या प्रेमभंग झालेल्या अंतःकरणाचें व विफल झालेल्या जीवननिष्ठांचे ठसे येथें आर्तपणें उमटलेले दिसतात. जगांतील सौंदर्यावर अनुरक्त असणाऱ्या या सौंदर्यान्वेषी व स्वच्छंदवादी ( रोमँटिक ) कवीनें केलेलें सौंदर्य-वस्तूंचें आवाहन व त्यांचा घेतलेला निरोप जितका करुण तितकाच तो रम्य आहे.

' महाभाग हो, या आशेचा मानुं नका राग,
आशा नच ही परी करपल्या आशेची आग । '

गडकऱ्यांच्या लौकिक जीवनाची ही फलश्रुति आहे !

* * *

REFBK-0008710